CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १७ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २१९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



वास्तविक पाहता आजची सभ्यता धाग्यातून तुटून आकाशात पतंगाप्रमाणे उडत आहे. थोड्या वेळासाठी ती आतषबाजीचा रंगीबेरंगी उल्हास देईल. पण त्यानंतर डोळ्यांपुढे अंधार पसरेल. संस्कृती व सभ्यता या दोघांची युतीच मानवसमूहाचे मंगल करणारी आहे. सभ्यताविहीन संस्कृती लंगडी आहे आणि संस्कृती-विहीन सभ्यता आंधळी आहे. दोहोंची युती 'अंध पंगुन्यायेन' सफलता प्राप्त करून देईल.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# तेहरान लवकर रिकामे करा

● **इस्रायलचा इराणला इशारा** ● **आयडीएफ मोठ्या हल्ल्याच्या तयारीत**

◆ **तेल अवीव, १६ जून**

इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाने भीषण स्वरूप धारण केले असून, चौथ्या दिवशी दोन्ही देशांनी संहारक शस्त्रांचा वापर केला. इराणने हायपर सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा मारा केल्याने इस्रायलच्या तेल अवीव आणि हायपा या शहरांचे मोठे नुकसान झाले. याचा वचपा म्हणून इस्रायलने इराणच्या लष्करी तळांना लक्ष्य केले. तसेच राजधानी तेहरानमधील डिस्ट्रिक-३ हा भाग त्वरित रिकामा करावा, असा इशारा इस्रायलने दिला आहे. या भागात इराणचा मोठा लष्करी तळ असल्याने मोठा हल्ला होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सोमवारी इराणने इस्रायलवर १०० पेक्षा जास्त क्षेपणास्त्रे डागली. यामध्ये घरांचे मोठे नुकसान होऊन पाच नागरिकांचा मृत्यू झाला. त्यानंतर इस्रायलने तेहरानवर मोठा हल्ला करीत जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे १२० मिसाईल लाँचर नष्ट केले. आता तेहरानच्या आकाशावर आमचे नियंत्रण असून शत्रूचे लष्करी बळ नट करू, असा इशारा ब्रिगेडियर जनरल इफ्फे डेफ्रिन यांनी दिला आहे. इराणने सोडलेल्या क्षेपणास्त्रांपैकी बहुतांश हवेतच नष्ट केल्याचा दावाही त्यांनी केला आहे. दरम्यान इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी लष्करी तळाला भेट देऊन आपण विजय मिळविण्याच्या जवळ आहोत. तेहरानच्या अवकाशात आता आपले नियंत्रण असून, इराणमधील आण्विक तळे आणि क्षेपणास्त्रांचे साठे नष्ट केले जातील, असे सांगितले आहे. इराणच्या हल्ल्यात आतापर्यंत २४ इस्रायली नागरिकांचा मृत्यू झाला असून ५०० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. इराणने ३७० क्षेपणास्त्रे आणि शेकडो ड्रोन्स सोडल्यानंतर आमच्या लढाऊ विमानांनी तेहरानमधील १० कमांड सेंटर नष्ट केल्याचा दावाही बेंजामिन नेत्यानाहू यांनी केला आहे. ◀(वृत्तसंस्था)



इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर इस्रायलच्या तेलअवीवमध्ये ठिकठिकाणी आगी लागल्या आहेत

### भारतीयांना हलवणार सुरक्षित ठिकाणी

इस्रायलने इराणमध्ये केलेल्या हल्ल्यांदरम्यान, भारतीय दूतावास विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी काम करत आहे. याशिवाय, इतर अनेक मार्गांचाही शोध घेतला जात आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय आहेत. त्यात विद्यार्थी मोठ्या संख्येने आहेत. ही माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी करून दिली. ■

### तेहरानमध्ये वाहतूक कोंडी

तेहरानमधील डिस्ट्रिक-३ या भागातून निघून जाण्याचा इशारा इस्रायलने दिल्यानंतर या भागात प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. मिळेल त्या वाहनाने नागरिक निघून जात आहेत. तेहरानमध्ये एकूण २२ जिल्हे असून, लोकसंख्या ३ लाख ३३ हजारांच्या आसपास आहे. ■

# सोनंद-गळवेवाडी रस्त्यावर अपघात; बहिण-भाऊ ठार

● सांगोला तालुक्यातील सोनंद-गळवेवाडी रस्त्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ जून-**

सांगोला तालुक्यातील सोनंद ते गळवेवाडी रस्त्यावर शेख वस्ती येथे ट्रक आणि दुचाकीच्या अपघातात चुलत बहिण भाऊ ठार झाल्याची घटना दि.१६ जून रोजी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, पल्लवी चंद्रकांत गळवे (वय-१८) (रा.गळवेवाडी, सोनंद, ता.सांगोला) ही चुलत भाऊ गुरुप्रसाद रमेश गळवे (वय-१३) यास शाळा सुटल्यानंतर मोटर सायकल (एम एच.४५ एच. ४४२६) वरून घरी घेऊन जात होती. त्यावेळी ट्रक (के ए ११-४०८४) च्या अज्ञात चालकाने धडक दिल्याने ट्रकचे चाक अंगावरून गेल्याने दोघेही जागीच ठार झाले. गुरूप्रसाद हा सोनंद येथील शाळेत आठवीत शिकत होता.



पल्लवी गळवे



गुरुप्रसाद गळवे

आज शाळेचा पहिला दिवस होता. त्याची शाळा लवकर सुटल्याने त्यास त्याची बहिण गावाकडे घेऊन जात होती. याबाबत रमेश म्हातारबा गळवे यांनी सांगोला पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### माजी मुख्यमंत्री रुपाणी यांच्यावर अंत्यसंस्कार

**अहमदाबाद :** एअर इंडियाच्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचे पार्थिव सोमवारी त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आले. राजकोट येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री राहिलेले रुपाणी यांनी कोरोनानंतरच्या गंभीर पुनर्प्राप्ती टप्प्यातून गुजरातला मार्गदर्शन केले. १२ जून रोजी अहमदाबाद येथे अपघातग्रस्त झालेल्या लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमान एआय-१७१ मध्ये २४२ प्रवासी आणि क्रू सदस्यांमध्ये ते होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

# कुसळंबजवळ भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू

**बार्शी, दि. १६ जून-**

बार्शी-कुसळंब रस्त्यावर आज दुपारी साडेचारच्या सुमारास एका भरधाव टिप्परने लुना मोटारसायकलला दिलेल्या जोरदार धडकेत दोघेजणांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

रमेश नानाभाऊ शेंडगे (वय ३०, रा. उपळाई, ता. कळंब) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील नानाभाऊ आप्पाराव शेंडगे (वय ६२) आणि गावकरी विनायक हरिदास मुंढे (वय ७१) हे दोघे लुना मोटारसायकल (क्र. एचएच २५/ ए.एक्स २५६२) वरुन बार्शीकडून कळंब तालुक्यातील उपळाईकडे परतत असताना कुसळंब गावाजवळ समोरुन भरधाव वेगात आलेल्या टिप्पर (क्र. एमएच१३/सी.यु ६०९५) ने त्यांच्या वाहनास जोरदार धडक दिली. या अपघातात नानाभाऊ शेंडगे यांचा जागीच मृत्यू झाला, तर विनायक मुंढे यांना उपचारासाठी बार्शी येथे हलवण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचाही मृत्यू झाला. लुना वाहनाचेही अंदाजे १0,000 रुपयांचे नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच रमेश शेंडगे घटनास्थळी दाखल झाले. अपघातस्थळी मोठी गर्दी जमली होती. या प्रकरणी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### 'जी-७'साठी पंतप्रधान मोदी कॅनडात दाखल

**ओटावा :** कॅनडातील कनानास्किस येथे सोमवारपासून दोन दिवसीय जी-७ शिखर परिषद सुरू होत आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सायप्रसहून कॅनडाला रवाना झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टार्मर हे शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी कॅनडामध्ये पोहोचले आहेत. पंतप्रधान मोदी सोमवारी त्यांचा सायप्रस दौरा संपवून कॅनडाला पोहोचले. येथे त्यांची कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी पहिलि भेट होईल. जानेवारी २०२५ मध्ये जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्यानंतर १४ मार्च रोजी मार्क कार्नी कॅनडाचे नवे पंतप्रधान बनले. जस्टिन ट्रुडो यांच्या कार्यकाळात भारतकॅनडा संबंध बिघडले होते. शिखर परिषद सुरू होण्याच्या फक्त दहा दिवस आधी भारताला जी-७ शिखर परिषदेचे निमंत्रण मिळाले, हे विशेष. दुसरीकडे, ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांची पहिली भेट शिखर परिषदेत होण्याची शक्यता आहे.

### बच्चू कडू अपात्र; जिल्हा बँक अध्यक्षपद गेले

**अमरावती :** माजी राज्यमंत्री बच्चू कडू जिल्हा बँकेचे संचालक होऊन अध्यक्ष झाले होते. त्यांना संचालक पदासाठी अपात्र ठरविल्यामुळे त्यांचे अध्यक्षपदही गेले. विभागीय सहनिबंधकांनी हा निर्णय दिला आहे. जिल्हा बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड व अन्य ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या विरोधात विभागीय सहनिबंधकाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीत बच्चू कडू यांना नाशिक येथील न्यायालयाने एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा ठोठावल्यामुळे त्यांना नियमानुसार संचालक पदासाठी अपात्र घोषित करावे, अशी मागणी करण्यात आली होती. या प्रकरणावर सहनिबंधकांकडे सुनावणी सुरू झाली. दरम्यानच्या काळात बच्चू कडू यांनी नाशिक न्यायालयाने दिलेल्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने बच्चू कडू यांना ठोठावलेल्या शिक्षेच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली असून, निकालाला दिलेली नाही.

### इंद्रायणी पूल धोकादायक असल्याचे जाहीर होते

**पालघर :** तळेगाव येथील इंद्रायणी नदीवर उभारण्यात आलेला छोटेखानी लोखंडी पूल धोकादायक स्थितीत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आधीच जाहीर केले होते आणि तसा फलकही लावला, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. अपघाताचे ठिकाण मावळ तालुक्यात आहे. नवीन पुलाच्या बांधकामाचे कंत्राट देण्यात आले असून कामाला सुरूवात झाली आहे. गावकऱ्यांनीच पूल धोकादायक असल्याचा फलक लावला होता पण घटनेच्या दिवशी लोकांना पुलाच्या परिस्थितीची जाणीव झाली नसावी. पुणे जिल्ह्यातील अशी ५00 ठिकाणे चिन्हित करण्यात आली आहेत. याविषयीची अधिसूचना जारी करण्यात आली असून काही ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## धोकादायक पर्यटनस्थळे तात्पुरती बंद ठेवा

**मुंबई, दि. १६ जून-**

पावसाळ्यामध्ये पर्यटक ज्या ठिकाणी अधिक संख्येने येतात तेथे पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यात यावी. धोकादायक पर्यटनस्थळे असतील तेथे मागदर्शक सूचना लावण्याबरोबरच सुरक्षा बंदोबस्त ठेवून दुरुस्ती होईपर्यंत ती तात्पुरती बंद ठेवण्यात यावीत. त्याचबरोबर प्रशासन अथवा पोलीस यंत्रणेच्या सूचनेनंतर देखील दक्षता न घेणाऱ्या पर्यटकांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे निर्देश पुणे जिल्ह्यात कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सोमवारी दिले.

## आनंदाची वार्ता : उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा ५0 टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जून -**

सोलापूरची वरदायनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उजनी धरणातील उपयुक्त पाणी साठा सोमवारी (ता.१६) संध्याकाळ पर्यंत पन्पन्नास टक्के पर्यंत पोहचत आहे. सायंकाळी सहा वाजता धरण ४९.७२ अशा स्थिती मध्ये होते. दरम्यान धरणात येणारी पाण्याची आवक वाढत असल्यामुळे सायंकाळ पर्यंत निश्चितच धरण पन्नास टक्यांच्याही पुढे जाणार आहे.

उजनी धरणात सोमवारी सांयकाळी पाच वाजता पुणे बंडगार्डन येथून सुमारे १४ हजार ५४५ क्युसेक्स इतका पाण्याची विसर्ग सुरु होता. या बरोबरच दौंड येथून येणारी पाण्याची आवक ११ हजार ७१९ क्युसेक्स इतकी होती. मात्र पुणे बंडगार्डनचा विसर्ग पाहता दौंड येथून होणारी पाण्याची आवक मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्यामुळे उजनी धरण सोमवारी सायंकाळी पन्नास टक्के इतक्या पाणी पातळी पर्यंत पोहचेल आणि तेथून त्याचा प्रवास शंभर टक्केकडे सुरु होईल. दरम्यान यावर्षी मान्सुनपूर्व पावसामुळेच उजनी धरणातील उपयुक्त पाणी साठ्यात कम ालीची वाढ होवून मेच्या मध्यापर्यंत मायनस मध्ये गेलेले धरण त्या नंतर काही दिवसांतच प्लसकडे वाटचाल करु लागले. उजनी धरणाच्या इतिहासा मध्ये यावर्षी पहिल्यांदाच जून महिन्याच्या मध्यालाच उपयुक्त पाणी साठा ५0 टक्यांपर्यंत पोहचल्याची नोंद झाली आहे. धरणातील एकुण पाणी साठा ९0.३0 टिएमसी इतका असून उपयुक्त पाणी पातळी २६.६४ टिएमसी इतकी आहे.



विशेष म्हणजे धरणातून सध्याच्या घडीला कोणत्याही योजनेसाठी पाणी सोडले जात नाही. सर्वात महत्वाची बाब म्हणजे घाटमाथा आणि भीमा खोऱ्यात पाऊस सक्रीय झाला असून भीमाशंकर पासून ते पुणे विभागा मध्ये एकंदरीतच पावसाची दमदार बॅटींग सुरु आहे. त्यामुळे उजनीतील पाण्याची आवक निश्चितच वाढतच जाणार आहे.

## हे युद्धाचे युग नाही : पंतप्रधान मोदी

● **सायप्रससोबत द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर भर**

**निकोशिया, १६ जून**

आज पश्चिम आशिया आणि युरोपमध्ये अशांती आहे. बऱ्याच देशांचा संघर्ष सुरू आहे. प्रत्यक्षात हे युग नव्या तंत्रज्ञानाची कास धरून आर्थिक उन्नती करण्याचे आणि समृद्धीचे जीवन जगण्याचे आहे. हे युद्धाचे युग नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सायप्रस येथे केले.

सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडौलाईड्स यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या सायप्रस दौऱ्यावर आहेत. मागील दोन दशकात सायप्रसला भेट देणारे मोदी हे पहिलेच पंतप्रधान आहेत. दौऱ्यादरम्यान राष्ट्रपती क्रिस्टोडौलाईड्स यांच्याशी पंतप्रधानांची चर्चा झाली. सायप्रसची राजधानी निकोशिया येथे इंडियासायप्रस सीईओ फोरमला संबोधित करताना पंतप्रधानांनी भारताच्या उपलब्धींविषयी माहिती दिली. पंतप्रधान म्हणाले, भारत लवकरच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. या दिशेने आमच्या देशाची वेगाने वाटचाल सुरू आहे. मागील एक दशकात भारत पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आता आम्ही तिसऱ्या स्थानाकडे झेप घेण्याच्या दिशेने जात आहोत. आज जगातील ५0 टक्के डिजिटल आर्थिक व्यवहार भारतातील यूपीआयच्या माध्यमातून होतात. फ्रान्ससारख्या देशांना आम्ही जोडले आहे आणि आता सायप्रसही यूपीआयने जोडले जाईल, अशी आशा आहे. यासाठी आमची चर्चा सुरू आहे. सायप्रस स्टॉक एक्सचेंज आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज यांनी गुजरातच्या गिफ्ट सिटीमध्ये सहयोगाचा करार केला आहे, अशी माहितीही यावेळी पंतप्रधानांनी दिली.



## ९९ व्या साहित्य संमेलन स्वागताध्यक्षपदी शिवेंद्रसिंहराजे

**सातारा, १६ जून**



साताऱ्यात ३२ वर्षानंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. राजधानी साताऱ्यात होणाऱ्या या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची एकमताने निवड करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी दिली. सातारा मध्ये मसाप, शाहूपुरी शाखा, मावळा फौंडेशन या संस्थांनी मागणी केल्यानुसार साताऱ्यात हे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. या दोन्ही संस्थांची संयुक्त बैठक नुकतीच झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे यांचे नाव सुचवले. त्याला साहित्यिक डॉ. राजेंद्र माने, साहित्यिक डॉ. उमेश करंबेळकर यांनी अनुमोदन दिले. यावेळी सर्व कार्यकारिणी सदस्यांनी शिवेंद्रसिंहराजे यांची एकमताने स्वागताध्यक्ष पदी निवड केली.

## जनगणनेची औपचारिक अधिसूचना जारी

### देशात दोन टप्प्यांत पार पाडणार प्रक्रिया

◆ **नवी दिल्ली, १६ जून**


जनगणनेची दीर्घकाळापासूनची प्रतीक्षा अखेर संपली आहे. गृह मंत्रालयाने सोमवारी जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत जनगणना आणि जातींच्या जनगणनेशी संबंधित अधिकृत राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, जनगणना २०२७ मध्ये केली जाईल.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन आणि भारताचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांच्याव्यतिरिक्त, इतर अनेक उच्च अधिकारी बैठकीत उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यात १ ऑक्टोबर २०२६ पासून जनगणना सुरू होणार आहे. देशातील उर्वरित भागात ही प्रक्रिया १ मार्च २०२७ पासून सुरू होईल, असे अधिसूचनेमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. जनगणनेचा प्राथमिक डेटा मार्च २०२७ मध्येच प्रसिद्ध केला जाईल. तथापि, तपशीलवार डेटा प्रसिद्ध होण्यासाठी वर्षाच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागेल. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया सुमारे २१ महिन्यांत पूर्ण होईल.

देशभरात दोन टप्प्यांत जनगणना होणार आहे. १ मार्च २०२७ च्या मध्यरात्रीपर्यंत लोकसंख्या आणि सामाजिक स्थितीचा डेटा रेकॉर्डमध्ये नोंदवला जाईल. पहिल्या टप्प्यात घरांची यादी ऑपरेशनमध्ये प्रत्येक घराची निवासी स्थिती, मालमत्ता आणि सुविधांची माहिती गोळा केली जाईल. यानंतर दुसऱ्या टप्प्यात, लोकसंख्या जनगणनेत प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर तपशील घेतले जातील.

यावेळी सुमारे ३५ लाख प्रगणक आणि पर्यवेक्षक आणि सुमारे १.३ लाख जनगणना अधिकारी जनगणनेच्या कामासाठी तैनात केले जातील. जनगणना मोबाईल ॲप्लिकेशन वापरून डिजिटल पद्धतीने केली जाईल. ◀(वृत्तसंस्था)




### स्वातंत्र्यानंतर प्रथमच जातनिहाय जनगणना

भारतात स्वातंत्र्यानंतर प्रथमच जातनिहाय जनगणना होणार आहे. यासाठी, जनगणना प्रश्नावलीमध्ये जातीचा एक नवीन स्तंभ तयार केला जाईल. गेल्या काही वर्षांपासून जातींची गणना हा एक प्रमुख राजकीय आणि निवडणूक मुद्दा बनला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह राजद आणि समाजवादी पक्षासारखे विरोधी पक्ष जातीय जनगणना करण्याची मागणी करत होते. देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. कोरोना साथीमुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलण्यात आली होती, त्यामुळे पुढील जनगणना १६ वर्षांनी होत आहे. ■

भारताला लागला 'जॅकपॉट'

# अंदमानात सापडला खनिज तेलाचा मोठा साठा

### अर्थव्यवस्थेत परिवर्तन घडणार, नशीब पालटणार

◆ **नवी दिल्ली, १६ जून**

इस्रायल आणि हसरं यांच्यातील संघर्ष थांबायचं नाव घेत नाहीये तर आता अमेरिकेने उडी घेतली आहे. मध्ये-पूर्वेत दिवसेंदिवस तणाव वाढताना आणि कच्च्या तेलात दरवाढीचा भडका उडाला असताना अख्ख्या जगाचे टेन्शन वाढले आहे. याच पृष्ठभूमीवर भारताच्या हाती मोठा जॅकपॉट लागण्याची शक्यता आहे. भारत अंदमान समुद्रात मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाचा साठा शोधण्याच्या मार्गावर आहे.

भारत कच्च्या तेलाच्या पुरवठ्यासाठी अजूनही दुसऱ्या देशांवर अवलंबून आहे. आपण आपल्या गरजेच्या ८५ टक्के कच्च्या तेलाची आयात इतर देशांकडून करतो. भारत जगातील कच्च्या तेलाचा तिसरा सर्वात मोठा आयातदार देश आहे. मध्य-पूर्वेत इराण आणि इस्रायल यांच्या संघर्ष पेटला असताना केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी कच्च्या तेलाच्या साठ्याबाबत मोठा दावा केला आहे.

इस्रायल आणि इराणमधील तणावादरम्यान सध्या कच्च्या तेलाच्या किमतींबद्दल सर्वात मोठी भीती जगाला लागून आहे. बाजारातील तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की पश्चिम आशियातील परिस्थिती नियंत्रणात आणली नाही तर भविष्यात कच्च्या तेलाची किंमत १५० च्या पुढे जाऊ शकतात. या दरम्यान, भारताला मोठा तेल साठा सापडल्याची बातमी आली आहे पण, तो अजूनही खोदला जात आहे.



भारत सध्या त्याच्या गरजेच्या सुमारे ८५ टक्के तेल इतर देशांकडून आयात करतो. यामध्ये रशिया आणि आखाती देशांचा समावेश आहे. अमेरिका आणि रशियानंतर, तेल आयातीच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. ◀(वृत्तसंस्था)

### भारताच्या हाती लागला तेलाचा खजिना

हरदीप सिंग पुरी यांनी कच्च्या तेलाच्या साठ्याबाबत मोठा दावा केला, जो बरोबर ठरला तर भारताचे जगातील इतर देशांवरील तेलावरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात संपुष्टात येऊ शकते. अंदमान प्रदेशात गयानासारखा तेलाचा साठा सापडला तर भारताला ऊर्जेच्या क्षेत्रात स्वावलंबी होण्याची संधी मिळेल. यासोबतच निर्यात आणि आर्थिक विकासाचा वेग वाढू शकतो. गयाना सध्या जगात कच्च्या तेलाच्या साठ्याच्या बाबतीत १७ व्या क्रमांकावर आहे, जिथे अंदाजे ११.६ अब्ज बॅरल तेल आणि वायूचा साठा आहे. अशा परिस्थितीत, अंदमान प्रदेशात गयानासारखे तेलाचे साठे आढळले तर भारताला ऊर्जेच्या क्षेत्रात स्वावलंबी होण्याची संधी मिळेल. यासोबतच निर्यात आणि आर्थिक विकासाचा वेग वाढू शकेल. ■

### २० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था!

**पुरी म्हणतात की भारतात गयानासारखा शोध लागला तर देशाची अर्थव्यवस्था ३.७ ट्रिलियन डॉलर्सवरून २० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढू शकते. अंदमानमधील तेल साठ्यांचा शोध भारतीय तेल उद्योगासाठी ट्रम्प कार्ड ठरू शकतो. यामुळे भारत केवळ ऊर्जा आयात करणाऱ्या देशापासून ऊर्जा उत्पादक देशात बदलणार नाही तर जागतिक ऊर्जा नकाशावर भारताला एक नवीन ओळख देखील मिळू शकेल.** ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापूर भाजपात अंतर्गत 'बंडाळी' कायम

- भाजपच्या डिजीटल बॅनरवर अजूनही नरेंद्र काळेच अध्यक्ष
- जयाभाऊंच्या कार्यक्रमांना मालकांची दांडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टीमध्ये सोलापुरात प्रचंड अशी गटबाजी आणि अंतर्गत बंडाळीचे राजकारण पाहायला मिळत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या दौऱ्यात व इतर स्थानिक कार्यक्रमात आ. सुभाष देशमुख असतात मात्र आ. विजय मालक दिसत नाहीत. इतकेच कायतर दि. १५ जून रोजी घोंगडे वस्ती येथे पार पडलेल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त साडीवाटप, वृक्षरोपे आणि शालेय साहित्य वाटप कार्यक्रम ाच्या डिजीटल बॅनरवर अजूनही नरेंद्र काळे यांचे भाजप शहराध्यक्ष म्हणून नाव झळकले. नूतन अध्यक्षाचे नावच नव्हते. यामुळे आता भाजपाच्या विविध गटातून एकमेकांविषयी उघडउघड नाराजी दिसून येत आहे.



सोलापूर शहराच्या राजकारणात पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांचं वर्चस्व राहत असल्याने दोन्ही देशमुख नाराज असल्याचे दिसत आहे. दुसरीकडे केवळ वर्षभरातच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पक्षासाठी झटलेल्या नरेंद्र काळे यांचे शहराध्यक्ष पद पक्षाने काढून ज्येष्ठ नेत्या रोहिणी तडवळकर यांच्या खांद्यावर जबाबदारी दिली. तेव्हापासून तर शहर उत्तर मधील विशेषतः मालक आणि त्यांचे कार्यकर्ते नाराज असल्याची चर्चा आहे. इतकेच कायतर विजय मालकांच्या नावाचा पालकमंत्री म्हणून हायटेक नेत्यांनी का विचार केला नाही? असाही सवाल मालक समर्थकांतून वारंवार विचारला जात आहे.

पक्ष श्रेष्ठींनी प्रथमच महिलेकडे शहराचे अध्यक्ष पद दिल्याने त्याचे स्वागत झाले तसेच संघाच्या कार्यकर्त्याकडे अध्यक्ष पद आल्याने पक्षावर नाराज असलेले जुने आणि संघाचे कार्यकर्ते आता चांगलेच सक्रिय झाले आहेत. एकीकडे असे चित्र असताना दुसरीकडे शहर उत्तर मधील मालकांच्या कार्यकर्त्यांना मात्र रोहिणीताई अध्यक्ष झाल्याचे आवडलेच नसल्याचे या पोस्टरवरून जाणवते. त्या शहराचे अध्यक्ष होऊन महिनाभर झाले पण शहर उत्तर मधील एकाही कार्यकर्त्याने आपल्या कोणत्याही कार्यक्रमाच्या पोस्टरवर त्यांचा फोटो किंवा नाव घातले नाही. एका तर पोस्टरवर अध्यक्ष म्हणून जाणीवपूर्वक नरेंद्र काळे यांचेच नाव जाणीवपूर्वक छापण्यात आले होते. म्हणजेच अंतर्गत गोटातील राजकारण आता उघडपणे चालू झाले आहे. नुकताच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा झाला. त्यावेळी उत्तरचे मंडल अध्यक्षांनी दांडी मारली.

पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेली तिरंगा यात्रा असो की पुणे येथे पार पडलेली पश्चिम महाराष्ट्र विभागीय कार्यशाळेला उत्तरच्या मंडळ अध्यक्षांनी दांडी मारल्याचे सांगण्यात आले. एकंदरीत, भाजपा पदाधिकाऱ्यांतील या बंडाळीचा तोटा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षालाच बसणार आहे.

## महत्त्वाचे...

### डॉक्टर वळसंगकर आत्महत्या प्रकरण; न्यायालयात ७०९ पाणी दोषारोप पत्र दाखल

**सोलापूर, दि. १६ जून-**

मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणाचा तपास, पोलिसांनी पूर्ण केला,मुदतीच्या आत दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले आहे. तरी मंगळवारी (दि १७ जून)रोजी संशयित आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी होइल. प्रसिध्द मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरिष वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी डोक्यात बंदुकीद्वारे गोळी झाडून घेत आत्महत्या केली. याबाबत डॉ.अश्विन वळसंगकर यांनी फिर्याद दिली असून सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी एसपी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेसच्या प्रशासन अधिकारी मनीषा माने-मुसळे (वय ४५) हिला अटक झाली असून न्यायालयीन कोठडीत आहेत. पोलिसांनी तपास करून चार्ज शीट न्यायालयात सोमवारी दाखल केले आहे. सदर बाजार पोलिसांनी याप्रकरणी एकूण ७३ साक्षीदारांचे जबाब घेतलेले आहेत तसेच १९ वस्तू जप्त करण्यात आलेल्या आहेत १०८ प्रकारची कागदपत्रे जप्त करण्यात आली असून ७०९ पाणी दोषारोपपत्र दाखल केले असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे तर सरकारी पक्षातर्फे ॲड.प्रदिपसिंह रजपूत काम पाहत आहेत.



### लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत प्रवेशोत्सव

**अकलूज, दि.१६ जून-**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत विद्यार्थिनींचे धुमधडाक्यात स्वागत करण्यात आले. हलगी वादनात, पुष्पवृष्टीच्या वर्षावात, औक्षण करून विद्यार्थिनींचे स्वागत करण्यात आले. सखी सावित्रीच्या सदस्या अमृता लोखंडे, महिला पालक यांच्या हस्ते सरस्वतीपूजन झाले. तालुक्याचे भाग्यविधाते काकासाहेब व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .विद्यार्थिनींना पेन, चॉकलेट, फुगे व शैक्षणिक पुस्तकसंचाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रचना रणवरे यांनी केले. आभार विशाल लिके यांनी मानले .



### उपळाई (ठों) शाळेत प्रवेशोत्सवानिमित्त वृक्षारोपण

**बार्शी, दि. १६ जून-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) शाळेत आमदार दिलीपराव सोपल यांच्या हस्ते वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना गणवेश, पाठ्यपुस्तके, बूट, सॉक्स यांचे वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक अनिल काळे यांचे हस्ते आमदार दिलीपराव सोपल, गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, सरपंच मधुकर वैद्य, माजी सरपंच विजय ठोंगे, उपसरपंच संदीप बोटे, ग्रामपंचायत सदस्य जयवंत कदम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी अधिकारी सुरेश मोरे, दिलीप शिंदे, प्राचार्य नंदकुमार काशीद तसेच शाळेतील शिक्षक प्रभाकर काटे, रामचंद्र बरचे, हरिभाऊ दळवी, श्रीमती मीरा गरड, सुवर्णगौरी शिंदे, प्रिया गडदे उपस्थित होत्या.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये नवागतांचे स्वागत

**सांगोला, दि.१६ जून-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यू.कॉलेज येथे शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये सोमवार दि.१६ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता ५ वी मध्ये नव्याने प्रवेशित झालेले व ६ वी ते ९ वी तसेच १२ वी मधील विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे यांचे हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी इ.६ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### गरजू महिलेला आपुलकी प्रतिष्ठानकडून शेळीची पाट देऊन मदत

**सांगोला, दि.१६ जून-**

निजामपूर ता.सांगोला येथील निजामपूर-वाटंबरे रस्त्यालगत राहणाऱ्या एका महिलेचा पती आजारी असताना मोठा खर्च केल्यानंतरही उपचारादरम्यान मृत्यू पावल्याने सध्या ही महिला आपल्या १८ वर्षांच्या मुलाबरोबर राहते. दोघेही रोजंदारीचे काम करून आपला उदरनिर्वाह करतात. या कुटुंबाला छोटीशी मदत म्हणून सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने शेळीची पाट सोमवारी देण्यात आली. त्याचबरोबर शेजारीच असलेल्या त्यांच्या पुतणीला शालेय साहित्य देण्यात आले. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सुरेश चौगुले, डॉ.अनिल कांबळे, चंद्रशेखर कवडे, अरविंद डोंबे, महादेव दिवटे, निजामपूरचे पोलीस पाटील बिरा माने, संदीप कोळेकर उपस्थित होते.

## वाघोलीतील जि.प. शाळेत महिलांना मारहाण

**सोलापूर, दि. १६ जून-**

मोहोळ तालुक्यातील वाघोली येथील जिल्हा परिषद शाळेत सोमवारी सकाळी ९ च्या सुमारास महिलांना मारहाण करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी महिलांना अशा प्रकारे केलेल्या मारहाणीने महिलांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे

राणी सिध्देश्वर गावडे (वय ३५) व जया दत्तात्रय सदवदे (वय ५०, दोघी रा. वाघोली ता मोहोळ) असे मारहाण झालेल्या महिलांची नावे आहेत. सोमवारी शाळेचा पहिला दिवस होता. यामुळे गावडे या सकाळी लवकरच शाळेत गेल्या होत्या. त्यावेळी त्यांना मागील भांडणाचा राग मनात धरून महादेव गावडे व इतर दोन जणांनी लोखंडी रॉड, लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केली. यात राणी यांच्या कपाळाला जखम झाली तसेच डोक्याला मार लागला आहे. तर जया यांना सर्वांगास मुकामार लागल्याने सकाळी ११.५० वाजता विद्या हक्के यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मड्डी वस्तीत २५ हजारांची घरफोडी

**सोलापूर :** शहरातील भवानी पेठ परिसरातील मड्डी वस्तीमधील घर फोडून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले.याबाबत साईनाथ श्रीकांत निशानदार (वय ३५, रा. मड्डी वस्ती, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ मे रोजी दिवसा चोरट्याने साईनाथ निशानदार यांचे घराशेजारी असलेले पत्र्याचे खोलीचा लोखंडी दरवाजाचा कडी कोयंडा तोडून खोलीतील जर्मनच्या धातूचे मोठे पातेले, २ नग लोखंडी धातूच्या गॅस शेगडी असा २५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.

### जुनी मिल कंम्पौडमधील चारा बाजारातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १६ जून -**

जुनी मिल कंम्पौडमध्ये जनावरांचा चारा खरेदी करण्यासाठी आलेल्या तरूणाची ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली.याबाबत अमोल राम बिराजदार (वय २६, रा. कोंडी, ता. उत्तर सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जून रोजी सकाळी अमोल बिराजदार हा जुनी मिल कंम्पौडमधील उमा नगरजवळ असलेल्या जनावरांच्या चारा बाजारात चारा आणण्यासाठी त्याच्या एमएच १३ वाय ८६६३ यावरून आला होता. चारा बाजारात दुचाकी पार्क करून अमोल चारा खरेदी करीत असताना चोरट्याने त्याची ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार परीट पुढील तपास करीत आहेत.

## वृध्दाच्या खूनप्रकरणी तिघांना पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जून -**

बुधवारी रात्री रविवार पेठेत चारचाकी वाहनाच्या धडकेत मरण पावलेल्या वृध्दाच्या खूनप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेल्या तिघांना न्यायदंडाधिकारी एम पी मर्ढेकर यांनी दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.




गोविंद जाधव (वय ५८, रा. रविवार पेठ, कुचन प्रशालेशेजारी, सोलापूर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत सुशिला गोविंद जाधव (वय ५२) या महिलेच्या फिर्यादीवरुन तुळजाराम शंकर जाधव (रा. कल्पना नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर), दिपक शंकर जाधव (रा. रविवार पेठ, सोलापूर), बालाजी शंकर जाधव (रा. रविवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिघांना अटक करण्यात आली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी हे पळून गेले होते. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास करून तिन्ही आरोपींना १६ जून रोजी रात्री ११ च्या सुमारास जुना पूना नाका येथील समर्थ हॉटेलजवळून ताब्यात घेऊन जेलरोड पोलिसांच्या स्वाधीन केले. जेलरोड पोलिसांनी तिघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिघांना पोलिस कोठडी सुनावली. महिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्टे पुढील तपास करीत आहेत. याप्रकरणी सरकारच्यावतीने ॲड. राठोड तर आरोपीकडून ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड सिध्दाराम पाटील, ॲड. श्रीपाद देशक काम पहात आहेत.

## चारचाकी वाहनास ट्रॅक्टरची धडक

**सोलापूर, दि. १६ जून -**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील बाळे ब्रिजजवळ चारचाकी वाहनास ट्रॅक्टरने धडक दिल्याने कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.याबात नितीन उत्तमराव पुजारी (रा. गोकुळधाम कॉलनी, प्रिन्स स्टील मागे, बार्शी रोड, लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महादेव कांतीलाल कदम (वय ५०, रा. साटे, ता. फलटण, जि. सातारा) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जून रोजी नितीन पुजारी हे त्यांच्या एमएच २४ बीएल ९८२६ क्रमांकाच्या कारमधून कुटुंबियासमवेत निलंगा ते पुणे जात होते. सकाळी साडेनऊच्या सुमारास पुजारी यांची कार ही सोलापुरातील बाळे



ब्रिजवर आली असता महादेव कदम याने त्यांच्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ११ डीडी ९२२४ हा निष्काळजीपणे चालवून कारला जोरदार धडक दिली. यामध्ये कारचे सुमारे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

## पालखी सोहळा, दिंडीधारकांनी आगाऊ प्लॉटसची मागणी नोंदवावी

- प्रांताधिकारी सचिन इथापे
- १६ जूनपासून प्लॉट नोंदणी झाली सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जून -**

आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा ६ जुलै रोजी साजरा होत असून यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा तसेच मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. प्रथम येणाऱ्या पालखी, दिंडी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून, दि.१६ जून पासून प्लॉट नोंदणी सुरु झाली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे आगाऊ प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.



आषाढी यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्स भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येईल. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (९७६७२४८२१०) ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (९९७०१०९९१९) यांच्याशी संपर्क साधावा.

### कुसमोड शाळेत नवागतांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १६ जून -**

कुसमोड (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद लक्ष्मीनगर शाळेत आज इयत्ता पहीलीमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी पुस्तकांसह गणवेश वाटप झाले. मुलांना खाऊही देण्यात आला. यावेळी विजय मदने, काळे चेअरमन, नंदकुमार पाटील, दत्तु गारुळे, विशाल बोडरे, शशिकांत मदने, स्वप्नील गोंजारी, इंगळे, सुशिला मदने, सहशिक्षक सुनिल डुरे, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, विदयार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी मार्गदर्शन केले.

### सेवानिवृत्त शिक्षकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी दालनासमोर आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून -**

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागांकडून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या उपदानातून कपात केलेली रक्कम परत करण्यासाठी प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने जिल्ह्यातील २०० सेवानिवृत्त शिक्षक मुख्य कार्यकारी अधिकारी दालनासमोर थरणे आंदोलन करण्यात आले.

मुबंई उच्च न्यायालयात या विरोधात रिटपीटीशन दाखल केले होते . त्याचा निर्णय सेवानिवृत्तांच्या बाजूने लागला. कपात केलेली रक्कम परत करण्यासाठी न्यायालयाने आदेश देऊनही जिल्हा परिषद टाळाटाळ करीत आहे आणि दरमहा पेन्शन विलंबाने करीत आहे. रक्कम मिळावे व पेन्शन एक तारखेला मिळावेत या मागणीसाठी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले याच्या नेतृत्वखाली मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना भेटण्यासाठी गेले असता सिईओंनी भेट देणे टाळले . त्यामुळे हजर असलेल्या २०० वयस्कर सेवानिवृत्त शिक्षकांनी ठिय्या आंदोलन केले . यावेळी सुभाष फुलारी , सिध्देश्वर धसाडे , रामचंद्र बिराजदार, अर्जून अडोळे यांच्यासह सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.

## मोदी सरकारचा कार्यकाळ सुवर्णाक्षराने लिहीला जाईल

- चेतनसिंह केदार सावंत यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ जून-**

विकसित भारत, आत्मनिर्भर भारत आणि संकल्प से सिध्दी या मंत्राने मोदी सरकारचा कालखंड ओळखला जाईल. ११ वर्षाच्या प्रवासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या उज्वल भविष्याची पायाभरणी केली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्याने विकासाला गती मिळाली आहे. जेथे भाजपा सरकार सत्तेत आहे त्या ठिकाणी गरीबांचा विकास झाला आहे. सरकार म्हणजे सेवा, या हेतूने काम केले जात असल्याने सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे. विकसित भारताचा अमृतकाल, सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्षे यामुळे मोदी सरकारचा



कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहीला जाईल असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

मोदी सरकारच्या ११ वर्षाच्या कार्यकाळातील विकासाच्या दृष्टीने चेतनसिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. पुढे बोलताना ते म्हणाले, २०१४ पूर्वी सरकारी योजनांचे लाभ लाभार्थी जनतेपर्यंत पोहचत नसत. लाभार्थी जनतेला हे लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांकडे जावे लागे. मोदी सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाच्या थेट बँक खात्यात लाभ पोहचवण्याचे काम केले आहे. सामान्य माणसाला वैद्यकीय उपचारावर केल्या जाणाऱ्या खर्चाची भिती वाटत असे. मोदी सरकारने ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध केले आहेत. मेक इन इंडियामुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत. आता आपण जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलो आहोत. चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे भारताची वाटचाल सुरू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्मान भारत, किसान सन्मान निधी अशा अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. मोदी सरकारच्या काळात जनता भ्रष्टाचारमुक्त कारभाराचा अनुभव घेऊ लागली आहे. राम मंदिर निर्मिती, काशी विश्वनाथ कॉरीडॉरमुळे मोदी सरकार विकासाबरोबरच देशाची गौरवशाली संस्कृती जपण्याला प्राधान्य देत आहे, हे दिसले आहे. जीएसटी सारख्या करामुळे व्यवस्थेतील भ्रष्टाचार संपला आहे. ३७० कलम रद्द झाल्यामुळे देशाची अखंडता बळकट झाली आहे. सेवा, सुशासन, गरीब कल्याण या संकल्पना कृतीत आणून मोदी सरकारने राज्य कारभार कसा करावा, याचा आदर्श स्थापित केला असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.



### दि मॉडेल विविधांगी प्रशालेत शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत उत्साहात

**माळीनगर, दि. १६ जून-**

येथील दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी संचलित,दि मॉडेल विविधांगी प्रशाला माळीनगर या शाळेची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत सोहळा दिमाखदार कार्यक्रमाने उत्साहात करण्यात आला

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे हे होते. यावेळी सचिव अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे,संचालक पृथ्वीराज भोंगळे,दिलीप इनामके, प्राचार्य कल्लाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, पर्यवेक्षक कल्याण कापरे उपस्थित होते. यावेळी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बांदल यांनी, बक्षीस वितरण वाचन नवनाथ गायकवाड यांनी केले तर आभार उपप्राचार्य रितेश पांढरे यांनी मानले.प्रारंभी सर्व विद्यार्थी, शिक्षक यांची शाळा प्रवेशोत्सव फेरी माळीनगर मधून काढण्यात आली व नंतर प्रशालेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून व्यासपीठापर्यंत सर्व नवागतांना हातात फुगे देऊन व टाळ्यांच्या गजरात त्यांना हायस्कूल चौकात घेऊन स्वागत करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...




### सेडाद्वारा रक्तदान शिबिर संपन्न

**सोलापूर, ता. १६ -**

सोलापुरात सध्या रक्ताच्या तुटवडा व आंतरराष्ट्रीय रक्तदाता दिवस चे औचित्य साधून येथील सोलापूर इलेक्ट्रॉनिक डीलर्स असोसिएशन यांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सभासद व त्यांचे कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त रक्तदान केले. यामध्ये एकूण रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी अध्यक्ष आनंद येमूल, सचिव भूषण भुतडा, माजी अध्यक्ष खुशाल देढीया,खजिनदार सुयोग कालानी, संचालक सर्वश्री चंद्रकांत शहापुरे,गिरीश मुंदडा, यल्लाप्पा भोसले, रवी पाचलग सह सभासद रवी कोळी, संतोष क्यामा, हरीश कुकरेजा, विश्वजीत कुलकर्णी, संतोष बुरबुरे, बिराजदार आदींसह व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. दमाणी रक्त केंद्र येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

# सोलापुरातून तिरुपती, मुंबई, पुणे, दिल्लीसाठी ऑगस्टपासून विमानसेवा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

सोलापूर येथील होटगी रोडवरील सोलापूर- गोवा प्रवासी विमानसेवा दि. ९ जून रोजी सुरु करण्यात आली. या सेवेस प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता सोलापुरातून तिरुपती, मुंबई, पुणे व दिल्लीसाठी विमानसेवा सुरु करण्याच्या हालचाली विमासेवा प्रशासनाकडून सुरु करण्यात येत असल्याची माहिती अधिकृत सुत्रांकडून मिळाली.

सोलापूर ते गोवा या प्रवासी विमानसेवेची सुरुवात ९ जून पासून सुरु झाली. या विमानसेवेस सोलापूरकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील तिर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी गोव्यातून येणाऱ्या भाविकांची संख्याही हळूहळू वाढू लागली आहे. त्यामुळे आता सोलापूरहून अन्य शहरासाठी विमानसेवा सुरु करण्याचा प्रयत्न शासन व प्रशासनाकडून सुरु करण्यात आला आहे. १५ ऑगस्ट पर्यंत सोलापूरातून मुंबई व पुणे या दोन शहरासाठी प्रवासी विमानसेवा सुरु होण्याची शक्यता आहे. तत्पुर्वी सोलापूर ते तिरुपती ही सेवाही सुरु होण्याची शक्यता प्रशासकीय यंत्रणेकडून व्यक्त करण्यात येत आहे. सोलापुरातून मुंबई व पुणे या दोन्ही ठिकाणची प्रवासी विमानसेवा सुरु झाल्यानंतर सोलापुरातून दिल्ली, बेंगलोर, हैदराबाद या सारख्या शहरासाठीही प्रवासी विमान सेवा सुरु होण्याची शक्यता आहे. तसे प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहेत. सोलापूर ते गोवा प्रवासी विमानसेवा उद्घाटनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार होते. मात्र प्रतिकूल हवामानामुळे विमान उतरु न शकल्याने मुख्यमंत्री या दिवशी सोलापुरात आले नाहीत. मुंबई व पुणे येथील प्रवासी विमानसेवेच्या उद्घाटनासाठी मात्र मुख्यमंत्री सोलापुरात येतील असा विश्वास केंद्रीय विमान सेवा राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला होता. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्या हस्तेच १५ ऑगस्ट दरम्यान सोलापूर मुंबई ही प्रवासी विमानसेवा सुरु होण्याची शक्यता आहे.

# ध्येयवादी मनुष्य निर्माण हेच रा. स्व. संघाचे कार्य

## पुण्यात महाविद्यालयीन संघ शिक्षा वर्गाचे आयोजन;१५३ शिक्षार्थी सहभागी

- प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दिनांक १६ जून-**

जगभरातील हिंदूंचे सघटन करणे आणि ध्येयवादी मनुष्य निर्माण करणे हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य आहे, असे प्रतिपादन संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडगाव यांनी केले. पुण्यात आयोजित संघ शिक्षा वर्गाच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते.

संघाच्या महाविद्यालयीन विभागाचा हा वर्ग १४ ते ३० जून दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या वर्गात पश्चिम महाराष्ट्र प्रांतातून १२२ तर इतर प्रांतातून ३१ शिक्षार्थी सहभागी झाले आहेत. ज्यामध्ये कोकण, देवगिरी, विदर्भ आणि सौराष्ट्र प्रांताचा समावेश आहे. डॉ. दबडगाव यांनी संघ शिक्षा वर्गांची पार्श्वभूमी आणि संघातील त्याचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले, हिंदूंचे सशक्तिकरण आणि राष्ट्रीय विचारांचा मनुष्य निर्माण करण्यासाठी संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांनी शाखेचे तंत्र समाजाला दिले. प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून असे सामाजिक आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य आणि ज्ञान स्वयंसेवकांना प्राप्त होते. एक प्रकारे स्वयंसेवकाच्या भूमिकेतून कार्यकर्ता निर्माण यातून होते. वर्गात स्वयंसेवकांच्या जडण-घडणीसाठी शारीरिक व बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असते. संपूर्ण देशभरात अशीच रचना आहे. नवीन मित्र जोडणे, एक तासाच्या शाखेचे नियोजन, नवीन सामाजिक समस्यांची जाणीव, त्यावरील उपाय, समाजमाध्यमांचा वापर अशा अनेक बिंदूंवर वर्गात प्रशिक्षण मिळते. वर्गाचे पालक गुरूनाख शिरोडकर, सर्वाधिकारी महेश भाटिया, वर्गकार्यवाह सागर साळुंखे आणि वर्गाचे मुख्यशिक्षक राजेंद्र पाटील हे आहेत.



### १९२८ पासून संघ शिक्षा वर्ग

संघाच्या स्थापनेनंतर १९२८ पासून स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणासाठी संघ शिक्षा वर्ग सुरू करण्यात आले. पूर्वी २१ दिवसांचे वर्ग असायचे. ज्याला प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ग असे संबोधले जायचे. आता संघ शिक्षा वर्ग, कार्यकर्ता विकास वर्ग-१ आणि कार्यकर्ता विकास वर्ग - २ असे संबोधले जाते. पहिले दोन वर्ग प्रत्येक प्रांतात स्वतंत्र होतात. अतिम म्हणजे कार्यकर्ता विकास वर्ग -२ हा नागपूर येथे होतो. शिक्षार्थी स्वयंसेवकांच्या विशेषत्वानूसारही वर्गांचे आयोजन होते. जसे की पुण्यात आयोजित हा वर्ग व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष आहे.

## नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या : सुजाता सौनिक

**मुंबई, दि. १६ जून:**

राज्यात मागील काही दिवसात घडलेल्या विविध दुर्घटना आणि त्यात झालेले नागरिकांचे मृत्यू हे अतिशय दुर्दैवी आहेत. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करावे, असे आदेश मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सोमवारी दिले. रेल्वे प्रवासात होणाऱ्या दुर्घटना टाळण्याकरिता प्रवाशांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्याची सूचना त्यांनी केली. मुंबईत काही दिवसांपूर्वी लोकलमधून पडल्याने नागरिकांच्या झालेल्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर मुख्य सचिवांनी संबंधित रेल्वे, मेट्रो, पोलीस, महानगरपालिका, प्रशासकीय यंत्रणा आदींची बैठक घेऊन रेल्वे प्रवासी सुरक्षा आणि दुर्घटना टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर चर्चा केली.





## तुंगतमध्ये नवागतांच्या बैलगाडीचे पालकमंत्र्यांनी केले सारथ्य

- केंद्र व राज्य शासन विद्यार्थ्यांच्या पाठीशी : पालकमंत्री जयकुमार गोरे
- तुंगत येथील शाळेला पालकमंत्र्यांची भेट; विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. १६ जून-**

आधुनिक शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून शाळांना मॉडेल बनवण्याचे काम केंद्र व राज्य शासन करीत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासन शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, उपक्रम राबवित आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासन शालेय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

सोमवारी (दि.१६) पासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला आहे.शाळा प्रवेशोत्सवाच्या अनुषंगाने राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोमवारी पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तुंगत येथील शाळेला भेट दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सरपंच डॉ अमृता रणदिवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन वनसाळे, यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### पडत्या पावसातही पालकमंत्र्यांनी भाषण केले : भाषणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा तुंगत येथे प्रवेशोत्सवानिमित्त नवागतांचे स्वागत करण्यासाठी बैलगाडीच्या व ट्रॅक्टरच्या माध्यमातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी स्वतः पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे सारथ्य केलं. तसेच पालकमंत्री यांचे भाषण सुरु असतानाच पाऊसाला सुरुवात झाली. यावेळी पाऊसामुळे काही विद्यार्थ्यांचा चुळबुळ सुरू असताना पालकमंत्री यांनी मुलानो शांत बसा ... हाताची घडी तोंडावर बोट म्हणातच विद्यार्थी एकदम शांत झाले व पडत्या पावसातीही विद्यार्थ्यांनी भाषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तत्पुर्वी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेत शिक्षक व विद्यार्थ्यांचे मंत्री गोरे यांनी कौतुक करुन विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले.

## राज्यस्तरीय जाहिरात एजन्सी फेडरेशनच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड

- प्रेसिडेंटपदी सोलापूरचे संदीप जव्हेरी संतोष उदगिरी यांचा कार्यकारिणीत समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १६ जून-**

महाराष्ट्रातील डव्हर्टायझिंग एजन्सीजची राज्यस्तरीय शिखर संस्था असलेल्या फेम (फेडरेशन ऑफ डव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग एंटरप्रेनियर्स) ची वार्षिक सभा १४ जून २०२५ रोजी पुणे येथे संपन्न झाली.

यावेळी पुणे, कोल्हापूर,सोलापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सांगली, सातारा, कोकण, जळगाव, अहिल्यानगर, आदी जिल्ह्यांतील जाहिरात एजन्सिजचे प्रतिनिधी तसेच जिल्हा संघटनेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी 'फेम'च्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. फेमचे संस्थापक अध्यक्ष अमरदीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व माजी अध्यक्ष मोतीराम पिंगळे व मावळते अध्यक्ष महेश कराडकर, उपाध्यक्ष प्रफुल्ल मुथा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सन २०२५-२७ या कालावधीसाठी अध्यक्षपदी रवी पवार (नाशिक), उपाध्यक्ष प्रकाशभाई शहा (पुणे), सचिव रामदेव व्यास (छत्रपती संभाजीनगर),



सहसचिव अजिंक्य उजळंबकर (छत्रपती संभाजीनगर), खजानीस कौस्तुभ नाबर, (कोल्हापूर) तसेच पुढील २०२७-२९ या कालावधीसाठी अध्यक्ष (इलेक्ट) म्हणून संदीप जव्हेरी (सोलापूर) यांची यावेळी बिनविरोध निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून संजय साताळकर (पुणे), सुनील बासरानी (कोल्हापूर), दीपक जगताप (नाशिक), संतोष उदगिरी (सावा), राहुल देशपांडे (सातारा), नरेंद्र चौधरी (जळगाव), अरुण मलिक (छत्रपती संभाजीनगर), राजेंद्र म्याना (अहिल्यानगर), सुनील बुधवानी (नागपूर), राजेश वाळवेकर (बेळगाव), परेश पेडणेकर (कोकण) यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या सुरवातीला मावळते अध्यक्ष महेश कराडकर यांनी त्यांचा कार्य अहवाल मांडला. कौस्तुभ नाबर यांनी मागील सभेचे इतिवृत्त व आर्थिक अहवाल सादर केला त्यास मंजुरी देण्यात आली.नूतन अध्यक्ष रवी पवार यांनी जाहिरात एजन्सीच्या उन्नतीसाठी येणाऱ्या काळात विविध सेमिनार तसेच प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अद्याप ज्या जिल्ह्यांमध्ये जाहिरात एजन्सिजच्या जिल्हा संघटना कार्यरत नाहीत तेथे जिल्हा संघटना सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे पवार म्हणाले. जाहिरात एजन्सी समोरील विविध समस्या व आव्हानांची यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. संदीप जव्हेरी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव रामदेव व्यास यांनी आभार मानले.



## सरकारी योजनांचे दरवाजे ५५० भटके विमुक्तांना खुले

- सिकलीकर वैदू, मांगगारुडी समाजातील नागरिकांना जातीच्या दाखल्याचे वाटप
- भटके विमुक्त विकास परिषद आणि भारतीय सिकलीकर संघटनेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १६ जून-**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही भटक्या विमुक्त समाजातील नागरिक सरकारी योजनांपासून कोसो दूर आहेत. पाठीवर बिऱ्हाड आणि हातावरच पोट असलेल्या या नागरिकांना त्यांचाच ठाव ठिकाणा माहिती नसतो. त्यामुळे सरकारी कागदपत्रांच्या जाचक नियमापासून ते दूरच असतात. म्हणूनच त्यांच्यापर्यंत सरकारी योजना पोहोचविण्यासाठी भटके विमुक्त विकास परिषद आणि भारतीय सिकलीकर संघटना प्रयत्नशिल आहेत. नुकतेच त्यांनी तब्बल ५५० सिकलीकर वैदू आणि मांगगारुडी समाजातील नागरिकांना जातीच्या दाखल्याचे वाटप केले आहे.

राजे उमाजी नाईक महाराज स्वाभिमान योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले. या वेळी हडपसरचे मंडलाधिकारी शेखर शिंदे, परिषदेच्या प्रदेश कार्यकारणी सदस्य शुभांगी तांबट, परिषदेचे हितरक्षा प्रमुख डॉ. जितेंद्र ठाकूर, शिवसेनेचे पुणे जिल्हा प्रवक्ते अभिजीत बोराटे, सिकलीकर संघटनेचे अध्यक्ष चांदसिंग कल्याणी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांनी भारतमाता, महाराजा रणजीतसिंग, राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्रामुख्याने भटके विमुक्त समाजातील सिकलीकर वैदू व मांगगारुडी समाजातील ५५० नागरिकांना जातीचे दाखले मंडल अधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात आले.

शुभांगी तांबट यांनी परिषदेचे काम कसे चालते याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाला नगरसेवक मारुती तुपे, गुरूद्वारा गुरुनानक दरबार साहिबचे प्रधान चरंजीतसिंग सहानी, डॉ. जितेंद्र ठाकुर, पालावरची शाळांच्या शिक्षिका आदि उपस्थित होते. भगतसिंग कल्याणी यांनी आभार मानले.



## सुलाखे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण करुन व गुलाबपुष्पाने स्वागत

**बार्शी, दि. १६ जून-**

सुटीत मामाच्या गावाला फिरुन आल्यावर दीड महिन्याच्या सुट्टीनंतर सोमवारी (दि.१६) शहर व तालुक्यातील सर्व शाळा सुरु झाल्या. पहिल्याच दिवशी शाळेचा पहिला दिवस असणाऱ्या मुलांनी मात्र रडण्यास सुरुवात केली.

येथील सुलाखे इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांचे सनई चौघड्याच्या सुरात, औक्षण करत आणि गुलाबपुष्प देऊन मुलांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बार्शी एज्युकेशन सोसायटीचे सचिव अनंत कवठाळे, मुख्याध्यापक तुषार महाजन, हायस्कूलचे उपप्राचार्य रा. द. इंगळे, प्रसन्न देशपांडे, उमेश चव्हाण, अमोल कुलकर्णी, पत्रकार संजय बारबोले उपस्थित होते. सुलाखे हायस्कूलसह शिशू विहार, नवीन मराठी शाळा, इंग्लिश मीडियम स्कूलमध्येही मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुक्त पत्रकारितेचा पुरस्कारकर्ता

- अनंत गोयंका यांचे प्रतिपादन
- रौप्य महोत्सवी 'देवर्षी नारद पत्रकार सन्मान' सोहळा उत्साहात

**मुंबई, दि. १६ जून-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. स्वतंत्र भारतामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने खऱ्या अर्थाने मुक्त पत्रकारितेचा पुरस्कार केला, असे प्रतिपादन 'द इंडियन एक्सप्रेस ग्रुप'चे संचालक अनंत गोयंका यांनी केले. 'विश्व संवाद केंद्र, मुंबई' आयोजित रौप्य महोत्सवी 'देवर्षी नारद पत्रकार सन्मान सोहळा २०२५' या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी, व्यासपीठावर 'विश्व संवाद केंद्रा'चे प्रमुख सुधीर जोगळेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ पदाधिकारी राजाभाऊ मुळे, 'निबे ऑर्डनन्स अ‍ॅण्ड मेरीटाईम लिमिटेड'चे गणेश निबे, 'एडलवाईस ग्रुप'चे अध्यक्ष राशेस शहा, राज्यसभा खासदार मिलिंद देवरा आदी मान्यवर उपस्थित होते.



'विश्व संवाद केंद्र, मुंबई' आयोजित रौप्य महोत्सवी 'देवर्षी नारद पुरस्कार सन्मान सोहळा २०२५,' बीकेसी येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या सभागृहात शनिवार, दि. १४ जून रोजी संपन्न झाला. यावेळी, एकूण दहा श्रेणींमध्ये पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सोशल मीडिया इन्फ्लुअन्सर्सपासून ते दोन शतकाहून अधिक काळ कार्यरत असणाऱ्या वृत्तपत्र समूहांचा यामध्ये समावेश आहे. सन्मान सोहळ्याचे प्रमुख पाहुणे अनंत गोयंका आपल्या उद्बोधनात म्हणाले की,आजच्या काळात पत्रकारितेचे स्वरूप बदलले आहे. खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांच्या जीवनाचे प्रतिबिंब आजच्या पत्रकारितेमध्ये आपल्याला बघायला मिळते, हे चित्र आशादायी आहे. देवर्षी नारद पत्रकार सन्मान सोहळ्याचे समन्वयक डॉ. निशीथ भांडारकर यांनी देवर्षी नारद पुरस्काराचे महत्व अधोरेखित करताना म्हणाले की, देवर्षी नारद हे पहिले पत्रकार म्हणून ओळखले जातात. देवर्षींनी कधीही पक्षपात केला नाही जे जसे आहे तसेच जगासमोर मांडले, विश्व संवाद केंद्र मुंबईचे देखील हेच उद्दिष्ट आहे. म्हणूनच सत्य आणि तथ्यावर आधारित पत्रकारिता करणाऱ्या निर्भीड पत्रकारांना प्रोत्साहन देणारे हक्काचे व्यासपीठ म्हणजे देवर्षी नारद पत्रकार सन्मान आहे. 'विश्व संवाद केंद्र, मुंबई'चे अध्यक्ष श्री.सुधीर जोगळेकर यांनी नारद पुरस्काराबद्दल माहिती सांगितली. निवड समिती पुरस्कारार्थींची निवड करते. मूल्याधिष्ठित पत्रकारिता करणारे आणि विशुद्ध चारित्र्याच्या पत्रकारांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. सोहळ्याचे प्रमुख वक्ता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ पदाधिकारी राजाभाऊ मुळे म्हणाले की, भारतीय विचार हा विश्वाच्या कल्याणाचा विचार कायम करत राहिला आहे. हा विश्वात्मक विचार आणि या विचाराचे चिंतन आपल्याला पत्रकारितेच्या क्षेत्रातसुद्धा बघायला मिळते. अनुषंगाने निरपेक्ष निर्भीड पत्रकारांचा सन्मान करणे अत्यंत गरजेचे आहे. बदलत्या युगात पत्रकारितेचे बदलणारे स्वरूप, त्याचा समाजावर होणारा परिणाम यांवरही त्यांनी मत व्यक्त केले.

### दहशतवादाविरोधात भारताची एकजूट !

देवर्षी नारद पत्रकार सन्मान सोहळ्याच्या पूर्वार्धात 'पत्रकारिता आणि राष्ट्रवाद' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात मिलिंद देवरा म्हणाले की, विविधतेमध्ये एकता' ही भारताची ओळखच नव्हे; तर हे भारताची ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जेव्हा सर्वपक्षीय शिष्टमंडळ 'ऑपरेशन सिंदूर' आणि त्या अनुषंगाने भारताची भूमिका मांडण्यासाठी परदेशात गेलो असता, दहशतवादाविरोधातली भारताची एकजूट जगाच्या निदर्शनास आली. कार्यक्रमाची सुरुवात अहमदाबाद येथे घडलेल्या दुर्दैवी विमान अपघातातील मृत प्रवाशांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली , तर कार्यक्रमाची सांगता करताना श्री. प्रणव भोंदे यांनी आभार प्रदर्शन केले.

### पुरस्कार विजेते

समाजमाध्यमांच्या माध्यमातून अभिव्यक्त होणाऱ्या स्मिता पावसकर, अमोल जामदरे, जयेश गांगण, मृगा वर्तक यांचा सन्मान करण्यात आला; तर पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे ज्येष्ठ पत्रकार समीर कर्वे, संदीप रामदासी, शैलेश गायकवाड यांचादेखील यावेळी सन्मान करण्यात आला. सा. 'विवेक'च्या संपादक अश्विनी मयेकर यांचा विशेष गौरव करण्यात आला. बहुभाषिक वृत्तसंस्था 'हिंदुस्थान समाचार' दोन दशकाहून अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या 'मुंबई समाचार' चासुद्धा सन्मान करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# संकटांना आव्हान द्यावे, आमंत्रण नको!

भ्रष्टाचाराच्या किडीने पोखरलेल्या यंत्रणा, बेपर्वाईच्या वृत्तीने बिघडलेली पिढी, सेल्फीसारख्या संसर्गाची बाधा झालेली तरुणाई आणि जगण्याचे मोल न समजल्यामुळे बहकून गेलेली मानसिकता अशा अनेक कारणांचा विळखा पडलेल्या समाजजीवनाच्या प्रत्येक कोपऱ्यावर दबा धरून बसलेल्या संकटांचे काम सोपे होत चालले असून, जीवनाची अखेर मानल्या जाणाऱ्या मृत्यूचे सावट सर्वत्र सातत्याने पसरल्याने दाटलेल्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे समाजजीवन भयग्रस्त झालेले आहे. दिवसागणिक कानावर आदळणाऱ्या अप्रिय बातम्या आणि अधूनमधून डोळ्यादेखही घडणारे जीवघेणे प्रसंग हे या भयग्रस्ततेचे मुख्य कारण असून अशा स्थितीतही, शहाणपण नावाच्या किमान संस्कृतीचे भान येण्याची चिन्हे मात्र सामाजिकतेपासून काहीशी दूर जात चालल्याने, सुरक्षित जगण्याच्या हक्काच्या पायमल्लीची मोठी जबाबदारी स्वत:वरच येऊन पडल्याची जाणीवही संपुष्टात येत आहे. सुरक्षित जगणे हा प्रत्येक सजीवाचा जन्मसिद्ध हक्क आहे. नैसर्गिक संकट किंवा आपत्तीसारख्या अनपेक्षिताच्या आघाताने या हक्कावर गदा आलीच, तर त्याला कोणाचाच इलाज नसतो. पण जेव्हा कळत नकळत, नाईलाजाने किंवा जाणीवपूर्वक देखील आपल्याच हातून आपल्या हक्काची पायमली होत असेल, तेव्हा साहजिकच, दबा धरून बसलेली संकटे डाव साधतात आणि सुरक्षित जगण्याचा हक्क हिरावला जातो. गेल्या काही महिन्यांपासून आसपास घडत असलेल्या असंख्य अप्रिय घटनांची सांगड घालावयाचा प्रयत्न केला, तर यांपैकी नैसर्गिक घटना किती, मानवनिर्मित किती किंवा केवळ बेपर्वाईच्या वृत्तीतून जन्माला आल्याने जीवघेण्या ठरलेल्या किती, याची वर्गवारी करणे काहीसे कठीणच होईल. पहलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी निष्पाप पर्यटकांची गोळ्या घालून क्रूर हत्या केली. ज्या निष्पापांचा यात बळी गेला, ते दुर्दैवी होते. मात्र, जगण्याचा आनंद शोधण्यासाठी सुरू असलेल्या लहानमोठ्या प्रयत्नांमागेही संकटे दबा धरून दडलेली असतात आणि या संकटांचे बोट धरून मृत्यू घाला घालतो, हेच तेव्हाही स्पष्ट झाले होते. त्यानंतर घडलेल्या सर्व घडामोडींचे आपण सारेजण साक्षीदार असल्याने, त्या काळात प्रत्येकाची मानसिकता कशी होती, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. आपल्या लष्करी दलांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास असूनही, अनिश्चिततेच्या सावटामुळे अनेकांच्या मनात असुरक्षिततेची भावनादेखील निर्माण झालेली होती. तशीच भावना कोविड महामारीच्या संकटाने सर्वत्र दाटलेली होती. एका बाजूला असुरक्षिततेच्या भावनेमुळे जगण्याचे मोल जाणण्याचे भान येत असताना आणि बिघडलेली जीवनशैलीची घडी पूर्ववत् करण्याच्या आणाभाकादेखील घेतल्या जात असताना महामारीचे संकट निवळू लागले आणि बिघडलेल्या जीवनशैलीचाच गाडा पूर्वपदावर आल्याने पुन्हा सर्वत्र बेपर्वाई आणि बेफिकीरीचाच उद्रेक दिसू लागला हे वास्तव नाकारता येणार नाही. कदाचित त्यामुळेच, गेल्या काही काळात, विशेषतः पहलगामच्या दुर्दैवी घटनेनंतर कोसळलेल्या असंख्य आपत्तींची मुळे शोधणे व त्यापासून काही ठोस बोध घेणे गरजेचे होऊ लागले आहे.

निष्काळजीपणा, अज्ञान किंवा तांत्रिक चुकांमुळेदेखील अपघात होऊन जीवितहानी होते आणि असे काही घडून गेल्यानंतरच्या तांत्रिक प्रक्रियेचा भाग म्हणून केल्या जाणाऱ्या चौकशांतूनही अपघाताची मुळे मानवी चुकांमध्ये दडल्याचेही उघड होते. विशेषत: ज्या ठिकाणी संकटे दबा धरून बसण्याची शक्यता अधिक असते, अशी ठिकाणे शोधणे व त्यापासून सावध राहणे फारसे काही अवघड नसते. पण अशा ठिकाणांनाच आव्हान देत जीव धोक्यात घालणे किंवा असे धोके जाणीवपूर्वक निर्माण करणे हे बेपर्वाईचेच एक अंग असते. सुरक्षा नियमांचे पालन करण्यात भ्याडपणा आहे, अशी नाहक समजूत असलेला व त्या समजुतीस झुगारण्यात शौर्य मानणारा वर्ग बहुधा अशा बेपर्वाईस बळी पडलेला दिसतो. अलिकडे, मोबाईलग्रस्तता नावाच्या एका विकाराने असंख्यांची शिकार केली आहे. विशेषत:, तरुण वर्गाच्या दृष्टीने मोबाईल हा तर बहुधा शरीराचा बाह्य अवयव असावा अशीच स्थिती दिसत असून, त्याचा वापर करून आभासी दुनियेत रमणाऱ्यांना वास्तविक विश्वाचा विसर पडून जीवघेण्या संकटांची शिकार होण्याची वेळ ओढवल्याची अगणित उदाहरणे आसपास दिसत असतानाही, या संकटापासून सावध राहण्याची मानसिकता मात्र रुजत नाही, हे अगाध आहे. स्वत:वर स्वत:च्या क्षमतेच्या जाणिवांहून अधिक विश्वास ठेवून धोक्यास आव्हान समजून सामोरे जाण्याची बेपर्वाई हेही अशा संकटांचे कारण ठरत आहे. त्याखेरीज, शारीरिक क्षमतेच्या पलीकडे जाऊन केलेल्या कामातून स्वत:च्या आरोग्य व स्वास्थ्यास संकटात टाकण्याची मानसिकता हेदेखील संकटांना कारणीभूत ठरताना दिसते.

ही बाब चिंताजनक आहेच, पण व्यक्ती-व्यक्तीमध्ये रुजत चाललेली ही मानसिकता फैलावत गेल्यास तो एक सामाजिक विकार होऊन संकटे सामूहिक शिकारीसाठी सरसावतात हे अशाच काही घटनांमुळे स्पष्ट होत असल्याने ती चिंता अधिक गंभीर आहे. प्रत्येक आठवड्याच्या अखेरीस, शनिवारी-रविवारी येणारा सप्ताहान्त ही नैमित्तिक बाब आहे. दर आठवड्याअखेरीस तो येणारच हे सर्वांस माहीतही असले तरी प्रत्येक सप्ताहान्त ही पहिल्यांदाच पाहावयास मिळालेली पर्वणी आहे अशा भावनेने त्यामध्ये सारा उत्साह ओतण्याची प्रथा अलिकडे बेफामपणे रुजत चालली आहे. शनिवारी सप्ताहान्त साजरा करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या झुंडींनाही पर्यटक म्हटले जाते. असे हे पर्यटक, आसपासच्या किंवा दूरच्या कोणत्याही पर्यटनस्थळी प्रचंड गर्दी करतात आणि तेथील धोकादायक ठिकाणांना आव्हान देण्याचा आततायीपणाही करतात, असेच अनेक दुर्दैवी दुर्घटनांतून स्पष्ट झाले आहे. रविवारी पुण्याजवळ कुंडमळा नावाच्या एका फारशा परिचित नसलेल्या पर्यटनस्थळी मोजक्या गर्दीने तेथील एका कमकुवत लोखंडी पुलावर अक्षरशः आक्रमण केले आणि त्या पुलाची गर्दी झेलण्याची क्षमता संपताच तो कोसळला. संकटातून सावरण्यासाठी क्षणाचीही उसंत न देता, दबा धरून बसलेल्या मृत्यूने काही पर्यटकांना विळखा घातलाच आणि जगण्याचा आनंद शोधण्यासाठी घराबाहेर पडलेल्या गर्दीच्या उत्साहावर विरजणही पडले. वस्तुतः, हा पूल धोकादायक असून तेथे जाणे सुरक्षित नाही, अशी सूचना देणारा फलक त्या स्थळी होता असे सांगितले जाते. मात्र, उत्साहाच्या भरात त्याकडे दुर्लक्ष करून काही अतिउत्साहींनी त्या असुरक्षिततेच्या सावटास आव्हान देण्याचे धाडस केले आणि आनंदाची अखेर शोकान्तिका झाली!

संकटाची जी अनेक अन्य कारणे असतात, त्यामध्ये बेपर्वाई, भ्रष्ट यंत्रणा आदींचाही हातभार असतो, असेही अनेकदा दिसून आले होते. काही वर्षांपूर्वी एका पावसाळ्यात कोकणातील चिपळूणजवळ एक संपूर्ण गाव एका फुटलेल्या बंधाऱ्याच्या लोंढ्यात नाहीसे झाले तेव्हा, खेकड्यांनी बंधारा पोखरल्याचे अजब कारण देत याच यंत्रणांनी संकटाचे खापर निसर्गावर फोडण्याचा प्रयत्न केला होता. गेल्या वर्षी मे महिन्यात मुंबईत घाटकोपर येथे एक अजस्र जाहिरात फलक अनपक्षितपणे कोसळला आणि सुरक्षिततेच्या भावनेने त्याच्या आश्रयास गेलेल्या १६ जिवांचा त्या संकटाने बळी घेतला. दैनंदिन जीवनात सुरक्षा व्यवस्थांची वारंवार तपासणी आणि विकासाच्या प्रक्रियेतून समोर येणाऱ्या आव्हानांचे भान राखण्याची गरज त्या वेळीदेखील अधोरेखित झाली होती. २०१६ मध्ये कोलकाता येथे उड्डाणपूल कोसळला, २०२२ मध्ये गुजरातेतील मोरबी पूल कोसळला, हे पाहता, सार्वजनिक पायाभूत सुविधा सुरक्षित राहतील याची खबरदारी घेण्याची व सुरक्षिततेच्या उपायांना प्राधान्य देण्याची कोणतीही गरज ही मानवी जीवनास आपण किती प्राधान्य देतो त्यावर बेतलेली असते. योग्य वेळी योग्य उपायांची आखणी, वैयक्तिक खबरदारी बाळगणे याचा अभाव बळावत चालल्याने, जेथे या साधनांचा अभाव असेल तेथेच आव्हाने देण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे, संकटे कोसळल्यानंतर त्याच्या जबाबदारीचे खापर फोडण्याआधी आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे झाले आहे. त्याचा अभाव वाढत आहे ही खरी काळजीची बाब आहे.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# ड्रॅगनला सडेतोड उत्तर

शेजारील देशांद्वारे चीन भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेश, मालदीव आणि पाकिस्तान ही याची ठळक उदाहरणे. भारतानेही चीनला आता त्याच्याच भाषेत उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. फिलिपिन्सला ब्रह्मोस क्षेपणास्त्र दिल्यानंतर भारताने आता चीनच्या दुखऱ्या नसीवर बोट ठेवले आहे. भारतीय सैन्य चीनच्या मागच्या अंगणात लष्करी सराव करत आहे. मंगोलिया हा देश भारत आणि चीनमधील प्रभावासाठी एक नवी युद्धभूमी म्हणून उदयास येत आहे. चीनने रशियासह मंगोलियाशी त्रिपक्षीय करार करताच भारताने या मध्य आशियाई देशासोबत लष्करी सराव सुरू करून मंगोलियाशी वेगाने लष्करी संबंध निर्माण करण्यास सुरुवात केली. भारत आणि मंगोलियातील वार्षिक द्विपक्षीय लष्करी सराव अर्थात 'नोमॅडिक एलिफंट २०२५'ची सतरावी आवृत्ती ३१ मे रोजी सुरू झाली, तर याच्या एक दिवस आधी मंगोलियाने चीन आणि रशियासोबत सहकार्य करार केला. मंगोलियन सैन्याने भारतीय सैन्यासोबत संयुक्तपणे लष्करी कवायती सुरू करताच चीन संतापला. चीनने या 'राजनयिक स्वातंत्र्या'विरोधात मंगोलियाला इशारा दिला आहे. एका चिनी माध्यमाने धमकी दिली आहे की, भारतासोबतच्या या डावपेचांमुळे रशिया ते चीनपर्यंतच्या 'पॉवर ऑफ सायबेरिया २' पाईपलाईन प्रकल्पाबाबत संशयाचे सावट निर्माण झाले आहे. ही पाईपलाईन मंगोलियातून जाणार आहे. चीनला भीती आहे की मंगोलियाशी चांगले संबंध निर्माण करून भारत मंगोलियातून जाणाऱ्या या पाईपलाईनचा वापर चीनविरुद्ध करू शकेल. ही पाईपलाईन रशियाहून मंगोलियामार्गे चीनमध्ये ५० अब्ज घनमीटर गॅस वाहून नेणार आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे १०० अब्ज डॉलर्स आहे.

भारत-मंगोलियामधील संरक्षण सहकार्य ही काही नवी बाब नाही. 'नोमॅडिक एलिफंट'सारखे सराव वर्षानुवर्षे सुरू आहेत; परंतु सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीत त्याचे महत्त्व खूप वाढले आहे. हा लष्करी सराव मंगोलियाची राजधानी उलानबातर येथील विशेष दल प्रशिक्षण केंद्रात होत असून, त्यात दहशतवादविरोधी सराव, संयुक्त ऑपरेशन्स आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांच्या सिम्युलेशन क्रियाकलापांचा समावेश आहे. भारत मंगोलियाशी केवळ लष्करीच नाही, तर आर्थिक आणि धार्मिक संबंधदेखील मजबूत करत आहे. चीनमधील दुसऱ्या क्रमांकाचे सरकारी माध्यम असलेल्या 'चायना न्यूज सर्व्हिस'मध्ये प्रकाशित झालेल्या एका लेखात १८४०-४२ च्या अफू युद्धात गमावलेले प्रदेश परत मिळवण्याच्या चीनच्या प्रतिज्ञेचा उल्लेख करण्यात आला होता. म्हणजेच चीनची नजर मंगोलियावरही आहे आणि भविष्यात तो ते ताब्यात घेऊ शकतो. लेखात म्हटले आहे की,



मंगोलियाला चीन ऐतिहासिकदृष्ट्या आपला एक भाग मानतो. चीन २०४५ ते २०५० दरम्यान मंगोलिया ताब्यात घेण्यासाठी लष्करी हल्ला करू शकतो.

२०१६ मध्ये तिबेटी आध्यात्मिक नेते दलाई लामा यांनी मंगोलियाची राजधानी उलानबातरला भेट दिली, तेव्हा संतप्त चीनने मंगोलियाविरुद्ध अनेक कठोर पावले उचलली. मंगोलिया हा एक भूपरिवेष्ठित देश आहे. याचा फायदा घेत चीनने मंगोलियासाठी एक अतिशय महत्त्वाचा मार्ग बंद केला. याशिवाय चीन आणि मंगोलियामधील वस्तूंच्या आयात-निर्यातीवर शुल्कदेखील लादले. मंगोलिया त्याच्या गंभीर आर्थिक समस्यांना तोंड देण्यासाठी चीनशी कर्जाच्या वाटाघाटी करत होता; परंतु चीनने कर्जावर चर्चा करण्यासाठी झालेल्या वाटाघाटीदेखील थांबवल्या. मंगोलियाला बीजिंगकडून ४.२ अब्ज डॉलर कर्ज मिळण्याची आशा होती. चीनला मंगोलिया आपल्या छत्राखाली राहावे असे वाटते; परंतु मंगोलिया आता राजनयिक स्वातंत्र्य शोधत आहे. त्यासाठी त्याला भारतासारख्या भागीदारांची गरज महत्त्वाची वाटते; परंतु मंगोलियाची सर्वांत मोठी समस्या म्हणजे चीनवरील त्याचे आत्यंतिक अवलंबित्व. आजही या देशाचे चीनवर सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त आर्थिक अवलंबित्व आहे तर ऊर्जा आणि पायाभूत सुविधांसाठी तो रशियावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याची परिस्थिती कठीण आहे. तिथे त्याला राजनयिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे; परंतु दोन महासत्तांच्या आर्थिक पकडीतून बाहेर पडणे कठीण आहे.

मंगोलिया चीन आणि रशियापासून तुटलेला राहू शकत नाही; परंतु भारतासोबतचे त्यांचे धोरणात्मक सहकार्य चीनसाठी चिंतेचा विषय बनल्याचा इशारा चीनने लेखात दिला आहे. भारताचे मंगोलियाशी मजबूत संबंध आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये मंगोलियाला भेट दिली होती. भारताने मंगोलियाला एक अब्ज डॉलर्सची कर्ज मदत दिली. मोदी यांनी मंगोलियाच्या संसदेत भाषण केले आणि असे करणारे ते पहिले परदेशी नेते बनले. त्यानंतर २०१९ मध्ये भारत आणि मंगोलियाने अंतराळ करारावर स्वाक्षरी केली. याशिवाय २००९ मध्ये भारत आणि मंगोलियामध्ये नागरी अणु करार झाला. भारत-मंगोलिया संयुक्त कार्यगट दरवर्षी बैठका घेतो. आता तर मंगोलिया भारत आणि चीन या दोघांसाठीही धोरणात्मक युद्धाचे केंद्र बनला आहे; परंतु फरक असा आहे की, भारत तेथे भागीदारी आणि आदराचे मॉडेल सादर करत आहे, तर चीन दबाव आणि भीतीचे वातावरण निर्माण करत आहे. मंगोलियाला कोणाचे समर्थन करायचे हे ठरवायचे आहे; परंतु हे स्पष्ट झाले आहे की भारत आता हिमालयापुरता मर्यादित नाही, तर त्याने मंगोलियामध्येही धोरणात्मक उपस्थिती नोंदवली आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करत असते. तसेच भारतीय सैन्य इतर देशांसोबत लष्करी सराव करते.

भारतीय लष्कराचे एक पथक अलिकडेच बहुराष्ट्रीय लष्करी सरावात सहभागी होण्यासाठी मंगोलियाला पोहोचले. भारतीय लष्कराच्या या तुकडीत ४० सैनिकांचा समावेश आहे. त्यात प्रामुख्याने कुमाऊँ रेजिमेंटच्या बटालियनचे सैनिक आहेत. खान क्वेस्ट नावाचा हा संयुक्त सराव आहे. मंगोलियाला पोहोचलेल्या भारतीय संघात महिला जवानांचाही समावेश आहे. हा सराव मंगोलियन सशस्त्र दल आणि 'यूएस इंडो-पॅसिफिक कमांड' यांच्या सहकार्याने आयोजित केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्याच्या मोहिमांसाठी सहभागी देशांच्या सैन्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना परस्पर समन्वय, ऑपरेशन्स आणि सहकार्यात चांगले बनवणे हे खान क्वेस्ट सरावाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हा सराव जागतिक शांतता राखणे आणि मानवतावादी मदतकार्यासाठी सैनिकांना तयार करतो. भारत दरवर्षी खान क्वेस्ट सरावात आपले सैन्य पाठवतो. भारतीय सैन्याच्या सहभागावरून दिसून येते की, भारत जागतिक शांतता राखणे आणि बहुपक्षीय लष्करी सहकार्याला महत्त्व देतो. या सरावामुळे भारतीय सैन्याला विविध देशांच्या सैन्यासोबत जवळून काम करण्याची आणि आंतरराष्ट्रीय लष्करी मानके स्वीकारण्याची संधी मिळते. २०२४ मध्ये भारतीय सैन्याच्या राजपुताना रायफल्स युनिटने या सरावात भाग घेतला होता. पहिल्यांदा २००३ मध्ये अमेरिका आणि मंगोलियन सशस्त्र दलांमधील द्विपक्षीय कार्यक्रम म्हणून हा सराव सुरू झाला. त्यानंतर, २००६ पासून हा सराव बहुराष्ट्रीय शांतता राखण्याच्या सरावात रूपांतरित झाला. यंदा त्याची बाविसावी आवृत्ती आहे. जगातील अनेक देशांचे सैन्य त्यात भाग घेत असताना भारताने घेतलेला भाग चीनला खुपतो आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# स्थानिक निवडणुकांचे डिजिटल स्वरूप

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना काढण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला दिला आहे. ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणी संदर्भात न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर २०२२ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. तसेच या संस्थांच्या प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासकीय अधिकारी सांभाळत आहेत. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया चार महिन्यांच्या आत पूर्ण करण्यास न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सांगितले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाल्याने आता सर्वच राजकीय पक्षांमध्ये कार्यकर्त्यांच्या कार्यशाळा, निवडणूकपूर्व बैठकी, नाराज पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश, निवडणुकांची लगबग पाहायला मिळत आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक प्रस्तावित असलेल्या महानगरपालिकांकडे तयारी संदर्भात माहिती मागवली आहे. ईव्हीएम, स्ट्राँग रूमच्या व्यवस्थेसंबंधी पत्राद्वारे विचारणा केली आहे, तर दुसरीकडे सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. राज्यातील नेतेमंडळी वेगवेगळ्या जिल्ह्यात जाऊन प्रचार करताना दिसून येत आहेत. माजी आमदारांच्या पक्षप्रवेशाच्या जाहीर सभांतून आरोप-प्रत्यारोप सुरू असल्यामुळे काही दिवसांत प्रचाराची रंगत वाढणार हे नक्की. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीला देशात व अनेक राज्यांत यश मिळाले. आता महानगरपालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकीत मतदारांचा दृष्टिकोन स्थानिक समस्यांवर असतो. शहर व गावातील गल्ल्यांतून जाणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनपासून ते घराघरापर्यंत येणाऱ्या कचऱ्याच्या घंटागाडी, नाल्यांची साफसफाईची अपेक्षा मतदार मतदानाच्या आठवडाभरअगोदर बोलून दाखवितात. पक्षातील योग्य कार्यकर्त्यांची बुथनिहाय बांधणी केली, विश्वासार्ह चेहरा दिला आणि जागावार निवडून येणाऱ्या उमेदवरांची शाश्वती, योग्य रणनीती आखली, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सहज विजय मिळवता येतो. या पृष्ठभूमीवर संयमित रणनीती व जनतेच्या भावनांना हात घालणारे नेतृत्व दिले गेले, तर विरोधातील उमेदवार देखील येथे आपली छाप सोडू शकतात. जातिपातीत अडकून न राहता, विकासावर भर देणाऱ्या आणि स्थानिकांशी थेट संवाद साधणाऱ्या उमेदवारांना येथे चांगली संधी असते.

लोकशाहीमध्ये निवडणूक ही एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून आधुनिक काळात यात मोठे बदल झाले आहेत. पूर्वी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्यक्ष जनसंपर्क, जाहीर सभा, भिंतीवरचे पोस्टर, ऑटोरिक्षा, घोडागाडी आणि नेत्यांच्या प्रचार यात्रा या प्रमुख साधनांचा वापर केला जात असे. मात्र २१व्या शतकाच्या सुरुवातीला विशेषत: इंटरनेट, भ्रमणध्वनीच्या आधुनिक क्रांतीनंतर निवडणुकीचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले. प्रचाराच्या पारंपरिक साधनांच्या जोडीला डिजिटल साधनांची भर पडली. हा प्रचाराचा असा प्रकार आहे, ज्यामध्ये सोशल मीडिया, मोबाईल ॲप्स, व्हॉट्सॲप सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो. आजच्या काळात निवडणुकीत केवळ पोस्टर आणि भाषणं पुरेशी नसतात. लोक मतदार म्हणून विचारपूर्वक निर्णय घेतात. डिजिटल निवडणुकीचा जागतिक इतिहास पाहिला तर अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी २००८ मध्ये सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला होता. त्यांनी या माध्यमातून लोकांशी थेट संवाद साधत डिजिटल क्रांतीचा पहिला प्रभावी उपयोग केला. भारतात माध्यमांचे पहिले प्रभावी दर्शन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत घडले जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने 'अब की बार, मोदी सरकार' ही डिजिटल मोहीम जोरात चालवली. सोशल मीडियावर ट्रेंडिंग, विशेष मोबाईल ॲप्स, फेसबुक लाईव्ह आणि लाखोंच्या मेसेजिंगच्या माध्यमातून त्यांनी आपली प्रतिमा देशभर पोहोचवली. 'डिजिटल इंडिया'ची जाणीव त्यांनी निवडणुकीतूनच जनतेत रुजवली. त्या निवडणुकीत विविध पक्षांनी डिजिटल रणनीती वापरली. भाजपासह शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने देखील फेसबुक पेज, यूट्यूब चॅनेल, इन्स्टाग्राम प्रोफाईल्सचा वापर करून तरुणांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागातसुद्धा मोबाईल, इंटरनेटच्या वाढलेल्या वापरामुळे डिजिटल प्रचाराने महत्त्वाचे स्थान मिळवले. डिजिटल इलेक्शनचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे सिनेमा, कला किंवा सोशल मीडियावर प्रभाव असलेल्या लोकांमार्फत निवडणूक प्रचार करण्यात येतो. यामुळे त्यांचा प्रभाव त्यांच्या फॉलोअर्सवर होतो. आजची निवडणूक डिजिटल रणभूमीवर लढली जाते. मतदान मशीनवर होत असले तरी जनमत बनवण्यासाठी डिजिटल प्रचार जोरात सुरू आहे.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# माहिती-तंत्रज्ञानातील रोजगारांचे आव्हान

२००० सालच्या प्रारंभी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान या विषयांच्याच जोडीला माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विषयातील पदवीधर उमेदवारांना चांगली, मनासारखी व आकर्षक पगाराची नोकरी सहज मिळत असे. त्यामुळे या क्षेत्रातील पदवी आणि पदवीधरांना करीअरपासून नोकरीपर्यंत प्राधान्य दिले जाई. मात्र, गेल्या पाच वर्षांत परिस्थिती बदलली आहे. या बदलांसाठी सकृद्दर्शनी जागतिक मंदी, कोरोनानंतरचे बदलते कामकाज आणि कार्यसंस्कृती, वाढत्या संगणकीकरणासह वाढलेली स्पर्धा, बदलती अर्थव्यवस्था व व्यावसायिक गणितं ही प्रमुख कारणे सांगितली जात असतानाच, त्यात भर पडली ती कृत्रिम बुद्धिमतेची. अल्पावधीत, पण मोठ्या प्रमाणात झालेल्या या बदलांचा अभ्यास धक्कादायक व अभ्यास करण्यासारखा ठरतो तो याचमुळे.

माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्र जेव्हा व्यवसाय-व्यवस्थापन क्षेत्रात विशेष प्रकाशझोतात होते, तेव्हा त्याची व या क्षेत्रातील रोजगारांची सर्वदूर व प्रतिष्ठेसह चर्चा होत असे. अगदी शैक्षणिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून करीअर-रोजगार व वैयक्तिक आयुष्यात स्थिरता येण्याच्या दृष्टीने माहिती-तंत्रज्ञान हे अव्वल क्षेत्र समजले जाई. असे होण्यामागची कारण परंपरा म्हणजे, ९० सालच्या दशकासोबत संगणक क्षेत्राला आलेली व्यावसायिक समृद्धी आणि त्याचदरम्यान झालेले जागतिकीकरण व जागतिक पातळीवरील खुली आर्थिक व व्यापार व्यवस्था. या बदलत्या स्थितीचा मोठा फायदा भारतीय संगणक उद्योग व या क्षेत्रातील शिक्षित-प्रशिक्षित उमेदवारांना स्वाभाविकपणे झाला. भारतातील उपलब्ध कौशल्य व संगणकीयतज्ज्ञ आणि उद्योगांची कर्तबगारी यामुळे अमेरिकेसह युरोप व प्रगतिशील देशांनी आपल्या वाढत्या संगणकीय गरजांच्या पूर्ततेसाठी भारताला प्राधान्य देण्यास सुरुवात केली व भारतीयांनी त्याचे चीज केले. याच्या परिणामी भारतातील संगणक क्षेत्रातील रोजगार संधी वाढत गेल्या.

नंतरच्या टप्प्यात व विशेषतः कोरोना काळात परिस्थितीने जागतिक स्तरावर वेगळे वळण घेतले. इतर उद्योग-व्यवसाय क्षेत्राप्रमाणेच संगणक क्षेत्रात कामकाज व व्यवसायापासून कर्मचाऱ्यांच्या संख्येपर्यंत मोठीच उलथापालथ झाली. याचाच पहिला व महत्त्वाचा परिणाम म्हणजे, संगणक व माहिती-तंत्रज्ञानाचा आर्थिक व व्यावसायिक प्रभाव कमी होऊ लागला. त्याचा थेट व प्रत्यक्ष परिणाम प्रचलित कर्मचाऱ्यांचा विकास आणि वेतनापासून नव्याने उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या जवळजवळ नगण्य स्वरूपात



होण्यामध्ये झाला. हा बदल पाहणे व पचविणे अर्थातच जड गेले. एवढचे नव्हे, संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वच प्रस्थापित कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात कपात करण्यास सुरुवात केली. परिणामी, पूर्वी माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या एका प्रस्थापित कंपनीने एकाच दिवसात ५०० पर्यंत कर्मचाऱ्यांची कपात केली, तर नव्या कर्मचाऱ्यांच्या निवडीला अर्थातच थांबविण्यात आले. माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र क्षेत्रातील व्यवस्थापन-उद्योजक व कर्मचाऱ्यांनी हे संकट जेमतेम थोपवले. मात्र, व्यावसायिक परिस्थिती यथावत होत असतानाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व अंमलबजावणी सुरू झाली. याने विकसित संगणक तंत्रज्ञानापुढे मोठे आव्हान उभे केले. यामुळे अद्ययावत तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रातील अनेक प्रकारच्या कामांना बेकाम, तर ही कामे करणाऱ्यांना बेकार केले. हे परिणाम कंपन्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वच स्तरावर झाले. या परिणामांचे संख्यात्मक स्वरूप सांगायचे म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात २०१८ ते २०२१ या केवळ तीन वर्षांत नव्या कर्मचाऱ्यांची भरती ९५ हजारांनी कमी झाली. त्यानंतरही या संख्येत वाढ होत गेली व २०२३ साली हा आकडा दोन लाख ५० हजारांवर गेला. यालाच जोड मिळाली ती संगणक क्षेत्रातील कर्मचारी कपातीची.

परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती-तंत्रज्ञान उद्योगात आलेल्या व्यावसायिक व आर्थिक संकटांमुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील विशेषत: नवागत कर्मचाऱ्यांचे पगार व वेतनमान वाढणे तर दूर; पण ते जवळजवळ जैसे थे राहिले आहेत. ही बाब कर्मचारी व उमेदवारांसाठी निश्चितच काळजीची ठरली. कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील प्रस्थापित कंपनी असणाऱ्या टीमलीजने माहिती-तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रातील मानव व्यवस्थापन क्षेत्रात प्रामुख्याने काम करणाऱ्या व्यवस्थापन कंपनीने त्यादरम्यान केलेल्या कर्मचारी सर्वेक्षणानुसार, त्यादरम्यान २०१५ साली माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या उमेदवार कर्मचाऱ्यांचे २०१५ साली असणारे तीन लाख ५० हजार असणारे वार्षिक सरासरी वेतन २०२४ साली सुमारे तीन लाख ८० हजार रुपये होते. ही बाब संबंधित कंपन्यांपासून कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांसाठीच मोठा काळजीचा विषय ठरला.

तसे पाहता, गेल्या सुमारे दोन वर्षांत कृत्रिम बुद्धिमता या नवीन आयामाची चर्चा सुरू झाली. या नवीन तंत्राचा वापर आणि त्याचे माहिती-तंत्रज्ञानासह विविध व्यावसायिक क्षेत्रांवर होणारे परिणाम याची व्यापक चर्चा अद्याप सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमता व त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रावर झालेल्या परिणामांमुळे संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यमान कर्मचाऱ्यांवर नोकरी-रोजगार गमावण्याचे व या क्षेत्रातील नवागतांपुढे नोकरी-रोजगार न मिळण्याचे संकट निर्माण झाल्याचे यानिमित्ताने प्रचलित होत आहे. कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर व त्याचे प्रचलित कर्मचाऱ्यांचे रोजगार व नव्या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराच्या संधी हे आव्हानात्मक मुद्दे महत्त्वाचे असले, तरी त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र व तेथील कर्मचारी यांनी निराशेतून आपण सर्वस्व गमावले वा गमवावे लागणार, अशी नकारात्मक भावना घेण्याचे मुळीच कारण नाही. याचे महत्त्वाचे व प्रमुख कारण म्हणजे, संगणकशास्त्र व माहिती-तंत्रज्ञान या व्यवसाय क्षेत्राला संपूर्ण व समर्थपणे पर्याय बनण्याची क्षमता कृत्रिम बुद्धिमत्ता विषयात उपलब्ध झाली नाही व तसे १०० टक्के होण्याची क्षमता पण नाही. माहिती-तंत्रज्ञानातील प्रकल्प व्यवस्थापनापासून विशेष तांत्रिक स्वरूपाचे काम, तांत्रिक मुद्यांची सोडवणूक यासारखी मोठी व महत्त्वाची कामे संगणकशास्त्र विषयाशी संबंधित राहणार आहेत. एवढेच नव्हे, तर माहिती-तंत्रज्ञान विषयातील काम करणाऱ्यांनी आपले संगणकीय ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव याचा परिणामकारक व यशस्वी वापर केल्यास एक नवे कार्यक्षेत्र त्यांच्यासाठी उपलब्ध होण्याची आशादायी शक्यता आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## कामगार संघटनांची सत्त्व परीक्षा

भारतातील काही प्रमुख कामगार संघटनांनी २० मे २०२५ ला राष्ट्रव्यापी संपाचा निर्णय घेतला होता. या संपाला भारतीय मजदूर संघाने विरोध केला. मागण्या अवास्तव होत्या म्हणून नव्हे तर संप करण्याची ती योग्य वेळ नव्हती. २२ एप्रिल २०२५ ला पाकिस्तान समर्थित अतिरेक्यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे धर्म विचारून २६ पर्यटकांची हत्या केली. त्यामुळे देशातील वातावरण तापले होते. भारत सरकारकडून पाकिस्तानवर प्रतिहल्ल्याची अपेक्षा केली जात होती. भारत सरकारने देखील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत अतिरेकी आणि त्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी हल्ला केला. भारतातील सर्व राजकीय पक्षांनी केंद्र सरकार ला जाहीर पाठिंबा दिला आणि एकजुटीचे अविस्मरणीय प्रदर्शन घडवले. त्यानंतर केंद्र सरकारने ७ शिष्टमंडळे जागतिक स्तरावर भारताची भूमिका विशद करण्यासाठी पाठविली. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षांनी केले. देशात कामगारांची संख्या फार मोठी आहे. भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धात आपलाही सहभात असावा असे कामगारांना वाटणे स्वाभाविक होते. त्यामुळे त्यांचा २० मेच्या संपाला विरोधच होता. भारतीय मजदूर संघ संपात नाही म्हटल्यानंतर तसेही संप विरोधी वातावरण देशात तयार झालेच होते. संपाचे आवाहन करणाऱ्या संघटनांनी प्रतिकूल परिस्थितीचा वेध घेत संप मागे घेतला. योग्य वेळी योग्य पाऊल उचलले त्यामुळे झाकली मूठ सव्वा लाखाची राहिली कारण संप करण्याची मानसिकता कामगारांची नव्हतीच.

या निमित्ताने कामगार संघटनांच्या भूमिकेविषयी भाष्य करणे सयुक्तिक ठरेल. कामगारांच्या प्रश्नांकडे राजकीय चष्म्यातून बघू नये. आपले राजकीय हेतू साध्य करण्यासाठी कामगार शक्तीचा उपयोग करून घेऊ नये. कामगारांचे हित जोपासणे हे कामगार संघटनेचे कर्तव्यच आहे. पण त्या आधी राष्ट्रहित आणि उद्योगहिताला प्राधान्य दिले पाहिजे. बदलत्या परिस्थितीत कामगार संघटनांचे धोरण बदलण्याची गरज आहे. युद्धजन्य परिस्थितीत देखील कामगार संघटना संपाची नोटीस देतात याची चीड समाजाला निश्चित आली असेल. कामगार संघटनांनी यावर विचार करण्याची गरज आहे. अन्यथा कामगार संघटनांचे अस्तित्व धोक्यात यायला वेळ लागणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## वाचक पत्रे

### चॅनल्सवाल्यांनी प्रेक्षकांची फसवणूक करू नये

सध्या विविध चॅनल्सवर मराठी मालिका मोठ्या संख्येने सुरू आहेत. या मालिका बघताना चॅनल्सवाले प्रेक्षकांना मूर्ख समजत असावे, असे वाटते. स्क्रिप्ट लिहिणारी व्यक्ती एकच असावी असे वाटावे अशी एखादी कल्पना आणि एकसारखेच विचार सर्व मालिकांमध्ये फिरत असतात. दिवाळी, होळी, संक्रांत यांचे चित्रण सगळीकडे चालू असते आणि सण संपल्यानंतरही कित्येक दिवस तेच तेच साजरे होताना बघायला मिळते. आताही वटपौर्णिमा सर्व मालिकांमध्ये सुरू आहे व सत्यवान सावित्रीची गोष्ट तर आता ती आजपर्यंत माहीत नसणार त्यांना पण अगदी पाठ झाली असणार. शिवाय सर्व मालिकांमध्ये नवरे वडाची पूजा करताना दिसत आहेत. सर्व पतिराज एकाच प्रेरणेने भारावलेले!

याच अनुषंगाने म्हणावेसे वाटते की, कुठल्याही गोष्टीचा अतिरेक करून टीव्ही रसिकांचा कंटाळा वाढत जाईल इतकंही ताणू नये. ज्येष्ठ नागरिकांसाठी टाईम पास म्हणून दूरदर्शन एक माध्यम असू शकते. पण असे प्रकार पाहून त्यांचा किती कंटाळा वाढवायचा? मालिकेची जास्तीत जास्त लांबी वाढेल म्हणून केलेले असले प्रयत्न असू नयेत. वर्षानुवर्षे त्या सुरू ठेवू नयेत. आपण दूरदर्शनवर असे कार्यक्रम बघणे म्हणजे आपला मूर्खपणा आहे असे सर्व प्रेक्षकांनी समजावे का?

**गौरी पटवर्धन**/नागपूर

### सुंदर आयुष्य जगावे

विवाहित अगर अविवाहित, बाल्य अथवा युवा, तरुण किंवा वृद्ध प्रत्येकाने परमेश्वराने दिलेल्या कर्मसिद्धांत व पूर्वजन्म सिद्धांतानुसार मनुष्य जन्म आनंदाने स्वीकारावा व त्याचे सोने करून सुंदर आयुष्य जगावे. आलेली संधी जीवनात चित्रपटाप्रमाणे रिटेक होत नाही आणि मग पश्चात्ताप होतो. जीवनात शिस्त हवी. निष्काळजीपणा, कंटाळा, व्यसने, राग, अरसिकता, श्रीमंतीचा उन्माद या गोष्टी दूर केल्या तरच जीवन सुंदर बनते. कलियुगात आपल्यातील नकारात्मक शक्ती सहजासहजी जात नाही. त्यामुळे भक्ती कितीही केली तरी श्रद्धा-सबुरीनेच पुढे जावे लागते. कारण पूर्वजन्मीच्या कर्माचा अर्थात पापांचा निचरा सहजासहजी होत नाही. सगळ्या गोष्टी उपलब्ध झाल्या तरी विश्रांती, संवाद, समाधान आणि आनंदासाठी मानसिक थकवा दूर व्हावा लागतो. दुसऱ्याच्या कामात लुडबुड कमी केली तरीही उत्साह वाढतो. एक कायम लक्षात ठेवावे पाव्याच्या अंगावर काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडरिपु मीपणाच्या अहंकारापासून दूर आहेत म्हणूनच तो मंजुळ स्वर देतो आणि परमेश्वराच्या अधरावर लीन होऊन बोलतो. असे प्रत्येक जण जीवन जगेल तर भगवंताला तो नक्कीच प्रिय राहील; यासाठी सुंदर आयुष्य जगावे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

## सेटलमेंटमधील दोघे सखखे भाऊ दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ जून -**

सेटलमेंटमधील गुन्हेगार दोघे सखखे भाऊ दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या सूचनेनुसार पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिले आहेत.



विनोद सिद्राम जाधव (वय ३३) आणि विजय उर्फ सागर सिद्राम जाधव (वय २८, दोघे रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ३, हुसेनबाबा दर्गाजवळ, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. विनोद जाधव याच्याविरुध्द सन २०२३ व २०२४ या कलावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करून दंगा व मारामारी करणे, घातक शस्त्राचा वापर करून मारहाण करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. तर त्याचा भाऊ विजय जाधव याच्याविरुध्द सन २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये दंगा व मारामारी करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे या दोघांविरुध्द तडीपारीची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सलगर वस्ती पोलिस ठाण्याने पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत विनोद व विजय या दोघांना सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

# जिल्ह्यात जूनच्या पंधरवड्यात पावसाची 'सेन्चुरी'

- आता पावसाने उघडीप दिली तरच उर्वरित पेरण्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

अनेक वर्षांचे प्रचलित आडाखे मोडून काढत यंदा मे महिन्यातच सोलापुरातच नाहीतर अवघ्या राज्यात दाखल झालेला अवकाळी आणि मान्सूनचा पाऊस शेतकऱ्यांसाठी खास ठरला. तर जून महिन्यातही पावसाने दमदार हजेरी लावत सोलापूर जिल्ह्यात सरासरी १००.९ मिलिमीटर पाऊस पडला. यामुळे सध्यातरी पावसाची शेतकऱ्यांची चिंता मिटली आहे मात्र खरिपाच्या पेरणीसाठी आता पावसाने उघडीपही देणे महत्वाचे आहे.

अवकाळी पावसाने मे महिन्यात धिंगाणा घातल्याने त्याचा परिणाम पेरणीवर झाला आहे. जिल्ह्यात खरीप पेरणीसाठी ३ लाख ३७ हजार ९६८ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर सरासरी पेरणी होत असते. दरम्यान, मे महिन्यात मुसळधार पाऊस झाल्याने वापस्याअभावी जिल्ह्यात अवघ्या ५७ हजार ४७४ हेक्टर क्षेत्रावर १७ टक्केच पेरणी झाली आहे.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बी-बियाणांची सांगड घातली आहे मात्र जमिनीतील ओलच हटत नसल्याने पेरण्यांना अडचण होत आहे. तरीही जिल्ह्यात आजतागायत उत्तर सोलापूर तालुक्या १६९३ हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली असून, द. सोलापूर १७८५.६ हे., बार्शी १४ हजार ६४०.५ हे., अक्कलकोट ६०६२.५, मोहोळ १६७५, माढा १२००, करमाळा १२१६५, पंढरपूर ४४५, सांगोला ११२३१, माळशिरस ३०३२, मंगळवेढा ३४४४ हे. वर पेरणी झाली तर जिल्ह्यात ५७ हजार ४७४ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील द्राक्ष, केळी, डाळिंब, आंबा बागांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची आर्थिक गणितं बिघडली आहेत. या परिस्थितीत, शेतकऱ्यांना शासनाने मदतीचा हात देण्याची गरज जाणकार शेतकरी बोलून दाखवित आहेत. दरम्यान, मे महिन्यात 'अवकाळी'ने जिल्ह्यातील ३२४४० शेतकऱ्यांचे २१९८८ हेक्टरवरील नुकसान केले असून, या नुकसानीचा अहवाल २ दिवसात शासनाकडे सादर केला जाणार आहे.

१५ मे ते ३० मे पर्यंत यंदा २३० मिलीमीटर इतका उच्चांकी पाऊस झाला आहे. या पावसाबरोबर वादळी वारे आणि विजांमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. या कालावधीत जिल्ह्यात अतीपावसाने भिंती पडून २ जणांचा मृत्यू झाला होता तर १ जणाचा वीज पडून मृत्यू झाला होता. इतकेच नाहीतर अनेकांच्या घरांची पडझड झाली होती तर काहीजणांची जनावरेही दगावली होती. याचबरोबर अनेक शेतकऱ्यांचे आंबा, पपई, केळी, द्राक्ष, भुईमुग, कागदी लिंबू, कलिंगडे आदी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाने गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतली आणि आता पावसाचा पुन्हा जोर वाढला आहे. या पावसाने अतिरेक केला तर मात्र खरिपाच्या पेरण्याची अडचण होण्याची भीती जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### तालुकानिहाय नुकसानीची स्थिती अशी

जिल्ह्याच्या कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार पावसाची तालुकानिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे. (आकडे मिमी मध्ये आहेत) उत्तर सोलापूर ९१.७, द. सोलापूर १६४.७, बार्शी १११.०, अक्कलकोट ११७.८, मोहोळ ९६.५, माढा ८१.८, करमाळा ७१.१, पंढरपूर ५३.३, सांगोला १०२.२, माळशिरस १०५.१, मंगळवेढा १५०.९ असा जिल्हाभरात सरासरी १००.९ मिमी इतका पाऊस नोंदला गेला तर पुणे विभागात ९२.९ मिमी इतका पाऊस नोंदला गेला आहे.

### पावसाने उसंद दिली तरच तिफन होणार चालू

जूनच्या सुरूवातीला पावसाने विश्रांती घेतल्याने काही भागात जमिनीचा वापसा झाला आणि तब्बल १७ टक्के जिल्ह्यात पेरणी झाली. मे महिन्यात पडलेल्या पावसाचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार असून, यामुळे यंदा शेतीत पीक चांगले येईल, असा अंदाजही कृषी अभ्यासक आणि जाणकार शेतकरी सध्या तरी बांधत आहेत. दरम्यान, अजून ८३ टक्के पेरण्या शिल्लक असल्याने पावसाने यासाठी उघडीप देण्याचीही तितकीच गरज आहे.

# दगडी पाटी काळाच्या ओघात हरवली त्याची जागा मोबाईल अन् मॅजिक स्लेटने घेतली

- आजच्या डिजिटल युगात शिक्षणाचे होतेय आधुनिकीकरण
- विद्यार्थ्यांना स्मार्ट बनविण्यासाठी प्रत्यक्षकृतीची अन् अनुभवाची गोडी हरवली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून**

आज १६ जून शाळेचा पहिला दिवस... उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्या, अन् शाळा सुरू झाल्या ! शाळा म्हटलं की आठवण येते ती हातातल्या दगडी पाटीची, अन् पाटीवरील पेन्सिलची...! पण आता काळ बदलत चालला आहे. नव्या पिढीच्या हाती आता दगडी पाटी ऐवजी वह्या आणि पेन आले आहेत. त्यामुळे शिक्षणातील एक जुनी आणि गोड परंपरा इतिहासजमा झाली आहे.

दरम्यान, यापूर्वी शाळेत जाण्याचा पहिला दिवस म्हणजे नवी पाटी, खडू, पाटीवर लिहिलेला श्रीगणेशा आणि त्या पाटीच्या लाकडी चौकटीचा सुगंध हे सगळं प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आठवणीत आजही ताजं आहे. दगडी पाटीवर लिहून, पुन्हा पुसून, व पुन्हा लिहिण्याची मजा काही औरच - होती. पण आता प्लास्टिकच्या किंवा मॅजिक स्लेट, वह्या, मोबाईल, टॅब यासारखी साधने आली आणि दगडी पाटी मागे पडली.



पूर्वी मण्यांची पाटी, वही-पेन यांचा वापर होत असे. आता मोबाईल, मॅजिक स्लेटसारखी साधने वापरली जात आहेत. मॅजिक स्लेटवर बोटांनी लिहिता येते, लिहिलेले सहज पुसता येते. मात्र या स्लेटवर अक्षरे स्पष्ट दिसत नाहीत, टिकाऊपणाही कमी आहे, असे पालकांचे म्हणणे आले आहे.



मात्र जुन्या शिक्षण पद्धतीचे आता आधुनिकीकरण होत असून नव्या शिक्षणपद्धततीत त्याचे रूपांतर होत आहे. पारंपरिक अध्ययन अध्यापन पद्धती बाजूला ठेवून शिक्षक विद्यार्थी आता डिजिटल युगांमध्ये डिजिटल शिक्षण पद्धतीचा अवलंब करत आहेत.

प्रोजेक्टर व मॅजिक स्लेट यांसारख्या माध्यमांमधून विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनाची गोडी लावली जात आहे. यापूर्वी शाळेतील गुरुजी विद्यार्थ्यांना पाठीत धपाटा घालून पाढा शिकवायचे, परंतु आता काळ बदलला असून काळानुरूप डिजिटलायझेशन द्वारे शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. अशातच आता अबॅकस अशा अनेक पद्धतीचे क्लासेस देखील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत आणि बुद्धिमत्तेत भर घालत आहेत. मात्र जुने तेच सोने, छडी लागे छम छम विद्या येई घमघम या उक्तीप्रमाणे पाटी पेन्सिलवरील जुने शिक्षण हे अजूनही आपल्या अस्तित्व टिकवून आहे. एवढे मात्र नक्की!

### पाटीवर लिहिण्याची मजा काही औरच

आमच्या काळात पाटीवर लिहिण्याची मजा काही औरच होती. पाटी फुटली की रुसवे-फुगवे व्हायचे, पण त्या आठवणी कायमच्या आहेत. आजच्या मुलांना ती मजा कळणारच नाही.

**-शितल जाधव, माजी विद्यार्थी**

### जुन्या साधनांची गोडी हरवली

मॅजिक स्लेटवर लिहिणं सोपं असलं तरी अक्षरे नीट दिसत नाहीत आणि ती फार काळ टिकतही नाही. मोबाईलवर शिकणं सोयीचं आहे, पण जुन्या साधनांची गोडी हरवली आहे.

**-गजानन पवार, पालक**

### बदलत्या काळातील शिक्षण

शाळेतील दगडी पाटी काळाच्या ओघात मागे पडली असली, तरी तिच्या आठवणी आजही अनेकांच्या मनात ताज्या आहेत. डिजिटल युगात मोबाईल, टॅब, मॅजिक स्लेट यासारखी साधने शाळांमध्ये आली आहेत. यामुळे शिक्षण अधिक सुलभ, आकर्षक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम झाले असले, तरी जुन्या साधनांची गोडी आणि अनुभव मात्र शोधूनही सापडत नाही.



## जेवणाची ऑर्डर रद्द केल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

जेवणाची ऑर्डर रद्द केल्याच्या कारणातून मंगळवेढा येथील प्रिया ढाबा येथे तरुणाला मारहाण करण्यात आली. ही मारहाण शनिवारी दुपारी ४.३० वाजता झाली. तात्यासाहेब दत्तात्रय कोकरे (वय ३३, रा. ब्रम्हपुरी ता. मंगळवेढा) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. शनिवारी दुपारनंतर तात्यासाहेब हा मंगळवेढा येथील प्रिया ढाबा येथे जेवणासाठी गेला होता. त्याने तशी ऑर्डरही हॉटेलातील मजुराला दिली. परंतु काही कारणाने त्याने ती ऑर्डर रद्द केली. यामुळे हॉटेलचा मालक गोट्या गवळी चिडला, त्याने व इतर एक यांनी तात्यासाहेब यास पाईपने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून उदय सलगर याने सोमवारी सकाळी १०.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीचे बिगुल वाजले

**30 जूनला मतदान, 3 उमेदवार इच्छुक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

सोलापूर बार असोसिएशनच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून ३० जून रोजी मतदान होणार आहे. सध्या उमेदवारांनी गाठी भेटी,बैठका घेण्यावर भर दिला जात आहत. दरम्यान सोमवारी दुपारी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द केली असून १५०० सदस्य निवडणुकीत मतदान करतील. दि.१८ व १९ जून रोजी उमेदवारी अर्ज विक्री व स्वीकृती तर २३ व २४ जून रोजी अर्ज माघारी घेण्यासाठी मुदत दिली आहे.

बार अध्यक्षपदासाठी चारवेळा अपयश येवून पुन्हा पाचव्यांदा ॲड. राजेंद्र फताटे बार निवडणुकीत जोमाने कामास लागले आहेत.बार सदस्याच्या गाठीभेटी, बैठका घेण्यावर भर दिला जात आहे. तर तीन वेळा अध्यक्ष पदाची धुरा संभाळलेले ॲड.घोडकेही चौथ्यांदा अध्यक्षपदासाठी निवडणुकीत रिंगणात उभे राहणार असल्याची चर्चा बार सदस्यांमध्ये सुरु आहे. बारच्या अध्यक्षपदासाठी तिघे उमेदवार इच्छुक आहेत. यामध्ये ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. बाबासाहेब जाधव व ॲड. शिवशंकर घोडके यांचा समावेश आहेत. ॲड. घोडके हे यापूर्वी तीनवेळा अध्यक्ष पदाची धुरा सांभाळली आहे, ते आता बारच्या अध्यक्ष पदासाठी चौथ्यांदा इच्छुक असल्याची चर्चा वकिल वर्गांमध्ये सुरु आहे. ॲड. फताटे यांनी अध्यक्ष पदाची तीनवेळा निवडणुका लढल्या,पण प्रत्यक्षात अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत त्यांना यश मिळाले नाही. त्यांनी एकदा उपाध्यक्ष म्हणून एक टर्म पूर्ण केली आहे. ॲड. जाधव पहिल्यांदाच अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उभारले आहेत. बार असोसिएशनची सोमवारी पारूप मतदार यादी दुपारी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये १५०० सदस्य बारच्या निवडणुकीसाठी आपला हक्क बजावणार आहेत. बारच्या निवडणुकीत सचिव पदासाठी ॲड. मंजूनाथ कक्कळमेली, ॲड. बसवराज हिंगमिरे, ॲड. विक्रम वडगावकर, ॲड. महेश गौडानवरू, उपाध्यक्षपदासाठी ॲड.रविराज सरवदे,ॲड. नागनाथ बिराजदार, ॲड. परवेज ढालायत,ॲड.रियाज शेख, खजिनदार पदासाठी ॲड. संतोषकुमार बाराचारे,ॲड. अरविंद देढे,सहसचिव पदासाठी ॲड.प्रियंका गोरंटी, ॲड. मीरा सिंग आदींचा समावेश आहे.

### मृत वारसांना मदतीचा प्रस्ताव मंजूर

सोलापूर बार असोसिएशन तर्फे सर्वसाधारण सभा घेण्यात आली. त्यावेळी विद्यमान पदाधिकाऱ्यांनी मृत वारसांना मदत व्हावी यासाठी २५ हजार रुपये मदत म्हणून देण्यात यावी असा प्रस्ताव विद्यमान सभासदांच्या मागणीनुसार सभेत ठेवला होता. त्या प्रस्तावास सर्व पदाधिकारी व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिली. विद्यमान अध्यक्ष ॲड. व्ही पी शिंदे,सचिव ॲड मनोज पामुल,खजिनदार ॲड. विनय कटारे, सहसचिव ॲड.निदा सैफन आदींचे अभिनंदन केले.

# अनुकंपा तत्वाखाली ७ सेवकांना दिले महापालिका आयुक्तांच्या हस्ते नियुक्ती आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून -**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आज अनुकंपा तत्वाखाली ७ सेवकांना आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी , जगनाथ केलूरकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते.आज एकूण ७ सेवकांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून त्यामध्ये १आरोग्य निरीक्षक, १ शिपाई, १ चावीवाला, १ आया, ३ मजूर सेवकांना नियुक्ती आदेश आज देण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागाने या नियुक्तीसाठीची प्रक्रिया नेटक्या पद्धतीने राबवली.





## ई-निविदा सूचना

मु.ता.ए. सोसायटीचे श्रीमती. जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, ता.-मु.नगर, जिल्हा-जळगाव-४२५३०६ महाविद्यालयासाठी PM-USHA अंतर्गत आयटी उपकरणांसाठी नोंदणीकृत पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा सूचना, तांत्रिक माहिती, अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या पोर्टलवर उपलब्ध असून सदरची ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे. तसेच सदरची ई-निविदा महाविद्यालयाच्या संकेत्तस्थळावर Website: www.sggkhadsecollege.ac.in फक्त माहितीस्तव उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परिपूर्णरित्या भरलेली ऑनलाईन स्वरूपातील ई-निविदा दि. २५/०६/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी जमा करावी. सदरची ई-निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबंधीची सूचना वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जा. क्र.:९२/२०२५-२६
दिनांक :१६/०६/२०२५

प्राचार्य

## जाहीर नोटीस

आर. टी. एस. अपील नं. 7 / 2025

सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारीसो क्र. 2 यांचे कोर्टात.....

वसुली अधिकारी,
सांगली अर्बन को-ऑप बँक लि. सांगली - अपेलंट
विरुध्द
बाळासाहेब बबन सिरसट - रिस्पॉंडंट
वगेरे 18

प्रस्तुतकामतील रिस्पॉंडंट नं. 6 कपिल बलभीम शिंदे, रिस्पॉंडंट नं. 7 गणपत दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 10 निकीता गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 12 गोकुळ दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 14 लक्ष्मी गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 18 भगवान दत्तात्रय शिंदे मयत तर्फे वारस गीता कुणाल जाधव यांना रजिस्टर पोष्टाने नोटीसा पाठवून दि. 25/03 /2025 रोजी मे. कोर्टात हजर राहणेस कळविले होते. परंतु वर नमूद रिस्पॉंडंट हे दिले पत्यावर राहत नाहीत असा शेरा मारुन नोटीसा परत आलेले आहेत. त्यामुळे जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस परवानगी मिळावी असा अर्ज केला होता तो अर्ज मंजूर झाला. त्यामुळे वर नमूद रिस्पॉंडंट यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, रिस्पॉंडंट नं. 6 कपिल बलभीम शिंदे, रिस्पॉंडंट नं. 7 गणपत दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 10 निकीता गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 12 गोकुळ दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 14 लक्ष्मी गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 18 भगवान दत्तात्रय शिंदे मयत तर्फे वारस गीता कुणाल जाधव यांचे विरुध्द जमीन महसूल अधिनियम कलम 247 नुसार जे प्रस्तुतचे आर. टी. एस. अपील नं. 7/2025 दाखल केलेले आहे त्याची सुनावणी ही दि.01/07/2025 रोजी नेमण्यात आलेली आहे.

तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत वर नमूद केले तारखेस दुपारी 3.00 वाजता आवश्यक त्या कागदपत्रांसह मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. 2, सोलापूर जुने जिल्हाधिकारी कार्यालय पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे उपस्थित रहावे. आपण नेमले तारखेस हजर न राहिलेस आपले गैरहजेरीत काम चालून एकतर्फी निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी. आजरोजी माझ्या सहीने कार्यालयीन शिक्यासह नोटीस दिली असे.

सोलापूर
दिनांक :- 10।06।2025 शिक्का
सही
उपविभागीय अधिकारी क्र. 2, सोलापूर

## जाहीर नोटीस

आर. टी. एस. अपील नं. 8 / 2025

सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारीसो क्र. 2 यांचे कोर्टात.....

वसुली अधिकारी,
सांगली अर्बन को-ऑप बँक लि. सांगली - अपेलंट
विरुध्द
बाळासाहेब बबन सिरसट - रिस्पॉंडंट
वगेरे 18

प्रस्तुतकामतील रिस्पॉंडंट नं. 6 कपिल बलभीम शिंदे, रिस्पॉंडंट नं. 7 गणपत दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 14 लक्ष्मी गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 18 भगवान दत्तात्रय शिंदे मयत तर्फे वारस गीता कुणाल जाधव यांना रजिस्टर पोष्टाने नोटीसा पाठवून दि. 25/03/2025 रोजी मे. कोर्टात हजर राहणेस कळविले होते. परंतु वर नमूद रिस्पॉंडंट हे दिले पत्यावर राहत नाहीत असा शेरा मारुन नोटीसा परत आलेले आहेत. त्यामुळे जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस परवानगी मिळावी असा अर्ज केला होता तो अर्ज मंजूर झाला. त्यामुळे वर नमूद रिस्पॉंडंट यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, रिस्पॉंडंट नं. 6 कपिल बलभीम शिंदे, रिस्पॉंडंट नं. 7 गणपत दत्तात्रय शिंदे, रिस्पॉंडंट नं. 14 लक्ष्मी गणपत शिंदे, रिस्पॉंडंट नं. 18 भगवान दत्तात्रय शिंदे मयत तर्फे वारस गीता कुणाल जाधव यांचे विरुध्द जामीन महसूल अधिनियम कलम 247 नुसार जे प्रस्तुतचे आर. टी. एस. अपील नं. 8 / 2025 दाखल केलेले आहे त्याची सुनावणी ही दि. 01/07/2025 रोजी नेमण्यात आलेली आहे.

तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत वर नमूद केले तारखेस दुपारी 3.00 वाजता आवश्यक त्या कागदपत्रांसह मे. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. 2, सोलापूर जुने जिल्हाधिकारी कार्यालय पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे उपस्थित रहावे. आपण नेमले तारखेस हजर न राहिलेस आपले गैरहजेरीत काम चालून एकतर्फी निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी. आजरोजी माझ्या सहीने कार्यालयीन शिक्यासह नोटीस दिली असे.

सोलापूर
दिनांक: 10/06/2025 शिक्का
सही
उपविभागीय अधिकारी क्र. 2, सोलापूर





## अुत्तम सेवा — मंगळवार दि. १७ जून २०२५ — नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **कल्याण डोंबिवली महानगरपालिका, KDMC** | | | |
| १ | स्टाफ नर्स (७८ पदे) | GNM / B.Sc. (नर्सिंग) व अनुभव | ३८ पर्यंत | ०३/०७/२५ |
| २ | कनिष्ठ अभियंता (७८ पदे) | पदवी (स्थापत्य/इले/मेकॅ) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | लिपीक (११६ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ४ | लेखा लिपीक (१६ पदे) | पदवी (वाजिण्य) व इंग्रजी-मराठी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ५ | औषध निर्माता (१४ पदे) | पदवी (फार्मसी) व २ वर्षे अनुभव | ३८ पर्यंत | |
| ६ | फायरमन (१३८ पदे) | दहावी व संबंधित कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ७ | उद्यान निरीक्षक (११ पदे) | पदवी (कृषी/हॉर्टि/बॉटनी/फॉरेस्ट्री) | ३८ पर्यंत | |
| २) | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| १ | संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा-२०२५ (१४५८२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०४/०७/२५ |
| ३) | **भारतीय तटरक्षक दल** | | | |
| १ | नाविक DB (५० पदे) | दहावी उत्तीर्ण पुरुष उमेदवार | २१ पर्यंत | २५/०६/२५ |
| २ | नाविक GD (५२० पदे) | बारावी (गणित/फिजिक्स) उत्तीर्ण | २१ पर्यंत | |
| ३ | यांत्रिक (६० पदे) | डिप्लोमा (इले/मेकॅ/इलेक्ट्रॉ/टेलीकम्युनिकेशन) उत्तीर्ण असावे | २१ पर्यंत | |
| ४) | **LIC हौसिंग फायनान्स लि. LICHFL** | | | |
| | ॲप्रेंटिस (२५० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | २८/०६/२५ |

✻ मोफत सरकारी अपडेट ✻
सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### इंग्लंड दौऱ्यासाठी भारताचा १९ वर्षांखालील संघ जाहीर

**नवी दिल्ली** : आगामी २४ जून ते २३ जुलै दरम्यान होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या १९ वर्षांखालील पुरुष संघाची घोषणा करण्यात आली असून संघाचे नेतृत्व आयुष म्हात्रे करणार आहे. अभिज्ञान कुंडू याला संघाचा उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. संघात डावखुरा फलंदाज वैभव सूर्यवंशी सुद्धा आहे. आदित्य राणा व खिलन पटेल हे दोघे दुखापतग्रस्त असल्यामुळे त्यांच्या जागी डी. दीपेश आणि नमन पुष्पक यांचा समावेश करण्यात आला आहे. या दौऱ्यात लॉफबरो विद्यापीठात वन-डे सराव सामना आणि त्यानंतर होव्ह, नॉर्थम्प्टन आणि वॉर्सेस्टर येथे पाच सामन्यांची युवा एकदिवसीय मालिका होणार आहे. इंग्लंड १९ वर्षांखालील संघाविरुद्ध अनुक्रमे बेकेनहॅम आणि चेम्सफोर्ड येथे दोन बहु-दिवसीय सामने देखील खेळले जातील. भारतीय १९ वर्षांखालील क्रिकेट संघ : आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा, मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (उपकर्णधार व यष्टिरक्षक), हरवंश सिंग (यष्टिरक्षक), आर. एस. अंबरीश, कनिष्क चौहान, हेनिल पटेल, मोहम्मद राधा, युधावराज, युधावराज, हेनिल पटेल. सिंग, डी. दीपेश, नमन पुष्पक. राखीव खेळाडू : वेदांत त्रिवेदी, विकास तिवारी, अलंकृत रापोले (यष्टिरक्षक).

### ऐश्वर्या पिस्से राष्ट्रीय दुचाकी रॅली विजेती

**नाशिक** : पेट्रोनास टीव्हीएस रेसिंगच्या ऐश्वर्या पिस्सेने पहिल्या टप्प्यात सुरुवातीच्या अडचणींवर मात केली आणि शेवटच्या टप्प्यात एका धमाकेदार खेळासह गमावलेला वेळ भरून काढला आणि येथे २०२५ च्या एफएमएससीआय दुचाकीच्या राष्ट्रीय रॅली स्पर्धेत महिला गटाचे विजेतेपद पटकावले. सुरुवातीच्या विशेष टप्प्यात तांत्रिक समस्यांमुळे जवळजवळ ४४ सेकंद गमावले असले तरी, भारताची एकमेव एफआयएम विश्वचषक विजेती आणि तीन वेळा विश्वविजेतीने लेडीज क्लासमध्ये खरी जिद्द आणि चॅम्पियनशिपची भावना दाखवली. सुरुवातीच्या पराभवामुळे न डगमगता, तिने उर्वरित टप्प्यांमध्ये आक्रमकपणे मोटर सायकल चालवत उच्च गियरमध्ये प्रवेश केला. २०० वर स्वार होऊन, बंगळुरूच्या ऐश्वर्याने दुसऱ्या विशेष टप्प्यात मौल्यवान वेळ परत मिळवला आणि शेवटच्या टप्प्यात एक सनसनाटी कामगिरी केली, शेवटी १ मिनिट आणि ३४ सेकंदांच्या आघाडीसह विजय मिळवला. २०२५ ची सहा फेऱ्यांची एफएमएससीआय राष्ट्रीय दुचाकी रॅली स्पर्धा आता चिक्कमंगळुरूच्या कॉफी इस्टेटमध्ये हलवली जाईल.

### ताजिकिस्तान दौऱ्यासाठी २३ वर्षांखालील पुरुष संघ

**नवी दिल्ली** : २०२६ च्या आशियाई चषक पात्रता फेरीच्या तयारीसाठी, भारताच्या २३ वर्षांखालील पुरुष संघाचे मुख्य प्रशिक्षक नौशाद मूसा यांनी सोमवारी ताजिकिस्तान आणि किर्गिस्तान प्रजासत्ताक विरुद्धच्या आगामी मैत्रीपूर्ण सामन्यांसाठी २३ सदस्यीय संघाची घोषणा केली. या संघात वरिष्ठ संघातील तीन खेळाडूंचा समावेश आहे. भारतीय युवा संघ १ जूनपासून कोलकाता येथील एआयएफएफ नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सराव करत आहेत आणि सोमवारी सायंकाळी ताजिकिस्तानला रवाना होणार आहे. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या एएफसी २३ वर्षांखालील आशियाई चषक २०२६ पात्रता फेरीच्या तयारीचा एक भाग म्हणून, भारतीय संघ १८ जून रोजी ताजिकिस्तानशी सामना करेल आणि त्यानंतर २१ जून रोजी किर्गिस्तान प्रजासत्ताकशी सामना करेल. दोन्ही सामने ताजिकिस्तानची राजधानी दुशान्बेपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हिसोर येथील हिसोर सेंट्रल स्टेडियमवर होतील. आक्रमक खेळाडू सुहेल अहमद भट, मिडफिल्डर आयुष छेत्री आणि डिफेंडर टेकचम अभिषेक सिंग यांच्या समावेशामुळे प्रशिक्षक मूसा यांच्या संघाला बळकटी आली.

### विश्वचषक नेमबाजीत भारताला तिसरे स्थान

**म्युनिक** : म्युनिकमध्ये आयोजित आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताने या वर्षी चार विश्वचषकांमध्ये तिसरे स्थान पटकावले, यात भारताने दोन सुवर्ण आणि दोन कांस्यपदके पटकावली. भारताने गत वर्षी संयुक्त तिसऱ्या स्थानावरून या वर्षी एकमेव तिसऱ्या स्थानावर सुधारणा केली नाही, तर गत वर्षीच्या म्युनिक विश्वचषकापेक्षा सुवर्णपदकांसह पदकांची संख्या दुप्पट केली. भारतीय संघाने पुन्हा एकदा आपल्या रायफल आणि पिस्तूल नेमबाजांमधील सर्वोत्तम कामगिरी दाखवली आहे, असे राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे सरचिटणीस के. सुलतान सिंग यांनी सांगितले. म्युनिकमध्ये झालेल्या १० स्पर्धांमध्ये भारताने एकूण सात अंतिम फेरी गाठली. मनु भाकर (महिला २५ मीटर पिस्तूल), वरुण तोमर (पुरुषांची १० मीटर एअर पिस्तूल) आणि चैन सिंग (पुरुषांची ३ पी) यांनी अनुक्रमे सहाव्या (मनू आणि वरुण दोघेही) आणि सातव्या स्थानावर स्थान मिळवले. यामुळे भारताची या खेळातील ताकद वाढली. चीनने चार सुवर्णांसह सात पदकांसह क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले, तर नॉर्वेने भारताइतकेच सुवर्ण आणि एकूण पदकांसह रौप्यपदक जिंकल्यामुळे भारत दुसऱ्या स्थानावर पोहोचला.

# भारत, इंग्लंडला समान संधी

**नवी दिल्ली, १६ जून**

येत्या २० जूनपासून प्रारंभ होणाऱ्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषक भारत व इंग्लंडदरम्यानची पाच सामन्यांची कसोटी मालिका जिंकण्यासाठी दोन्ही संघांना समान संधी आहे. क्रिकेटमधील दिग्गजांनी याविषयी वेगवेगळी मते मांडली आहे.

जर भारतीय संघाने लीड्स व मॅन्चेस्टरमधील सामने जिंकले, तर ते इंग्लंडविरुद्धची आगामी कसोटी मालिका जिंकण्याची दाट शक्यता आहे, परंतु दक्षिण आफ्रिकेचा महान वेगवान गोलंदाज डेल स्टेनने यजमान इंग्लंडला पाच सामन्यांच्या मालिकेत ३-२ असा विजय मिळवून देण्याचे समर्थन केले आहे.

भारत आणि इंग्लंड आपल्या नवीन जागतिक कसोटी अजिंक्यपद चक्राची सुरुवात पाच सामन्यांच्या मालिकेने करणार आहे. या कसोटी मालिकेची सुरुवात शुक्रवारी लीड्समध्ये पहिल्या सामन्याने होणार आहे. मॅन्चेस्टर येथे २३ जुलैपासून चौथ्या कसोटी सामन्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

इंग्लंडचे गोलंदाज इतके फारसे चांगले नाही असे मला वाटते. अनेक खेळाडूंना दुखापती झाल्या आहेत व अनेक खेळाडू निवृत्त सुद्धा झाले आहेत, ही बाब त्यांच्यासाठी आव्हान असेल. त्यामुळे या मालिकेवर भारताचे वर्चस्व असण्याची दाट शक्यता आहे, असे हेडन म्हणाला.

भारताच्या इंग्लंडच्या शेवटच्या कसोटी दौऱ्यानंतर, इंग्लंड संघाचे दोन सर्वात अनुभवी गोलंदाज - जेम्स ॲण्डरसन व स्टुअर्ट ब्रॉडने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकला आहे.

याशिवाय, इंग्लंडची गोलंदाजी क्षमता सुद्धा बरीच कमी झाली आहे, वेगवान गोलंदाज मार्क वूड दुखापतीमुळे किमान पहिल्या तीन कसोटी सामन्यांमधून बाहेर झाला आहे.

जलदगती गोलंदाज जोफ्रा आर्चर सुद्धा प्रारंभीच्या सामन्याला मुकणार आहे आणि गस ॲटकिन्सन हा स्नायूंच्या दुखापतीतून बरा होत आहे.

दरम्यान, भारत नवीन कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरेल, त्यामुळे रोहित शर्मा, विराट कोहली व आर. अश्विनच्या निवृत्तीनंतर भारतीय क्रिकेटच्या एका नवीन युगाची सुरुवात होईल. तरुण फलंदाजी आणि अलिकडच्या काळातील कसोटीतील प्रदर्शन लक्षात घेता पाहुण्या भारतीय संघाला एक कठीण आव्हानाचा सामना करावा लागेल.

(वृत्तसंस्था)



भारत जिंकेल : मॅथ्यू हेडन



इंग्लंड जिंकेल : डेल स्टेन

### डेल स्टेनने दिला इंग्लंडला पाठिंबा

तिकडे ॲण्डरसन-तेंडुलकर ट्रॉफी जिंकण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचा महान वेगवान गोलंदाज डेल स्टेनने इंग्लंडला पाठिंबा दिला. इंग्लंड हा एक तरुण संघ आहे व कदाचित इंग्लंड मालिका जिंकणार आहे, पण त्यांना ही चषक लढाईशिवाय जिंकता येणार नाही. या मालिकेत भारतीय संघही एक किंवा दोन कसोटी सामने जिंकेल, असे डेल स्टेन म्हणाला. मालिकेतील प्रत्येक सामने चुरशीचे होतील, पण प्रत्येक सामन्याचा निकाल लागेल.

### दासगुप्ता, मांजरेकरचा इंग्लंडला पाठिंबा

भारताचे माजी क्रिकेटपटू दीप दासगुप्ता व संजय मांजरेकरने सुद्धा ॲण्डरसन-तेंडुलकर चषक जिंकण्यासाठी इंग्लंडला पाठिंबा दिला, परंतु ही मालिका अत्यंत स्पर्धात्मक असेल यावर त्यांनी सहमती दर्शवली. भारत हा एक तरुण संघ आहे, त्याचा एक तरुण कर्णधार आहे. संघ एका संक्रमणातून जात आहे, त्यामुळे इंग्लंडला थोडासा फायदा होईल व त्यांना घरच्या मैदानावर खेळण्याचाही फायदा होईल, पण ही कसोटी मालिका खूप अटीतटीचा असेल. मालिकेत इंग्लंड ३-२ ने मालिकेत वर्चस्व गाजवेल, असे दासगुप्ता म्हणाला. मांजरेकरनेही याच भावना व्यक्त केल्या. मालिकेत इंग्लंडला फायदा आहे, कारण ते घरच्या मैदानावर खेळत आहेत.भारतीय संघ संक्रमणाच्या टप्प्यातून जात आहे म्हणून मला वाटते की इंग्लंड हे सहज जिंकू शकेल, असे मांजरेकर म्हणाला.

# ॲण्डरसन-तेंडुलकर चषकाचे अनावरण लांबणीवर

**लंडन, १६ जून**

अहमदाबादमध्ये अलिकडेच झालेल्या विमान अपघातामुळे भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यानच्या आगामी पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी ॲण्डरसन-तेंडुलकर चषकाचे अनावरण लांबणीवर पडले आहे.

भारताचे माजी कर्णधार मन्सूर अली खान पतौडी यांच्या सन्मानार्थ पूर्वी पतौडी ट्रॉफी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ट्रॉफीचे नाव ॲण्डरसन-तेंडुलकर ट्रॉफी (एटीटी) असे ठेवण्याचा निर्णय यजमान इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) घेतला होता.

हो, अहमदाबादमध्ये अलिकडेच झालेल्या विमान दुर्घटनेमुळे एटीटी ट्रॉफीचे अनावरण लांबणीवर पडले आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार या चषकाचे अनावर मूळतः १४ जून रोजी होणार होते, मात्र विमान अपघातामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात आला.

मालिका सुरू होण्यापूर्वी पुढील काही दिवसांत चषकाचे अनावरण करण्यात येईल अशी आशा आहे, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने वृत्तसंस्थेला सांगितले.

या विमान अपघातात ५० हून अधिक ब्रिटिश नागरिकांनीही आपला जीव गमावला. एअर इंडियाचे फ्लाइट १७१ लंडनला जात होते आणि उड्डाणानंतर काही मिनिटांतच ते कोसळले.

(वृत्तसंस्था)



### पतौडीचे मालिकेशी नाते कायम ठेवण्याची विनंती

इंग्लंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज जेम्स ॲण्डरसन आणि भारताचे महान फलंदाज सचिन तेंडुलकर यांना समर्पित आहे. २० जूनपासून लीड्समध्ये सुरू होणाऱ्या या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळला जाणार आहे. ईसीबीला बीसीसीआयकडून पतौडी यांच्या नावाने वैयक्तिक सन्मान देऊन मालिकेशी असलेले त्यांचे नाते कायम ठेवण्याची विनंती करण्यात आली आहे, असे समजते.

दिवंगत कर्णधाराचे भारतीय क्रिकेटमधील योगदान लक्षात घेऊन तेंडुलकर व आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांना पतौडी यांचे नाव या मालिकेशी जोडले जावे अशी इच्छा आहे, असे सूत्राने सांगितले.

# वॉशिंग्टन सुंदर माझे प्रेरणास्थान : साई सुदर्शन

**बेकेनहॅम, १६ जून**

वॉशिंग्टन सुंदर माझ्यासाठी प्रेरणास्थान आहे. मी वॉशिंग्टनविरुद्ध ज्युनियर स्तरावर काही सामने खेळलो होतो. त्यामुळे, ते नेहमीच खास आहे, पण ज्या पद्धतीने वॉशिंग्टनने प्रगती केली व देशासाठी खेळला, ते खूप लवकर झाले. माझ्या मनातही तशीच कामगिरी करण्याचे ध्येय आहे, असे साई सुदर्शनने संघाच्या अंतर्गत सराव सामन्याच्या वेळी बीसीसीआय.टीव्हीला सांगितले. साई सुदर्शन २० जून रोजी लीड्स येथे इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण करण्यासाठी सज्ज आहे.

२०१६ मध्ये, वॉशिंग्टन ज्युनियर विश्वचषकात भारताच्या १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी अधिक तज्ज्ञ फलंदाज म्हणून खेळत होता आणि दीड वर्षात, तो वयाच्या १८ व्या वर्षी आपला पहिला एकदिवसीय सामना खेळत होता. २०२१ मध्ये, त्याने २० वर्षांच्या वयात कसोटी पदार्पण केले व तो बॉर्डर-गावस्कर मालिका विजयातील नायकांपैकी एक होता.



वॉशिंग्टनपेक्षा दोन वर्षांनी कनिष्ठ असलेल्या साई सुदर्शनने आपल्या 'वरिष्ठ खेळाडू'चा आदर्श डोळ्यासमोर ठेवले. वॉशिंग्टननेच मला आपले ध्येय साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करण्यास प्रवृत्त केले, असे सुदर्शनने सांगितले.

वॉशिंग्टन सुंदरने आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केली. नंतर तो देशासाठी खेळला, म्हणून चेन्नईचा कोणीतरी भारतासाठी खेळत आहे, हे माझ्यासाठी खूप प्रेरणादायी होते. आम्ही लहानपणापासून त्याला ओळखत असल्याने आणि त्याच्यासोबत खेळत असल्याने मला असे वाटले की मलाही असेच करायचे आहे. तो एक प्रेरणा होता, असे साई सुदर्शनने वॉशिंग्टनबद्दल सांगितले.

भारतासाठी ९ कसोटी, २३ एकदिवसीय आणि ५४ टी-२० सामने खेळलेल्या वॉशिंग्टननेही त्या काळाबद्दल सांगितले की, जेव्हा साई सुदर्शन चेन्नईचा हा प्रतिभावान क्रिकेटपटू म्हणून रँकिंगमधून येत होता. माझे बरेच प्रशिक्षक व मित्रसुद्धा साई सुदर्शनच्या क्रिकेट कारकिर्दीतील वाढीबद्दल सतत बोलत असत. तो नेहमीच मोठा होत गेला, केवळ प्रगती करत गेला, असे वॉशिंग्टन म्हणाला. मी जेव्हा जेव्हा सुदर्शनला टीव्हीवर पाहत असे, तेव्हा त्याच्या कौशल्यातून, कामाच्या नीतीतून खूप काही शिकण्यासारखे होत. त्यामुळे निश्चितच अनेक मुलांना प्रेरणा मिळाली, असे तो म्हणाला.

(वृत्तसंस्था)

# मारियाने ३७ व्या वर्षी जिंकले क्वीन्स क्लब टेनिसचे विजेतेपद

**लंडन, १६ जून**

जर्मनीची पात्राताधारी टेनिसपटू तातजाना मारियाने क्वीन्स क्लबमध्ये विम्बल्डन सराव स्पर्धा जिंकून आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठे विजेतेपद पटकावले आणि स्वतःला 'क्वीन्सची राणी' घोषित केले.

दोन मुलांची आई असलेल्या ३७ वर्षीय मारियाने लंडनमधील ग्रास-कोर्टच्या अंतिम फेरीत आठव्या मानांकित अमांडा अनिसिमाव्हावर ६-३, ६-४ असा विजय मिळवत आपले पहिले ५०० विजेतेपद पटकावले.

८६ व्या क्रमांकावर असलेल्या मारियाने आपल्या मुली शार्लोट आणि सेसिलिया आणि तिचे पती आणि प्रशिक्षक चार्ल्स-एडवर्ड मारिया यांच्यासमोर विजय मिळवला.

हे माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे. माझ्या वयातही तुम्ही मोठ्या ट्रॉफी जिंकू शकता, याचे मी एक चांगले उदाहरण आहे. मला स्वतःचा खूप अभिमान आहे, असे मारिया म्हणाली.

आपल्या चौथ्या विजेतेपदाच्या वाटेवर तिने कॅरोलिना मुचोव्हा, एलेना रायबाकिना आणि मॅडिसन कीज या चार अव्वल २० मधील खेळाडूंना पराभूत केले आणि २०२० नंतर डब्ल्यूटीए टूरवरील सर्वात वयस्कर एकेरी विजेती ठरली. अमेरिकेच्या सेरेना विल्यम्सने वयाच्या ३८ व्या वर्षी ऑकलंड क्लासिक जिंकले होते.

मारियाने यापूर्वी २०१८ मध्ये मॅलोर्कामध्ये गवतावरील टेनिस स्पर्धेचे विजेतेपद जिंकले होते आणि २०२२ आणि २०२३ मध्ये बोगोटा येथे क्लेवर दोनदा विजय मिळवला होता.

माजी विम्बल्डन उपांत्य फेरीत पोहोचलेली मारिया सोमवारी जागतिक क्रमवारीत ४३ व्या क्रमांकावर झेप घेईल. (वृत्तसंस्था)





### मुख्य प्रशिक्षक गंभीर आज संघात सहभागी होणार

**नवी दिल्ली, १६ जून**

कुटुंबातील आपत्कालीन परिस्थितीमुळे गत आठवड्यात मायदेशी परतलेले भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर २० जूनपासून लीड्स येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी मंगळवारी संघात सहभागी होणार आहे. आईला हृदयविकाराचा झटका आल्यानंतर गंभीर भारतात परतला होता. गंभीरच्या आईला रुग्णालयात दाखल करावे लागले होते.

आता त्याच्या आईची प्रकृती ठीक आहे. गौतम गंभीर मंगळवारी इंग्लंकडे रवाना होणार आहे व त्याच दिवशी संघात सहभागी होणार आहे, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले. भारताचा माजी सलामीवीर फलंदाज गंभीर बेकेनहॅममध्ये रविवारी संपलेल्या भारत आणि भारत अ संघादरम्यानच्या अंतर्गत संघातील सामन्याला मुकला होता.

गंभीरच्या अनुपस्थितीत, सहायक प्रशिक्षक रायन टेन डोइशे, फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक आणि गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल यांनी पाच सामन्यांच्या मालिकेपूर्वी संघाच्या तयारीचे पर्यवेक्षण केले. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय कसोटी संघ २००७ नंतर इंग्लंडमध्ये पहिला मालिका विजय मिळविण्याच्या शोधात आहे.

(वृत्तसंस्था)

# भारत-पाकिस्तान वन-डे सामना कोलंबोत ५ ऑक्टोबर रोजी

### महिला वन-डे विश्वचषक

**दुबई, १६ जून**

महिलांच्या वन-डे विश्वचषक स्पर्धेत ५ ऑक्टोबर रोजी कोलंबो येथील आर. प्रेदासा स्टेडियम या तटस्थ ठिकाणी भारत आणि पाकिस्तानदरम्यान वन-डे सामना खेळला जाईल, अशी घोषणा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) केली.

भारताने आयसीसी स्पर्धेसाठी पाकिस्तानला जाण्यास नकार दिल्यानंतर या वर्षाच्या सुरुवातीला चॅम्पियन्स चषक व त्यानंतर स्वीकारलेल्या हायब्रिड मॉडेलनुसार कोलंबोला तटस्थ स्थळ म्हणून जोडावे लागले. तथापि, भारत ३० सप्टेंबर रोजी बंगळुरू येथे श्रीलंकेविरुद्ध आपला मोहीम सुरू करेल आणि २६ ऑक्टोबर रोजी बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर बांगलादेशशी सामना करेल. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयी समारंभात नुकत्याच झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर सामन्यांचे यजमानपद गमावल्याच्या अफवांना खोडून काढले आहे. भारताचे इतर सामने ९ ऑक्टोबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि १२ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध विशाखापट्टणम् येथे आहेत. त्यानंतर भारतीय संघ १९ ऑक्टोबर रोजी इंग्लंडशी सामना करण्यासाठी इंदूरला जाईल आणि त्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी न्यूझीलंडशी सामना करण्यासाठी गुवाहाटीला जाईल. ऑस्ट्रेलिया हा स्पर्धेचा गतविजेता आहे, तर भारतीय संघ आपले पहिले विश्वविजेतेपद जिंकण्याचा प्रयत्न करेल.

# यू मुम्बाने जिंकले यूटीटी विजेतेपद





**अहमदाबाद, १६ जून**

अल्टिमेट टेबल टेनिस (यूटीटी) २०२५ च्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जयपूर पॅट्रियट्सला हरवून यू मुम्बाने प्रथमच विजेतेपदाचा मान पटकावला. मुंबईस्थित फ्रॅन्चायझीने मिश्र दुहेरीत जयपूर पॅट्रियट्सवर ७-२ अशी आघाडी घेतल्याने, चेन्नईच्या १७ वर्षीय खेळाडूला पहिल्या रिव्हर्स सिंगल्समध्ये चंद्राविरुद्ध केवळ एक गेजिंकावा लागला. डेम्पो गोवा चॅलेंजर्सविरुद्धच्या आपल्या संघाच्या उपांत्य सामन्याच्या अगदी उलट परिस्थिती होती जिथे त्याला किमान एक गुण मिळवावा लागला. अभिनंदने आपल्यापेक्षा आठ वर्षांनी मोठ्या असलेल्या चंद्राविरुद्धच्या पहिल्या दोन सामन्यांध्ये विजय संपादन केला. यशस्विनी घोरपडेकडून कोणत्याही प्रकारच्या कृतीची आवश्यकता नव्हती.



# श्रवण माशाळ, हर्षिता अनागुंडे प्रथम

**सोलापूर, दि. १६ जून-**

चेतक रोलर स्केटिंग क्लबतर्फे जागतिक पितृदिनानिमित्त होम मैदानावर झालेल्या स्केटिंग स्पर्धेत विविध वयोगटात श्लोक कोकरे, श्रवण माशाळ, हर्षिता अनागुंडे, समर्थ काशेट्टी, मयूर सोलनकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

दिव्यकांत गांधी यांनी शिबिरादरम्यान मुलांना स्पीड स्केटिंग शिक्षण दिले होते व स्पर्धेचे संयोजन केले. स्पर्धेचे परीक्षण गांधीसह मयूर सोलंकर, जयदेव बाहेरमठ, श्री कोकरे व सौ. सारंगमठ यांनी केले. पितृदिनानिमित्त उर्वी गांधी या बाळाने तिच्या हस्ते सर्वांना केक दिले व क्लबतर्फे खाऊ वाटप करण्यात आले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

: **६ वर्षांखाली** : श्लोक कोकरे, खदिजा शेख, आर्यन बीडला, संस्कृती कोकरे.

**९ वर्षांखालील मुले** : श्रवण माशाळ, तनय भैरप्पा, समर्थ सारंगमठ, म. साद शेख. मुली: हर्षिता अनागुंडे, अदिरा बिडला, इशा कंदोले.

**१२ वर्षांखालील** : समर्थ काशेट्टी, श्लोक खताळ,वेदांत मेटगिरी, अहद शेख.

**१५ वर्षांखालील** : मयूर सोलनकर, कृष्णा धाराशिवकर, जयदेव बाहेरमठ.

**प्राथमिक गट** : अम नउल्लाह नदाफ, मरियम यलाल ,रुजूला स्वामी, रक्षित वाल्मिकी.

# खुल्या गटाची राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा धुळ्यात

### किशोर गट परभणीत तर कुमार गट बीड किंवा अहिल्यानगरमध्ये

**पुणे, दि.१६ जून-**

वरिष्ठ गट (खुला गट) पुरुष व महिलांची राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा धुळ्यात होणार असल्याची माहिती महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली. पुणे येथील नेहरू स्टेडियमवरील महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या कार्यालयात झालेल्या शासकीय परिषदेच्या बैठकीत यंदाच्या मौसमातील राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धांची ठिकाणे निश्चित करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संघटनेचे चेअरमन सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, माजी सरचिटणीस प्रा. जनार्दन शेळके, सहसचिव जयांशु पोळ, डॉ राजेश सोनवणे, डॉ पवन पाटील व बाळ तोरसकर आदी उपस्थित होते.

या बैठकीत किशोर गट स्पर्धा परभणीत तर कुमार गट बीड किंवा अहिल्यानगरमध्ये घेण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीत निवड समिती सदस्य, प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. राज्यातील पंचांचे प्रशिक्षण



शिबिरही जुलै अखेर धुळ्यात होणार असल्याचे प्रा. डॉ. जाधव यांनी सांगितले. तसेच राज्य खो खो पंच परीक्षा रविवार २९ जून रोजी घेण्यात येणार आहे. संलग्न जिल्हा संघटनानी आपली नोंदणी २० जून पर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत. maharashtrakhokho association@gmail.com या मेलवर करावी.



मोहन रजपूत



अतुल जाधव



अजित शिंदे

### प्रशिक्षकपदी सोलापूरच्या तिघांची वर्णी

प्रशिक्षकपदी कुमार गटासाठी किरण स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक मोहन रजपूत तर किशोरी गटासाठी वाडीकुरोली येथील कल्याणराव काळे स्पोर्टस क्लबचे प्रशिक्षक अतुल जाधव आणि पुरुष गटाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी उत्कर्ष क्रमंडळाचे प्रशिक्षक अजित शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

### निवड समिती, प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक असे -

**निवड समिती : पुरुष - महिला :** सुरेंद्र विश्वकर्मा (मुंबई)राम चोखट (परभणी), कृष्णा करंजळकर (रत्नागिरी), प्रियांका चव्हाण (ठाणे). कुमार - मुली : श्रीनिवास मेतरी (रायगड), मनोज परदेशी (नंदुरबार), योगेश सोलसे (बीड), राखी जोशी (पुणे).किशोर - किशोरी : भाऊसाहेब पवार (अहिल्यानगर), नरेंद्र रायलवार (हिंगोली), पंढरीनाथ बडगुजर (धुळे ), छाया लांडगे ( छत्रपती संभाजीनगर ).

**प्रशिक्षक व सहाय्यक प्रशिक्षक : पुरुष :** नरेंद्र कुंदर ( मुं. उपनगर ), अजित शिंदे (सोलापूर).महिला : नरेंद्र मेंगळ (ठाणे ), निकिता पवार (धाराशिव). कुमार : मोहन रजपूत (सोलापूर), सुजित माळी (लातूर), मुली : अभिजीत पाटील (धाराशिव), ऐश्वर्या सावंत (रत्नागिरी). किशोर : विकास सूर्यवंशी (छ. संभाजीनगर), धीरज दंडवते (पुणे) किशोरी : अतुल जाधव (सोलापूर), सुरज शिंदे (हिंगोली).

## शाळा प्रवेशोत्सव...



### मांगी जि.प. शाळा; प्रवेश घेतल्यास एक वर्षाची घरपट्टी भरणार : बागल

**करमाळा, दि.१६ जून-**
मांगी (ता. करमाळा) येथील सामाजिक कार्यकर्ते सुजित तात्या बागल यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये जे पालक मुलांना प्रवेश घेतील त्यांची पूर्ण एक वर्षाची घरपट्टी स्वतः भरणार असल्याचे जाहीर केले. या उपक्रमामुळे प्राथमिक शाळांची पटसंख्या वाढेल अशी त्यांना आशा आहे. पहिली इयत्तेतील चिमुकल्यांना गुलाब पुष्प, मिठाई व खेळणी वाटून सत्कार करण्यात आला. सुजित तात्या बागल यांच्यासह मुख्याध्यापक कवले गुरुजी, शिक्षिका सुवर्णा महामुनी, पवार, देमुंडे, शालेय व्यवस्थापन कमिटीचे उमेश बागल, निखिल बागल, पोलीस पाटील आकाश शिंदे, किशोर बागल, शिवाजी राऊत व विद्यार्थी उपस्थित होते.



### विष्णुपंत कुलकर्णी स्कूल, माळशिरस

माळशिरस येथील विष्णूपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांचे रंगीबेरंगी फुगे व मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. शाळेची सुरुवात सरस्वती पूजन व प्रार्थनेने झाली. मुख्याध्यापिका इनामदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी श्री हनुमान शिक्षण संस्थचे अध्यक्ष ॲड. माधव मिरासदार, कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, कार्यवाह रामचंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### जिल्हा परिषद प्राथ.शाळा, वाफळकरवस्ती

**करकंब,दि.१६ जून-**
वाफळकरवस्ती येथे विद्यार्थ्यांचे फेटा व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. पुस्तके, शूज, गणवेशाचे वाटप करण्यात आले. सहशिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांच्या वाढदिवसानिमित्त वही, पेन, पट्टीचे वाटप केले. यश नितीन वसेकर याची सैनिक स्कूलमध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार झाला. यावेळी मुख्याध्यापक किरण ढोबळे, राम दास माळी, प्रवीण कवडे, ज्ञानेश्वर वसेकर, बिभीषण वसेकर, राजाभाऊ वाफळकर, नितीन वसेकर, प्रमोद टेके, शंकर कवडे, तुकाराम चौधरी, विद्या वसेकर, दिपाली वसेकर, सारिका घनवट आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...



### बाळकृष्ण वरुडकर

**पंढरपूर,दि.१६ जून-**
येथील ज्येष्ठ सिव्हिल इंजिनीअर आणि बांधकाम व्यवसयातील निष्णात व्यक्तिमत्व बाळकृष्ण शंकरराव वरुडकर (वय-८४) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी श्रीमती अनुराधा वरुडकर, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.



### विद्या कुलकर्णी

**पंढरपूर, दि. १६ जून-**
येथील काळा मारूती परिसरातील अश्विनी कलेक्शनच्या विद्या सुरेंद्र कुलकर्णी (वय-५७) यांचे सोमवारी दि.१६ जून रोजी पहाटे अल्पशाः आजाराने निधन झाले. येथील वैकुंठ स्मशानभूमीत (कै.) विद्या कुलकर्णी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नाती, जावई असा परिवार होत. सेवानिवृत्त कृषी अधिकारी एस.आर. कुलकर्णी यांच्या त्या पत्नी होत.



### मलप्पा विजापुरे

**दक्षिण सोलापूर, दि.१६ जून -**
येळेगांव येथील मलप्पा धानप्पा विजापुरे (वय ८२) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या (मंगळवारी) दुपारी एक वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी वैजिनाथ विजापुरे यांचे ते वडील होत.



### सुगणाबाई बुरा

**सोलापूर, दि. १६ जून-**
सुगणाबाई नारायण बुरा याचे सोमवारी दुपारी ४च्या सुमारास निधन झाले. त्यांच्यमागे तीन मुले, तीन सून, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. दत्त चौक वृत्तपत्र विक्रेता बंधू अशोक बूरा यांच्या त्या मातोश्री आहेत. त्यांची अंतयात्रा मंगळवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या कोंडा नगर अक्कलकोट रोडवरील निवास स्थानापासून निघणार आहे



### मधुकर मस्के

**सोलापूर, दि. १६ जून-**
सलगरवस्ती येथील रहिवाशी, सामाजिक कार्यकर्ते मधुकर (अण्णा) मस्के. वय ७५ वर्षे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, दोन मुली, जावई नातवंडे आहेत. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पैलवान आबा मस्के यांचे जेष्ठ बंधू होते.



### महीबूब हुसेनी पटेल

**सोलापूर, दि. १६ जून-**
वळसंग येथील ज्येष्ठ नागरिक व उस्तादजी म हीबूब हुसेनी पटेल यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. अंतयात्रा आज रात्री नऊ वाजता आहे. पत्रकार अल्ताफ पटेल यांचे ते वडील होत.

# आमदार अभिजीत पाटलांबाबत दिशाभूल करू नका

## माढ्यात पाटील समर्थकांकडून साठे गटावर निशाणा; नगरपंचायतीच्या चुकीमुळे २ कोटी बुडाल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१६ जून -**
माढा शहराला येवती जलाशयातून पाणीपुरवठा केला जातो. त्या ठिकाणी सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने वारंवार पाईपलाईन लिकेज होऊन शहराला होत असलेला पाणीपुरवठा विस्कळीत होत होता. त्यामुळे माढा नगरपंचायतला एक्स्प्रेस फीडरचा निधी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या शिफारशीनुसार नियोजन समितीमधून मंजूर करण्यात आला. ज्यांनी निधीसाठी शिफारस दिली त्यांचा माढा नगरपंचायतच्या सत्ताधारी साठे गटाला विसर पडल्याचे सांगत खासदार व आमदार समर्थकांकडून पत्रकार परिषदेत खंत व्यक्त करण्यात आली. तसेच सत्ताधारी साठे गटाकडून आमदारांच्या कार्यपद्धतीवरून जनतेमध्ये दिशाभूल करण्यात येत असल्याचेही या



पत्रकार परिषदेत आनंदराव कानडे व दिनेश जगदाळे यांनी सांगितले.

यापूर्वीही माढा नगरपंचायत विकास कामाकरता शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी तीन कोटी रुपयांचा निधी नियोजन समितीमधून दिला होता. हा विकास निधी माघारी गेला. केवळ विकासाला खीळ घालण्याचे काम सत्ताधारी करीत आहेत, असा आरोप ही आमदार अभिजित पाटील समर्थकांनी केला आहे. माढ्याच्या पाणीपुरवठ्याबाबत आमदार अभिजित पाटील यांच्या मागणीवरून घेण्यात आलेल्या बैठकीनंतर नगरपंचायतीमधील सत्ताधारी साठे गटाने पत्रकार परिषद घेत काही प्रश्न उपस्थित केले होते.

त्या प्रश्नास प्रत्युत्तर देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत आनंदराव कानडे, दिनेश जगदाळे, जहीर मणेर, भैय्या खरात, रवी सरवदे, आबा साठे या आमदार समर्थकांनी नगरपंचायतच्या सत्ताधारी गटावर जोरदार टीका केली. माढ्याच्या पाणीप्रश्नाबाबत आमदार अभिजित पाटील यांच्या मागणीवरून तहसीलदारांनी टंचाई बैठक आयोजित केली होती. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत माढ्याच्या पाणीपुरवठ्याबाबत चुकीची माहिती दिली गेल्याने दोन कोटी रुपयांच्या निधीस मुकावे लागले होते. माढ्याच्या पाणीपुरवठा प्रश्नांबाबत तळमळ असल्यानेच बैठक आयोजित करून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न ते करीत असताना आमदारांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांनी याबाबत माहिती घेऊन बोलावे. आमदारांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत जनतेची दिशाभूल करू नये, अशी भूमिका माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे व संभाजी ब्रिगेडचे दिनेश जगदाळे यांनी मांडली. यावेळी आमदार समर्थकांकडून असेही सांगण्यात आले की साठे गटाकडून वारंवार असे सांगण्यात येते की आम्ही महिलांचा सन्मान करत नाही हे त्यांचे वक्तव्य पूर्णतः खोटे आहे. आम्ही नेहमी महिलांचा सन्मान करतो. यापूर्वी गावच्या विकासासाठी जी काही आंदोलने आम्ही उभा केली त्याचे नेतृत्व नगराध्यक्षा या नात्याने आम्ही मिनलताई साठे यांनाच दिले होते. मग आम्ही साठे नावाचा व्देष करणारे किंवा महिलांचा अनादर करणारे कसे हा प्रश्न उपस्थित केला. या पत्रकार परिषदेस आनंदराव कानडे, दिनेश जगदाळे, आबासाहेब साठे, भैय्या खरात,जहीर मणेर, रवि सरवदे, किरण पवार, अमर लंकेश्वर, नगरसेवक अरविंद खरात आदी उपस्थित होते.

## जेसीबीतून केलेल्या पुष्पवर्षावाने चिमुकल्यांचा आनंद गगनात मावेना

### मुंडफणेवाडी शाळेतील शिक्षकांचा हटके उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १६ जून-**
मुंडफणेवाडी (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी जेसीबीतून पुष्पवर्षाव करून स्वागत करण्यात आले. यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेना अशी अवस्था झाली. शाळेचे मुख्याध्यापक समीर लोणकर व सहशिक्षिका अर्चना वाघ यांचे कल्पकतेतून साकारलेल्या या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यां बरोबर पालकही आचंबित झाले.



विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फुग्यांची व फुलांची सजावट करण्यात आली. पहिलीतील सर्व विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून प्रवेशद्वारावर औक्षण करून स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेचे प्रांगण मुले आणि फुलांनी फुलले होते. काही हसत काही रडत मुले शाळेत आली. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व सॉक्स, वह्या यांचे वाटप करून सर्व विद्यार्थ्यांना मिठाई देण्यात आली. यावेळी अमरसिंह पिसाळ-पाटील, सौरभ मुंडफणे-पाटील यांनी जेसीबी देऊन मदत केली. तर शिवाजी जमदाडे यांनी झेंडूची फुले दिली. यावेळी केंद्रप्रम ुख भक्ती नाचणे, माजी विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, मिलिंद मुंडफणे, अभिजित मुंडफणे, गणेश शिंदे उपस्थित होते. मुख्याध्यापक समीर लोणकर, सहशिक्षिका अर्चना वाघ, अंगणवाडी सेविका रेखा मुंडफणे, सोनाली मंडले यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



### भाळवणीत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**हटकर कोष्टी युवक संघटनेचे आयोजन**

**पंढरपूर, दि.१६ जून -**
भाळवणी (ता. पंढरपूर) येथील हटकर कोष्टी युवक संघटनेच्या वतीने ३१ विद्यार्थ्यांना वह्या, पेन, बाटली, कंपास आदि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी गंगाधर कोले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जयकुमार कोले, सुरेश कापसे, संजय आंबेकर, माणिक कोले, चंद्रकांत कापसे, मुरलीधर कोले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी धनंजय धोत्रे, प्रशांत माळवदे यांचे भाषण झाले. या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब कापसे यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कापसे यांनी केले तर आभार राहुल लंगोटे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष कोले,अशोक शहाणे,हरिदास कापसे,राजू कापसे, तुकाराम कापसे, संतोष कापसे, राहुल कापसे, राजू निराळी, पप्पू कोले यांनी सहकार्य केले.या कार्यक्रमास विद्यार्थी पालक महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दुचाकीचा धक्का लागल्याने रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. १६ जून-**
दुचाकीचा धक्का लागल्याने लोखंडी रॉड तसेच लाथाबुक्यांनी मारून तरुणाला जखमी केले. ही मारहाण मुळेगाव परिसरातील बिसमिल्ला नगरात रविवारी रात्री १०.४५ वाजता झाली. कार्तिक बालाजी गिरी (वय १७) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री कार्तिक हा दुचाकीवरून बिसमिल्लाह नगरातून जात होता. त्यावेळी दुचाकीचा धक्का लागल्याने नितीन व सचिन गायकवाडसह इतर सात ते आठ जणांनी मारहाण केली. यशवंत गिरी यास उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महाराष्ट्र विद्यालयात ढोल ताशाच्या गजरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जून-**
महाराष्ट्र विद्यालयामध्ये इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ढोल-ताशा वाजवत त्यांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे सचिव पी.टी. पाटील हे होते. सोबत संस्थेचे सदस्य तथा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य एस.बी. शेळवणे व माजी नगरसेवक विजय चव्हाण हे होते. प्रथम छत्रपती शिवाजी म हाराज व डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक विद्यालयाच्या



प्राचार्या श्रीमती के.डी. धावणे यांनी केले. कार्यक्रमात सर्व मान्यवरांच्या हस्ते नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

तसेच प्रतिनिधिक स्वरुपात काही पालकांचा देखील गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या श्रीमती के.डी. धावणे, मुख्याध्यापक आर.बी. सपताळे, विद्यालयाचे पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका श्रीमती एन.बी. साठे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन आनंद कसबे यांनी केले तर आभार प्रदर्शन एस.सी. महामुनी यांनी केले.



### श्रीपूर क्रेडीट सोसायटीतर्फे सभासदांना ६६ लाखांचा लाभांश वाटप

**श्रीपूर, दि.१६ जून-**
येथिल दि बृहन महाराष्ट्र शुगर सिंडिकेट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्यावतीने २०२४-२५ साठी सभासदांना ६६ लाख ४३ हजार रुपयांच्या लाभांशाचे वाटप करण्यात आले.

सोसायटीची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. अहवाल वाचन जगदिश थिटे यांनी केले. सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. त्यानंतर चेअरमन सुभाष पवार यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर करून संस्थेकडे सर्वात जास्त ठेव ठेवलेले सभासद बाळासाहेब खुळे , समीर सय्यद, शुक्राचार्य वायकर, अनंत गायकवाड, अनिल सुरवसे, बहिर्जी शिंदे, राहुल साठे, यांचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी माजी चेअरम विजय पाटील यांनी संस्थेला अ वर्ग मिळाला असून या वर्षी संस्थेस ३८ लाख ४१ हजार ८८३ रुपये नफा झाला असल्याचे सांगितले. संस्थेने नेहमी कामगारांचे हित जोपासले असल्याचे सांगून सभासदांचे खात्यावर ६६ लाख ४३ हजार रुपयांचा लाभांश जमा केला असल्याचे सांगितले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रघुनाथ देठे, सचिव दादासाहेब म्हसवडे, संचालक नवनाथ मलपे, कुमार शिंदे, गणेश कुलकर्णी, संजय यादव तसेच माजी व्हाईस चेअरमन दिलीप मंडवळे, संदिप खटके, गणेश गुडे, संजय भाग्यवंत, संतोष कोरडे सह कर्मचारी महादेव चौगुले जगदीश थिटे, विनय मोरे तसेच पांडुरंग कारखाना, ब्रिमा सागर कारखान्याचे कामगार उपस्थित होते.

## आंधळगाव शाळेत मुलांचे बैलगाडीतून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१६ जून-**
आंधळगाव येथील जिल्हा परिषद शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत आमदार समाधान आवताडे यांच्या उपस्थितीत बैलगाडीतून भव्य मिरवणूकीने झाले.

ज्ञानार्जनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार देऊन सुसंस्कृत आणि सुशिक्षित करण्याचे आवाहन आमदार आवताडे यांनी केले. यावेळी गटविकास अधिकारी योगेश कदम, गटशिक्षण अधिकारी



दर्शन मेहता, माजी संचालक सुरेश आण्णा भाकरे, राजमाता बँकेचे संचालक पांडुरंग भाकरे सरपंच लव्हाजी लेंडवे, संचालक दिगंबर भाकरे, निलेश आवताडे, शिक्षण विस्तार अधिकारी शाम सरगर यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरीत यंदा ७ लाख चौरस फूट वॉटरप्रुफ मंडप

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; पावसापासून संरक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**
आषाढी एकदशीच्या निमित्ताने पंढरपुरात येणाऱ्या वारकऱ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी ३ लाख १५ हजार चौ. फुट वॉटर प्रुफ मंडप उभारण्यात आला होता. यंदा पाऊस जास्त असल्याने पंढरपुरातील पालखी विसाव्याच्या ठिकाणी ७ लाख चौ. फूट मंडप टाकण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.

वारीच्या निमित्ताने सोलापूर जिल्ह्यात येणाऱ्या भाविकांना मुलभूत आवश्यक त्या सुविधा निर्माण करुन देण्यात येत आहेत. यंदा पावसाचे सातत्य दिसून येत असल्याने वारकऱ्यांच्या आरोग्यासह अन्य सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, शौचालयांची सुविधाही

### वारीसाठी १५ कोटींचा निधी

वारी काळात पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशान्वये पालखीतळ मुरमीकरण १ कोटी, एमएसईबी रोहित्रे नवीन बसविणे व इतर कामांसाठी ३८ लाख, आरोग्य विभाग ३ ते ४ कोटी, जिल्हा रूग्णालय, पंढरपूरसाठी २ कोटी ८० लाख व इतर ठिकाणी मिळून अंदाजे १५ कोटीचा निधी आजतागायत वर्ग करण्यात आला आहे.

**- दिलीप पवार, जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर**



प्राधान्याने पुरविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. आषाढी वारीनिमित्त बार्शी, माढा व करमाळा या तालुक्यातून पंढरपूरकडे येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा देण्यात येत आहेत. पालखी मार्गाची पाहणीही झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा अडीचपट अधिक मुरुमीकरण करण्यात आले आहे.

पालखी मार्गावरील वारकऱ्यांना आरोग्य सुविधेसाठी २१ ठिकाणी प्रत्येकी पाच बेडची आयसीयू सुविधा देण्यात येत आहे. यासाठी इंडियन मेडीकल असोशिएशनचे सहकार्य घेण्यात येत आहे. वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणाऱ्या डॉक्टरांची राहण्याची व भोजनाची सुविधाही प्रशासनाकडून करण्यात आली आहे. वारीतील गर्दीवर नियंत्रणासाठी यंदा सर्व प्रशासकीय यंत्रणेचे समन्वय असलेले नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षकांचे या कक्षावर नियंत्रण असणार आहे. वारीच्या काळात कर्मचाऱ्यांना १०० वायरलेस फोन देण्यात आले आहेत. याशिवाय ७० ठिकाणी वायफायची सुविधा देण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी निशुल्क दुरध्वनी सुविधा वारकऱ्यांना देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

### होडीत वीस व्यक्तींनाच बसविण्याची परवानगी

वारीकाळात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाय योजना प्रशासनाकडून करण्यात येत आहेत. वारी काळात चंद्रभागा नदीत होडीतून प्रवास करताना फक्त २० व्यक्तींनाच परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय होडीचे फिटींग प्रमाणपत्र तपासूनच त्यांना परवानगी देण्यात येणार आहे. नियम मोडणाऱ्या होडीचालकावर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सागितले.

### चेंगराचेंगरीच्या १२ स्पॉटवर २६४ पोलिस तैनात

पंढरपुरात वारीच्या काळात चेंगराचेंगरी होईल अशी बारा ठिकाणी प्रशासनाकडून निश्चित करण्यात आली आहेत. या प्रत्येक ठिकाणी २२ पोलिसांचे विशेष पथक तैनात असणार आहे. या पोलिसांकडून गरजेच्या वेळी तातडीची उपाय योजना करण्यात येणार आहे. यासाठी एकूण २६४ पोलिसांची नेमणूक करण्यात आल्याची माहितीही जिल्हाधिकारी यांनी दिली.

## शाळा प्रवेशोत्सव...



### नू.म.वि.शिशु शाळा

नू.म.वि.शिशु शाळा डफरीन चौक, सोलापूर येथील छोटा गट व नर्सरी चा शाळेचा पहिला दिवस खूपच थाटात साजरा झाला रंगीबेरंगी फुग्यांची आणि फुलांची आरास, पाकळ्यांच्या पायघड्या आणि औक्षणाचे ताट घेऊन मा. मुख्याध्यापिका अर्चनाताई कुलकर्णी यांनी मुलांचे स्वागत उत्सव साजरा केला. सोबत सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचीही उपस्थित होती. डोळ्यात आसू आणि ओठावर हसू अशा समिश्र भावना मनात घेऊन आपल्या आई-बाबांचे हात धरून आमचे छोटे विद्यार्थी आले होते. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या प्रेरणेने शाळेमध्ये सामाजिक कार्यात आपले महत्त्वाचे योगदान देणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत त्यांची वेशभूषा मोठ्या गटातील मुलांनी केली होती. त्यामध्ये पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता, मानसशास्त्रज्ञ, फॅशन डिझायनर, आणि बाल विकास अधिकारी यांचा समावेश होता. बालकांच्या मनावर चांगल्या गोष्टी आणि चांगले संस्कार बिंबवण्यासाठी या सर्वांचे मोलाचे योगदान आहे, असे अर्चनाताई कुलकर्णी म्हणाल्या. ह्या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांना मुख्याध्यापिका अर्चनाताई कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पाटील यांनी केले होते



### अण्णासाहेब पाटील संकुल

मराठा युवक मंडळ संचलित, अण्णासाहेब पाटील शैक्षणिक संकुलात प्रवेशोत्सव उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम बालक मंदिर, प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व मुलांचे पुष्पवृष्टी करून तसेच बिस्किट, पेन, पेन्सिल इत्यादी भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके, स्कूल बॅग, युनिफॉर्म यांचे संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी अशोक मुळीक, सावंत, घाडगे गुरुजी, रवी मोहिते, सागर, नारायण भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक गोडाळे, सूत्रसंचालन पवार यांनी केले तर गडदे यांनी आभार मानले.




### व्हॅलेंटाईन सर्कल स्कूल

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये माता सरस्वतीच्या पूजनाने शाळेच्या नव्या वर्षाची सुरुवात झाली. फादर्स डे या दिनाचे औचित्य साधून पालकांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या मुख्य गेटवरती विविध प्रकारचे फुगे लावण्यात आले. मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा , मेहजबिन शेख, उमा कोडम, रेखा बाबानगरे, भगतलाल सुतार, इंद्रजीत चव्हाण, स्वेता येमेकर, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील, शिवाजी आवताडे आदी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन तसेच इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या हातखचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



### जिजामाता प्राथमिक मंदिर, कोंडी

जिजामाता प्राथमिक व बालक मंदिर तुळशीदास नगर, कोंडी येथे विद्यार्थ्यांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू, प्रमुख अतिथी म्हणून कोंडीचे उपसरपंच शिवाजी निळ, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष दिलीप निंबाळकर व विनायक निळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रारंभी राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या संस्थापिका माजी आमदार निर्मला ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पा ठोकळ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.




**सोलापूर : अहिल्याबाई प्रशालेत पहिल्या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्यांचे औक्षण व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.**

# आमदार, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, सीईओंनी केले स्वागत; विद्यार्थी भारावले

- पहिल्या दिवशी नवोगत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून -**

फुग्यांनी सजविलेल्या स्वागत कमानी! बाळाचे पाय कलरमध्ये बुडवून पायाचे ठसे घेण्यात दंग असलेल्या शिक्षिका! शाळेत पहिले पाऊल ठेवण्यासाठी बालकांची व पालकांची धडपड, मुलाची केविलवाणी रडणे व पालकांचे समजावणे, शिक्षकांकडून खाऊ देऊन मुलांना वर्गात शांत बसविणे हे सर्व दृश्य अनुभवायला आले शाळा प्रवेशोत्सवात शिवाय विद्यार्थ्यांच्या स्वागता साठी चक्क आमदार, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त व जिल्हा परिषदेचे सिईओ उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील वातावरण बदलून गेले.

शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे बैलगाडी, ट्रॅक्टर, जीप, कार यासह इतर वाहनातून मिरवणूक काढण्यात आली. तसेच मान्यवरांच्या हस्ते गणवेश, बूट, पाठयपुस्तके, गोड खीचडी देण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखांकडून जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आमदार अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मैंदर्गी येथील कन्नड मुलींची शाळा येथे भेट देऊन विद्यार्थीनींचे स्वागत केले. दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करून वृक्षारोपण केले. मोहोळचे आमदार राजू खरे यांनी मोहोळ तालुक्यातील येथील प्राथमिक शाळेत जाऊन नवोगतांचे स्वागत केले. बाळे येथील प्राथमिक शाळेत आमदार विजयकुमार देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. बार्शी तालुक्यातील उपळाई ढोंगे येथे बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सांगोल्याचे आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या सुविद्य पत्नी डॉ. निकिता देशमुख यांनी पेनूर शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले.



**जिल्हाधिकारी आशीर्वाद विद्यार्थ्यांबरोबर जमीनीवर :** जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी देगाव येथील प्राथमिक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. जिल्हाधिकारी उंचीने मोठे असल्यामुळे लहान मुलांच्या बरोबर फोटो घेण्यासाठी जमिनीवर बसले. जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी नवोगतांशी संवाद साधला. या प्रसंगी शिक्षणाधिकारी कादर शेख उपस्थित होते.



### सिईओ जंगम यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्रवेशोत्सव निमित्त मोहोळ तालूक्यातील पापरी शाळेला भेट दिली. जंगम यांनी पहिलीच्या नवोगत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करून मुलांमध्ये मिसळून सेल्फी काढला. यावेळी गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, विस्तार अधिकारी स्वामी, सरपंच जयश्री कोळी उपसरपंच अमोल भोसले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपाध्यक्ष नितीन भोसले आदि उपस्थित होते.

### पोलिस आयुक्तांकडून विद्यार्थ्यांचे स्वागत

जिल्हा परिषद शाळा मजरेवाडी येथे सोलापूर शहराचे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी नवोगत विद्यार्थ्यांचे गुलबापुष्प देऊन स्वागत केले. यावेळी शिक्षक,पालक उपस्थित होते.

# विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र ग्रामविकास विभागाकडून वेळोवेळी शासनाने लागू केलेल्या सेवाविषयी बाबींचे प्रलंबित प्रश्नांची पूर्तता करण्याकरीता जिल्हा संघटनेकडून पाठपुरावा केला. जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित न्याय मागण्याबाबत सकारात्मक चर्चा होऊनही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे सोमवार १६ जूनपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे.



सेवा पुस्तक अद्ययावत, सुधारीत किमान वेतन व राहणीमान भत्ता, समूह व वैयक्तिक विमा योजना, १९ महिन्याचे फरक रक्कम, सेवाज्येष्ठतेनुसार १० टक्के पदभरती, ऑनलाईन वेतन या मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी आयटक संघटनेचे अध्यक्ष कॉ. तानाजी ठोंबरे, सचिव ए.बी.कुलकर्णी, उपाध्यक्ष हुवण्णा पुजारी, यशवंत फडतरे, संघटन सचिव संतोष जमादार, रशिद इनामदार आदी उपस्थित होते.




# मंत्री गोगावले यांच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १६ जून-**

माजी उपमुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सौभाग्यवती रश्मी ठाकरे यांच्या विरोधात एकनाथ शिंदे गटाचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी आक्षेपार्ह विधान करत शिवसेना फुटीला रश्मी ठाकरेच कारणीभूत असल्याचा आरोप केला आहे.

या वक्तव्याच्या सोलापूर शहर जिल्हा शिवसेना आणि महिला आघाडीच्या वतीने निषेध करून सोमवारी सात रस्ता येथे तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी गोगावले यांच्या प्रतिमेस जोडोमार आंदोलन करून महिला आघाडीच्या वतीने गोगावले यांना बांगड्यांचा आहेर भेट दिला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले बंड हे रश्मी ठाकरे यांच्यामुळे झाले आहे. शिवाय रश्मी ठाकरे याच शिवसेना फुटीस कारणीभूत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना शिंदे गटाचे रोजगार हमी व खार मंत्री भारत गोगावले यांनी केल्यानंतर राज्यात मोठी खळबळ माजली आहे.

भरत गोगावले यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख संतोष पाटील, रविकांत कांबळे, खंडू सलगरकर, शिवा माळी, इलियास शेख, सत्तार शेख, कबीर शेख, संतोष घोडके, महिला पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# पिकअपचे रुतले चाक; कस्तुरबा मार्केट चौकात ट्रॅफिक जाम

### मातीच्या ढिगाऱ्यातून गाडी चालवताना चालकाला आला नाही अंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

सोलापूर शहराच्या कस्तुरबा मार्केट या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या आर.जे.५१जी.ए. ३९६३ हे पिक अप वाहन रस्त्याच्या लगत खड्डे आणि चिखल असल्याने अवजड वाहन मातीच्या ढिगाऱ्यात रुतून बसले होते. रस्त्यांच्याकडेला चिखलात रुतल्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

महापालिका प्रशासनाने सदरचे खड्डे बुजवणे गरजेचे असताना खड्डे बुजवले नाहीत. त्याच ठिकाणी मातीचे ढीग टाकण्यात आले. त्या मातीच्या ढिगाऱ्यातून पिक-अप वाहन चालवताना चालकाला मातीचा अंदाज न आल्याने चाक मातीच्या ढिगाऱ्यात रुतून वाहन बसले. सुमारे दीड तास हे चाक बाहेर काढण्यात राजस्थानी कारागीर घाम गळत होते. मात्र दुसरीकडे विविध विक्रीच्या साहित्यांनी भरलेले हे वाहन रस्त्यामधून निघत नसल्याने कस्तुरबा मार्केट चौकात ट्रॅफिक जाम झाले.



वाहतूक कोंडी निर्माण होत असताना दुसऱ्या छोटा हत्ती या वाहनाला थांबवून त्याच्याकडील व स्वतः कडील जॅक घेऊन ते चारही बाजूने लावून सुमारे दीड तासांच्या खटाटोपानंतर सदरचे अवजड वाहन बाहेर काढण्यात राजस्थानी कारागिरांना यश आले. तद्नंतर चौकात खोळंबत असलेली वाहतूक सुरळीत झाली.

### महापालिका प्रशासनाने सदरचे मातीचे ढीग काढून घेणे आवश्यक

रस्त्याच्या कडेला नेहमीच मातीचे ढीग साचल्याने वाहनधारकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. अशा परिस्थितीत एखादे अवजड वाहन मातीच्या ढिगाऱ्यात रुतून बसते. तेव्हा वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. राज्याबाहेरील वाहने शहरात उदरनिर्वाह करण्यासाठी येतात. तेव्हा त्यांना अशा विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने सदरचे मातीचे ढीग काढून घेणे आवश्यक आहे.

### भारत मराठी विद्यालयात शालेय साहित्य वाटप

**सोलापूर, दि. १६ जून-**

येथील भारत मराठी विद्यालयात मोफत पाठ्यपुस्तक व शालेय साहित्य वाटप कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते आर.जे.देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.के. सरसंबे होते. सहशिक्षिका एन.झेड. सय्यद यांनी पालकांचे स्वगत व प्रास्ताविक केले. यावेळी एस.एम. ढाकणे यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष वसिम पठाण यांनी शिक्षण व शिक्षकांचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन जे.एच. हवालदार यांनी केले तर आभार टी.टी.वडावराव यांनी मानले.

# शिक्षकांनो, आपल्या पाल्याप्रमाणे विद्यार्थ्यांवर संस्कार करा

- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचना
- मुलींच्या संरक्षण,सुरक्षिततेची जबाबदारी शाळेची
- आजपासून जिल्ह्यातील ४ हजार ३२ शाळा सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

आजपासून शाळांना सुरुवात होत आहे, येथील शाळेमध्ये २५ विद्यार्थिनी नव्याने पहिल्या वर्गात प्रवेश घेत आहेत, त्यांच्यासाठी तर हा आज खूप खास दिवस आहे. अशा विद्यार्थिनींचा आनंद उत्साह वाढवण्यासाठी शाळेने खूप चांगली तयारी केलेली आहे. शाळेतील विद्यार्थिनींची सुरक्षितता व संरक्षणाची जबाबदारी ही




शाळेची असून येथील शिक्षक वर्गांनी आपल्या पाल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना संस्कार द्यावेत असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

दरम्यान, आज शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील ४ हजार ३२ शाळांमध्ये नवोगत विद्यार्थ्यांचे पुष्प देवून अन् पुष्पांची उधळण करून स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या देगाव येथील मुलींच्या शाळेत आयोजित शाळेच्या पहिला दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये शिक्षक वर्गाने जे विविध विषयाचे ज्ञान देतील ते आत्मसात केले पाहिजे. सर्वच विषयात विशेषत: इंग्रजी, गणित व विज्ञान शाखेत अधिक प्राविण्य मिळवावे.

### ४ हजार ३२ शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

यावर्षीच्या शैक्षणिक वर्षाचा आजचा हा पहिला दिवस होता. जिल्हा परिषदेच्या २७७३ शाळा व इतर बाराशे ५९ शाळा अशा चार हजार ३२ शाळांमध्ये खूप उत्साह आनंदाने विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सोलापूर शहर व अन्य ठिकाणी सर्व शाळांमधील शिक्षक वर्गांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ तसेच पुष्पवृष्टी करून स्वागत केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. तसेच एवढ्या मोठ्या उत्साहाने सर्व ठिकाणच्या शाळा विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करत असल्याचे पाहून पालक वर्गामध्ये ही आनंद होता.

येथील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या पाल्याप्रमाणे शिक्षण व संस्कार द्यावेत. तसेच शाळेमध्ये तक्रारपेटी ठेवून त्यात आलेल्या तक्रारीवर कार्यवाही केली पाहिजे. विद्यार्थ्यांना खूप चांगले शैक्षणिक वातावरण येथे निर्माण करून देण्याबाबत शाळेने पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सुचित केले.

विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेण्याबरोबरच आई-वडील व शिक्षक वर्गांचा आदर करण्यास शिकले पाहिजे. इतर विद्यार्थ्यांसोबत चांगली मैत्री केली पाहिजे. आज मी या शाळेत आलेलो असून पुढील २५ वर्षांनी या शाळेतील विद्यार्थिनी आपले ध्येय गाठून मोठ्या पदावर जाऊन जेव्हा माझी भेट होईल तेव्हा त्यांनी त्यांच्या आठवणी मला सांगाव्यात, असे सांगितले. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी प्रास्ताविक करताना सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**चंडक प्रशाला**

तुळशीदास नगर, बाळे येथील ज.रा.च, चंडक प्रशालेत नवे शैक्षणिक वर्षाची सुरुवात गुलाब पुष्प मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश देऊन प्रथम दिवसाची स्वागत करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाळे येथील माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी उपस्थित होते.



## विविध शाळांतील पहिला दिवस...




### पुल्ली कन्या प्रशाला

सौ.भू.म. पुल्ली कन्या प्रशालेत नवीन शैक्षणिक वर्षात ऑपरेशन एज्युकेशनचा संकल्प करून सर्व विद्यार्थिनींचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या दारात मुलींच्या पहिल्या पावलांच्या ठशांची वाट उमटविली. संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम यांनी नूतन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. विश्वस्त तथा शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली यांच्या हस्ते पुस्तक वाटप करण्यात आले. सरस्वती मातेच्या पूजनाने ज्ञान मंदिर उजळले. मुख्याध्यापिका गीता सादुल, उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे यांच्यासह सर्व शिक्षकांनी मुलींचे औक्षण करून स्वागत केले.



### शमा उर्दू शाळा

मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळेत प्रवेशात्सव सजरा करण्यात आला व पहिल्याच दिवशी गणवेश व पुस्तके वाटप मुख्यध्यापक अबुबकर नल्लामंदू यांच्या अध्यक्षतेखाली व पालकांच्या उपस्थित संपन्न झाला. गेटवर सर्व विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात आले नंतर झालेल्या कार्यक्रमात शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके, गणवेश देण्यात आले या वेळी दिलशाद अ. रजाक, शाहीन शकील सदफ, अबरार नल्लामंदू , मेराज अल्लोळी उपस्थित होते. सूत्रसंचालन आसीया बिजापूरे यांनी केले तर जुबेदा सय्यद यांनी आभार मानले.



### शिवालय शिक्षण संकुल

शिवालय प्राथमिक/ माध्यमिक आश्रम शाळा व ओमवैष्णव कनिष्ठ महाविद्यालय, तळे हिप्परगा, (ता. उत्तर सोलापूर) जि. सोलापूर या आश्रम शाळेमध्ये शैक्षणिक वर्षाच्या प्रथमदिनी नवीन विद्यार्थ्यांचे व विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रथमता सरस्वतीच्या प्रतिमेचे प्रतिमापूजन कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य वाघचवरे यांच्या हस्ते करण्यात आले. तद्नंतर शाळेत प्रवेशित झालेले नवीन विद्यार्थी व विद्यार्थी स्वागत, पुष्पगुच्छ, क्रमिक पुस्तके वह्या देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन नेताजी इंगळे यांनी केले. तर आभार राजकुमार शिंदे यांनी मानले.



### हिंगुलांबिका प्राथमिक शाळा

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्या दिवशी औक्षण करून, पुष्पवृष्टी करून, गोड खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या खेळण्या, घोडेस्वारी, सेल्फी पॉइंट, मिकी माऊस, ए-ड्शरीपळपस, वर्ग इ. चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव विजय पुकाळे, मनसेचे विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, सतीश हंचाटे, द्वारकाधीश क्षीरसागर, मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपी नवले उपस्थित होते.







# प्रवेशोत्सव शाळेचा पहिला दिवस, स्कूल चले हम

- महापालिका आयुक्तांनी केले मनपा कॅम्प शिक्षण संकुलात विद्यार्थ्यांचे स्वागत!
- महापालिका पांढरे वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांवर चक्क जेसीबीने पुष्पवृष्टी!
- पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश बूट अन् पायमोजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

शहरातील विविध शाळांमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वगत करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थी भारावून गेले होते. जिल्हा परिषद शाळेत पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जेसीबीतून स्वागत करण्यात आले. तसेच काही शाळांमध्ये प्रभातफेरी काढली. त्यानंतर त्यांचे औक्षण करून फुगे आणि गुलाब पुष्प देत शाळेत पहिल्या दिवशी त्यांचे स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकासह अन्य आवश्यक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

पालिकेच्या विविध ६३ शाळांमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मनपा कॅम्प शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत केले. जूना कारंबा नाका रोडवरील मनपा मराठी मुली क्र ५ पांढरेवस्ती येथे चक्क जेसीबीतून पुष्पवृष्टी करत विद्यार्थ्यांचे हटके स्वागत करण्यात आले. महापालिकेच्या विविध शाळांमध्ये उत्साही वातावरणात विविध पद्धतीने विद्यार्थ्यांचे स्वागत झाले.महापालिका शिक्षण विभागाअंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या शाळासह खाजगी अनुदानित अशा सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गणवेश, बूट आणि पायमोजे वाटप करण्यात आले.

**९,१० वीच्या ३६४ विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पाठ्यपुस्तके**

शासनाच्या योजनेअंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके मोफत दिली जातात. उर्वरित इयत्ता नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना ही सोय उपलब्ध नाही. यामुळे महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने २०२५ - २६ या आर्थिक वर्षात महापालिका शाळेतील इयत्ता नववी व दहावीच्या ३६४ विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येणार आहे.

**सर्व शिक्षा अभियानांतर्गत दिले मोफत गणवेश, बूट आणि पायमोजे**

महापालिकेतील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत गणवेश, बूट आणि दोन जोड पायमोजेही शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप करण्यात आले आहे. यामुळे पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट आणि पायमोजे हे विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि नियंत्रण अधिकारी मनीषा मगर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. महापालिका शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागताचा कार्यक्रम मनपा कॅम्प शैक्षणिक संकुलात उत्साहात झाला. महापालिकेच्या आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते मनपा कॅम्प शाळा आवारातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व पायमोजे आदी साहित्यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविकामध्ये उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी महिला व बालकल्याण विभागाकडून सर्व मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर, डबा व पाण्याची बाटली हे साहित्य वाटप करण्यात येणार असल्याचेही सांगितले. यावेळी पर्यवेक्षक भगवान मुंढे, स्नेहा पुजारी, मुख्याध्यापिका जगन्नाथ सज्जन आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास कॅम्प आवारातील विद्यार्थी, शिक्षक, उपस्थित होते.याप्रसंगी समग्र शिक्षा अंतर्गत दृष्टीदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना ठळक अक्षरातील पाठ्यपुस्तकाचे वाटप आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, शाळेच्या परिसरामध्ये रांगोळी काढून फुलांची सजावट करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शाळेतील पहिल्या पाऊलाचे ठसे कागदावर घेऊन पालकांना आठवणीसाठी देण्यात आले. विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुलांना गणवेश वाटप व पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. खाऊ वाटप करण्यात आले.

मनपा कै. गंगाराम देशमुख प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बबन ऐवळे, उपाध्यक्ष तस्लिम शेख, मुख्याध्यापक राहुल पाटील, आदी उपस्थित होते. मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २५ सोलापूर येथे प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील पहिले पाऊल कागदावर घेऊन पालकांना मुलांच्या आठवणीसाठी देण्यात आले. त्यानंतर श्रीदेवी फुलारे यांच्या अध्यक्षतेखाली व रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्ष धनश्री केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुलांना गणवेश वाटप व पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय चौगुले, आंबेडकर शाळेच्या मुख्याध्यापिका साबळे, उपस्थित होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि नियंत्रण अधिकारी मनीषा मगर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याण विभागाचे अधीक्षक ओमप्रकाश वाघमारे यांच्या माध्यमातून ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या मराठी, उर्दू, इंग्रजी आदी विविध माध्यमांच्या एकूण ५७ शाळांमधील ५ हजार २२३ विद्यार्थी विद्यार्थिनींना शालेय दप्तर (स्कूल बॅग), जेवणाचा डबा, आणि वॉटर बॉटल हे साहित्य शाळेच्या पहिल्याच दिवशी वितरित करण्यात येणार आहे.

**चक्क जेसीबीतून पुष्पवृष्टी!**

सोलापूर येथील जूना कारंबा नाका रोडवरील मनपा मराठी मुली क्र ५ पांढरेवस्ती येथे शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत चक्क जेसीबीतून पुष्पवृष्टी करण्यात आली.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वर्षा सकट पालक चंदू सकट, स्वाती वाघमारे, पूजा हेगडे तसेच शाळेचे मुख्याध्यापक अमोल भोसले, किरण शेळगे उपस्थित होते.

| मनपा शाळा, विद्यार्थ्यांची आकडेवारी | |
|---|---|
| एकूण शाळा | ६३ |
| प्राथमिक शाळा | ५७ |
| प्राथमिक एकूण विद्यार्थी | ५,२२३ |
| **माध्यमिक एकूण शाळा** | ६ |
| माध्यमिक विद्यार्थी | ३६४ |
| एकूण शिक्षक | २१८ |

**विविध शाळांमध्ये प्रवेशोत्सवातील वैशिष्ट्ये**

- शाळेच्या परिसरामध्ये रांगोळी काढून फुलांची सजावट
- शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या पाऊलाचे ठसे कागदावर घेऊन दिले पालकांना
- सर्व विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत
- शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरू
- विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**पाठ्यपुस्तक वाटप शाळासंख्या**

हिंदी - २, इंग्रजी - २, कन्नड - १४, तेलुगू - ३, मराठी मनपा शाळा - ३५, उर्दू मनपा शाळा - २२, उर्दू खाजगी शाळा - ३०, खाजगी अनुदानित मराठी शाळा - २१८ अशा एकूण ३२७ असे सर्व १०० टक्के शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.



### अरिहंत शाळा

अरिहंत शाळेत पहिल्या दिवशी सरस्वती व अरिहंत यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. संस्थाध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, चन्नेश इंडी, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका रजनी सग्गम यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून व गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फुग्यांची कमान उभारण्यात आली होती. हवेत रंगीत फुगे सोडण्यात आले. प्रवेशद्वाराजवळ सुंदर, आकर्षक रांगोळी काढली होती व लहान मुलांच्या आवडीचे कार्टून डोनाल्ड डक स्वागतासाठी उभे होते. 'स्कूल चले हम'ची शाळेच्या बसची प्रतिकृती तयार करण्यात आली होती. नर्सरी व प्ले ग्रुप च्या विद्यार्थ्यांकडून पहिल्याच दिवशी 'श्री' व 'ओम' गिरवून श्रीगणेशा करण्यात आला व तसेच प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांचे स्मायली इमोजी व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले.



### आ.देशमुखांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ कार्यक्रमाप्रसंगी आमदार सुभाष देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच, विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या शालेय साहित्यांचे वितरण केले. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणाबद्दलची जागरूकता निर्माण व्हावी, याकरिता शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले. यावेळी बाजार समितीचे संचालक राजशेखर शिवदारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चैतन्य माने, मुख्याध्यापक विलासराव देशमुख, सरपंच विनोद बनसोडे, उद्योजक शिवानंद हात्तुरे, चंद्रकांत गुरव, राहुल वंजारे, सागर धुळवे उपस्थित होते.



### नू.म.वि प्रशाला

नू. म. वि. मराठी शाळेत पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारावर फुग्यांची कमान, रांगोळी, रंगीबेरंगी झिरमिळ्या, माळा, सेल्फी सॅन्ड, फुलपाखरे, मोर, पोपट होते. मुख्याध्यापिकांनी औक्षण करून, पुष्प, पेन देऊन स्वागत केले. 'माझे शाळेतील पहिले पाऊल' या उपक्रमानुसार इ १ लीतील प्रत्येक मुलांच्या पावलांचे कागदावर ठसे घेण्यात आले. प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वितरण सोहळा या कार्यक्रमाची सुरुवात दिपा कुलकर्णी यांच्या स्वागत गीताने करण्यात आली. प्रवेशोत्सवगीत कोथमिरे यांनी गायले. प्रमुख अतिथी वैष्णवी गायकवाड (सहाय्यक कार्यकारी अधिकारी) यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे यांनी प्रास्ताविक केले. आभार कनकी यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय माळवदकर, सूत्रसंचालन सुवर्णा अळसंदे यांनी केले.

## मेहता प्राथमिक शाळा

कै.वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत व्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आणि शासनातर्फे मोफत पाठ्यपुस्तक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला. श्री सरस्वतीला वंदन करून व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी सत्य शिवाहून सुंदर हे गीत सादर केले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले.

शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील रंगीबेरंगी रांगोळी, फुगे, गुलाब पाकळ्यांच्या पायघड्या आणि खास सेल्फी पॉईंट यामुळे परिसर आनंदमय आणि स्वागतार्ह झाला होता. विशेष आकर्षण ठरले ते ढोल-ताशांच्या गजरात नवागतांचे पारंपरिक स्वागत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका पूनम बनसोडे, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष नितीन पवार, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष अक्षय गांधी, (माता-पालक संघ उपाध्यक्षा स्नेहा कानडे यांची उपस्थिती होती. शाळा समिती अध्यक्ष राजेश



पटवर्धन यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सुजाता यादव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. सूत्रसंचालन मयुरी दुगकर यांनी केले, तर योगेश सरवदे यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना गोड शिरा व बिस्किटांचा खाऊ देण्यात आला.

## कुचन प्रशाला

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेत आज नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औक्षण करून, विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटण्यात आली.

यावेळी नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. पल्लवी ननवरे यांनी सरस्वती वंदना घेतली. यानंतर विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त तथा शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली हे होते. याप्रसंगी प्राचार्य



युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या ज्येष्ठ शिक्षिका सविता चिप्पा यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११४९

**सकळ चिंतामणी शरीर ।जरी जाय अहंकार समूळ आशा ।।**

ईश्वराच्या दर्शनासाठी लोक दूरवर तीर्थक्षेत्राला जातात. ईश्वराच्या प्राप्तीसाठी लोक बरेच कांही करीत असतात. तरीही ईश्वरप्राप्ती होत नाही. त्याचे कारण म्हणजे मूळात ईश्वर कोठे आहे ? त्याच्या प्राप्तीसाठी काय करावे लागते ? याचेच ज्ञान माणसाला नसते. ईश्वर हा सर्व जीवमात्रात भरुन उरला आहे. ईश्वराची भक्ती करणाऱ्या भक्तामध्येही तो भरला आहे. स्वत:जवळ असणाऱ्या भगवंताला लाथाडून माणूस मृगाप्रमाणे कस्तुरी शोधत धावत सुटला आहे. स्वत:वर त्याचा विश्वास नसल्याने असे घडत आहे. ज्याचा स्वत:वर विश्वास आहे, त्याला स्वत:चा परिचय होऊ लागतो. स्वत:चा परिचय माणसाला आत्मज्ञानाच्या मार्गावर नेऊन पोहचवितो.



रात्र-दिन चिंतेमध्ये जगणारा माणूस आपल्या आयुष्याची दैनंदिन चिताच रचित असतो. आपण कोण आहोत? आपण काय करायला पाहिजे ? या प्रश्नांची उत्तरे तो शोधु लागला तर त्याच्यातील अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सर, स्वार्थ हे शत्रु निघून जाऊ लागतील. ज्याच्यातून हे सर्व शत्रू निघून गेले तो चिंतामुक्त होतो. अहंकाराबरोबर निंदा, हिंसा, कपट, ईर्षा, द्वेष, मत्सराला जो काढून टाकतो, तो स्फटीकाप्रमाणे आतून-बाहेरुन स्वच्छ होतो. अशा स्वच्छ माणसाचे शरीर, मन चिंतामणीस्वरुप होते. त्यामुळे त्याला मोक्षप्राप्तीसाठी काशी, वाराणशी, हरिद्वार आदी तीर्थक्षेत्रांना जाण्याची गरज पडत नाही. कारण तोच चालते-बोलते पवित्र असे क्षेत्र झालेला असतो. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार समूळ आशा ।। निंदा हिंसा नाहीं कपट देहबुध्दी । निर्मळ स्फटीक जैसा ।। मोक्षाचें तीर्थ नलगे वाराणसी । येती तयापाशीं अवघी जनें । तीर्थांसी तीर्थ झाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ।।

मानवाजवळ काय आहे? याचा महत्वपूर्ण असा परिचय महाराजांनी करुन दिला आहे. माणूस हाच भगवंत व चालते-बोलते तीर्थक्षेत्र आहे. तीर्थक्षेत्राच्या किंवा चिंतामणीच्या बरोबरीला माणूस तेव्हाच पोहचतो, जेव्हा तो अहंकारमुक्त होतो. अहंकार हा मानवाचा खरा शत्रु आहे. तो माणसाला माणूस म्हणून जगू देत नाही. राक्षसी प्रवृत्तीची उचल अहंकारामुळे होत असते. अहंकारी माणसाजवळ माणुसकीचा पत्ता नसतो. सर्वनाश करणारा फक्त मी अहंकारी माणसाजवळ चिकटून बसलेला असतो. अहंकारी माणसाला निंदा, हिंसा करण्यात, कपटबुध्दीने वागण्यात, देहाला मी समजण्यात आनंद वाटतो. जिवित हिंसेसारखी भयानक असणारी भावनिक हिंसा असा माणूस सहज करीत असतो. अशा माणसाला सर्व आपल्या अधिन वाटत असते. पण प्रत्यक्षात त्याच्या कुटूंबातील सदस्यसुध्दा त्याचे नसतात. नाईलाजास्तव ते वरकरणी त्याचे असल्याचे भासवतात. खरे म्हणजे मुळात तोच त्याच्याजवळ नसतो. त्यामुळे इतर त्याच्याजवळ येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. नाशवंत देहाला मी-मी म्हणण्यात अर्थ नसल्याचे आपण आजच ओळखायला हवे. वेळ निघून गेल्यानंतर विचार करण्यात अर्थ उरणार नाही. ज्ञानोबा-तुकाराम आदी संतांच्या कृपाछत्रात आपण आजच या मी व अहंकाराला नष्ट करु या. ही नष्टता आपणाला आपला खरा परिचय करुन देईल तसेच आनंदात वाढ होईल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सिव्हिल हॉस्पिटलजवळ दररोज लाखो लिटर पाण्याची नासाडी

## सोलापूर महानगरपालिकेचे दुर्लक्ष : डॉ. संदीप आडके यांची मुख्यमंत्री व मुख्य सचिवांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

सोलापूरला दुहेरी पाईपलाईनचे काम होऊन सुद्धा सात दिवसाला एकदा पाणीपुरवठा होत आहे. एक लिटर पाणी प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेस अंदाजे एक रुपया खर्च होत आहे. असे असताना सुद्धा सिव्हिल हॉस्पिटल मागील सोलापूर महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाक्यांमधून व लष्कर व लोधी गल्ली या झोन आठमध्ये असंख्य अनधिकृत नळांमधून दररोज पाण्याची नासाडी होत आहे.

सोमवार पहाटेपासून सिव्हिल हॉस्पिटलच्या मागील रस्त्यावरून, आडके हॉस्पिटल ते अश्विनी रुग्णालयापर्यंत पिण्याच्या पाण्याचे लोट वाहत आहेत. अक्षरशः आडके हॉस्पिटलजवळील ड्रेनेज चेंबर मधून कारंजाच्या स्वरूपात स्वच्छ पिण्याचे पाणी वाहताना दिसत आहे.

महानगरपालिकेने काही दिवसांपूर्वी येथील सार्वजनिक नळ बंद केले व त्यानंतर येथील प्रत्येक घरात एक पाऊण इंचाचे कमर्शियल व अनधिकृत नळाचे कनेक्शन येथील लोकांनी घेतलेले आहे. विशेष म्हणजे ते बंद करण्यासाठी तोट्यासुद्धा लावलेल्या नाहीत. याबाबतीत गेले वर्षभर वारंवार तक्रार केलेल्या आहेत. येथून दररोज पाण्याची नासाडी होत असते व येथे नव्याने बनवलेला रस्ता उखडून या रस्त्याला अक्षरशः गटारीचे स्वरूप आलेले आहे. त्यामुळे परिसरात अतिशय दुर्गंधी पसरलेली आहे. याबाबतीत डॉ. संदीप आडके यांनी सोलापूर महानगरपालिका आयुक्त व सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना वारंवार लेखी तक्रारी देऊन सुद्धा त्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही.

त्यामुळे शेवटी आज त्यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांना ई-मेल व फोटोद्वारे महानगरपालिकेच्या गलथान कारभारावर कारवाई करा. राष्ट्रीय संपत्तीची नासाडी व लोकांच्या टॅक्सरुपी पैशातून होत असलेल्या नासाडीवर सर्व संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी डॉ. संदीप आडकी यांनी केली आहे. याची तक्रार त्यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांकडे केली आहे.



### पालिकेतील अधिकाऱ्यांचा आंधळा कारभार

विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी सोलापूर महानगरपालिकेने पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे प्रसिद्धी पत्रक अनेक वृत्तपत्रात देऊन खर्च केलेला आहे व काही ठिकाणीच तुटपुंजी कारवाई करून त्यावर प्रसिद्ध मिळवली आहे. दुसरीकडे करोडो रुपये खर्च करून टँकरने पाणीपुरवठा करत आहेत. यातून महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांचा आंधळा भ्रष्ट कारभार उघड होत असल्याचा डॉ. आडके यांचा आरोप आहे.

## देऋब्रा मध्यवर्ती मंडळांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई यांच्यातर्फे प्रतिवर्षी दहावीच्या पुढे शिक्षण घेणाऱ्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या सभासदांच्या गरजू आणि गुणवंत पाल्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्या प्रमाणे यावर्षीही दहावीच्या पुढे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. संस्थेच्या सभासद पाल्यांनी विहित नमुन्यात आपला अर्ज २० ऑगस्ट २०२५ पूर्वी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर, दत्त चौक, समर्थ रामदास संकुल सोलापूर येथील कार्यालयात जमा करावेत. मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांनी आपले अर्ज संस्थेचे प्रतिनिधी नाना जोशी यांच्याकडे जमा करावेत. शिष्यवृत्ती व अर्जाच्या अधिक माहितीसाठी मध्यवर्ती मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दत्ता आराध्ये (९७६५५६६८८५) आणि नाना जोशी (९८९०८७६९३४) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन दे.ऋ.ब्रा. शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.

# रेल्वे स्टेशन परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट

## सीसीटीव्ही कॅमेरे बंद; सुरक्षा यंत्रणांचे होतेय दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

दक्षिण भारताचा प्रवेशद्वार समवल्या जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या सोलापूर स्टेशन परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून महिलांचे पर्स, मोबाइल आणि दागिन्यांची चोरी नित्याचीच बाब झाली आहे. या चोरीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण असून सुरक्षायंत्रणा याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून रेल्वे स्टेशन परिसरातून मोटारसायकल चोरीचे प्रमाणदेखील वाढल्याचे दिसत आहेत. प्लॅटफॉर्म क्रमांक चार व पाच सीसीटीव्ही कॅमेरा नसल्यामुळे त्याठिकाणी चोरट्यांना चांगली संधी मिळते. रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर सीसीटीव्ही कॅमेरा आहे. त्यामुळे त्याठिकाणी चौऱ्यांचे प्रमाण तुलनेने कमी आहेत. दक्षिण भारतातून केरळपासून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू आदी ठिकाणांहून येणाऱ्या बहुतांश रेल्वे या प्लॅटफॉर्म क्रमांक चार व पाचवर लागतात. या प्लॅटफॉर्मवर सतत गाड्यांची येजा असते व प्रवाशांची ही गर्दी असते. काहीवेळासाठी या गाड्या थांबतात. दरम्यान चोरटे संधी साधून प्रवाशांची बॅग, पाकीट चोरून नेल्याचे प्रकार वाढले आहेत.

रेल्वे प्लॅटफॉर्मवर लागल्यानंतर रेल्वे पोलीस फिरत असतात. मात्र, ते कोणत्या वेळेत येतात व कोणत्या वेळेत नाही, याची पूर्ण कल्पना चोरट्यांना असते. खिडकीत बसलेल्या महिलांवर चोरट्यांचे लक्ष असते. गाडी सुटल्यानंतर अचानक हात घालून महिन्याच्या गळ्यातील दागिने हिसकावून घेतल्याचे घटना घडल्या आहेत.

रेल्वे स्टेशन परिसरात होत असलेल्या या चोरीच्या घटनांवर येथील सुरक्षा यंत्रणेचे दुर्लक्ष झाल्यामुळेच चोरट्यांचे फावत असल्याचे प्रवाशांकडून सांगण्यात आले. सोलापूर रेल्वेस्थानक परिसरात अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत विविध विकास कामे सुरू आहे. यातील काही कामे पूर्णत्वास आले आहे. त्यामुळे स्टेशन परिसर हायटेक झाले आहे. मात्र, येथील प्रवाशी रिक्षा व दुचाकीस्वार नेहमीच बेशिस्तीचे दर्शन घडवितात. तिकीट आरक्षण केंद्रा शेजारी प्रशस्त वाहनतळ बनविण्यात आले आहे. या ठिकाणी वाहने न लावता जागा मिळेल त्या ठिकाणी वाहने लावली जात आहेत.



# विश्वविनायक वाद्यवृंदाचा सराव सुरु

### चाहूल गणरायाच्या आगमनाची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

गणेशोत्सवानिमित्त विश्वविनायक प्रतिष्ठान संचलित विश्वविनायक वाद्यवृंदाचा ढोल ताशा पथकाचा सराव शुभारंभ रविवारी एसपीएम सीबीएससी प्रशालेच्या प्रांगणात झाला. यावेळी प्राचार्य शिवानंद शिरगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विश्वविनायक प्रतिष्ठानतर्फे ढोल ताशा पथकासाठी निवड चाचणी घेण्यात आली होती. या चाचणीला ७०० जण उपस्थित होते. यातून ४५० जणांची निवड करण्यात आली.

निवड झालेले वादक आणि सोलापूरकर रसिक अशा ८०० जणांनी सराव शुभारंभाला हजेरी लावली. याप्रसंगी ढोल आणि ताशा वादनाचे विविध प्रकार, ध्वजाचे विविध प्रकार वादकांना शिकवण्यात आले. ढोल, ताशा आणि ध्वज यांचा समन्वय साधून उत्कृष्ट सादरीकरण कसे करावे, याबाबत वादकांना मार्गदर्शन करण्यात आले.

विश्वविनायक वाद्यवृंदातर्फे गणेशोत्सवात सोलापूर शहरात आणि महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह इतर राज्यातही ढोल ताशा पथकाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १७ जून २०२५ | राजमाता जिजाऊ स्मृतिदिन |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. षष्ठी (१४.४६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (२५.०१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - विष्कंभ (०९.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२६.१३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा.

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा,

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

## सिंहगड महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

गुणवत्तापूर्वक तंत्रशिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या व नॅक मानांकन प्राप्त केगाव येथील एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी बी. टेक व पदव्युत्तर एम. टेक अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात झाली आहे. केगाव येथील सिंहगड महाविद्यालयामध्ये अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत करियर मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षण घ्यायचे आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना सिंहगड महाविद्यालयांमध्ये मोफत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी आपण प्रा. डॉ. विनोद खरात यांना ९५५२५२९२६० तसेच प्रा. फरीद वळसनकर यांना ९७३०३९३१८२ या क्रमांकावर ती संपर्क साधावा.

# बाजार समितीत शेतकऱ्यांना सुविधा द्याव्यात अन्यथा आंदोलन करू

## श्री बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आपला शेतमाल विक्रीसाठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा शेतकरी बांधवांना सोबत घेऊन बाजार समिती समोर मोठे आंदोलन छेडू, असा इशारा श्री बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांनी दिला आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही राज्यातील तिसरी मोठी बाजार समिती असून, विक्रमी उलाढालीसाठी प्रसिद्ध आहे. या बाजार समितीची वार्षिक उलाढाल हजारो कोटींच्या घरामध्ये असताना देखील त्यामानाने शेतकऱ्यांसाठी मात्र कोणत्याच सोयी सुविधा उपलब्ध केल्या जात नाहीत. बाजार समितीमध्ये चोरीच्या घटना वारंवार घडतात. यामुळे विविध उत्पादित शेतमालाची मोठ्या प्रमाणात चोरी होते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठं नुकसान होत आहे.

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांच्या जीवावर बाजार समिती कोट्यावधी रुपये कमावते, त्याच अन्नदात्या शेतकरी बांधवांना कोणत्या सुविधा बाजार समितीत मिळत नाहीत. उत्पादित शेतमाल विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकऱ्यांना विश्रांती घेण्यासाठी शेतकरी भावांनो नसल्यामुळे ते बाजार समितीच्या आवारात थंडीत पावसात भिजत पोत्यावर झोपतात. अशावेळी त्यांना नाहक मनस्ताप व शारीरिक त्रास सहन करावा लागतो. कृषीमाल साठवून ठेवण्यासाठी शीतगृहे अद्यावत केली जात नाहीत. शेतकऱ्यांना दर्जेदार जेवण मिळत नाही. स्वच्छ पाणी व आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नाही. प्रात:विधीसाठी चांगली सुविधा नाही.

बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना भौतिक सुविधा मिळत नाहीत. येथे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरते. यामुळे अनेक रोगराईला आमंत्रण मिळते. याकडे बाजार समिती प्रशासनाचे जाणून बुजून दुर्लक्ष होत आहे. त्याच पद्धतीने शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचे पैसे वेळेवर दिले जात नाहीत. बाजार समितीवर प्रस्थापित नेतेच निवडून जातात. ते शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वर्षानुवर्षे हे प्रश्न सुटत नाहीत. येत्या आठ दिवसांमध्ये शेतकरी बांधवांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी न लावल्यास सोलापूर बाजार समिती समोर शेतकरी बांधवांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ही हत्तुरे यांनी शेवटी दिला.

# बांझ चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण

### सोलापूरचे प्रबुद्धकुमार गायकवाड यांच्यासह पाच कलाकारांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

जाती अंताचा लढा यशस्वी व्हावा या उदात्त हेतूने सत्य घटनेवर आधारित बांझ या हिंदी चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. सध्या या चित्रपटाचे पोस्ट प्रोडक्शनचे काम सुरू आहे. लवकरच हा चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे, अशी माहिती चित्रपटाचे कास्टिंग डायरेक्टर व अभिनेते डॉ. कीर्तीपाल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

टास्क फिल्म निर्मित टेक्सास गायकवाड लिखित व दिग्दर्शक या हिंदी चित्रपटाचे देहूरोड, निगडी व देहूगाव, चिखली परिसरात चित्रीकरण करण्यात आले आहे. सोलापूरचे पाच कलावंत असून प्रबुद्ध फिल्म्सचे अभिनेते प्रबुद्धकुमार गायकवाड , नायिका कशिश खंडेलवाल, प्रमुख खलनायक म्हणून आनंद सरवदे, अभिनेत्री मंगल नागमोडे, कल्याण श्रावस्ती यांच्यासह कलाकार म्हणून भीमदास आरु, भारत भगत, संजय सायरे, धर्मपाल तंतरपाळे, मंदाकिनी भोसले, राहुल कुमार, रंजना भीमराव, मीनाताई सुरेश, अंजली गायकवाड, किशोर गायकवाड, संतोष मांजरेकर, डॉ. कीर्तीपाल गायकवाड, आणि टेक्सास गायकवाड आदींच्या भूमिका आहेत. कॅमेरामन सलीम खान तर कला दिग्दर्शक आनंद शिंदे, डेक्कन स्टुडिओचे प्रमुख रोहन पगारे, तेजस सालोखे तर संकलक म्हणून संतोष मांजरेकर, प्रवीण सोनवणे आदी काम पाहत आहे. पोस्टर निखिल पवार यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस अभिनेते आनंदकुमार सरवदे, मंगल नागमोडे, प्रबुद्धकुमार गायकवाड, यु. एफ. जानराव, रामजी गायकवाड, फारुक शेख उपस्थित होते.

# भाज्यांच्या वाढत्या दरांमुळे गृहिणींचे बजेट कोलमडले

### पावसाचा फटका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

सोलापूर शहरात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे भाजीपाल्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. आजपासून शाळा सुरू होत असताना, टिफीनमध्ये आज काय द्यायचे?' हा प्रश्न मात्र गृहिणींसमोर कायम आहे. भाज्यांचा वाढत्या दरांमुळे सर्वसामान्यांचे बजेट मात्र कोलमडले आहे. तर बाजारात ताज्या भाज्यांची कमतरता जाणवत आहे.



दरम्यान, मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतातील उभ्या पिकांचे आणि साठवणुकीतील भाज्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे बाजारात भाजीपाल्याची आवक घटली आहे. मागणी मात्र तशीच असल्याने दरात चांगलीच वाढ होत आहे. सुधारित दरानुसार मेथी २५, पालक २०, कोथिंबीर १५, टमाटे ३०, वांगे ६०-८०, बटाटे ३०-४०, गवार १२०, घेवडा १००, बीन्स १००, भेंडी ६०-८०, फ्लॉवर कोबी ४० रुपये किलो या दरांनी ग्राहकांची चांगलीच परीक्षा सुरू केलेली दिसत आहे.

### ग्राहक आणि विक्रेत्यांची होते पंचायत

भाजीपाला महागल्याने ग्राहकांनी खरेदीचे प्रमाण कमी केले आहे. पूर्वी जशी भाजी घेतली जायची, तशी आता केवळ गरजेपुरतीच खरेदी केली जाते. काही कुटुंबांनी डाळी, उसळी, यांसारख्या पर्यायांकडे वळण्यास सुरुवात केली आहे. **- संजना जोशी, गृहिणी**

### आणखी दर वाढण्याची शक्यता आहे

शहरातील विविध बाजारात ताज्या भाज्यांची कमतरता आहे. उपलब्ध माल पटकन विकावा लागतो, नाहीतर तो खराब होतो. या पुढील आठवड्यात शाळा सुरू झाल्यावर पालेभाजी व फळ भाज्यांची मागणी वाढेल, त्यामुळे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. **- पांडुरंग दीक्षित, भाजीपाला विक्रेते**

### पर्यायी खाद्यपदार्थाचा समावेश

मुलांना आवडणारे आणि पौष्टिक पदार्थ देण्याचा प्रयत्न करताना, वाढत्या दरांमुळे गृहिणींना बजेट सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांनी डाळी, कडधान्ये, उसळी, पोहे, उपमा, इडली, धिरडे यांसारख्या पर्यायी पदार्थांचा टिफिनमध्ये समावेश करण्यास सुरुवात केली आहे.

**- सुमेधा काळे, गृहिणी**

## मध्य रेल्वे सल्लागार समिती प्रतिनिधीपदी नितीन परमार व अजय दुबे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे १२६वी झोनल रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीत एकूण ४४ सदस्य उपस्थित होते. दरम्यान, या बैठकीत रेल्वेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. त्याव्यतिरिक्त विविध सदस्यांची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये नितीन सोहनलाल परमार, सदस्य यांची उपनगरीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समितीवर काम करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. तसेच अजय दुबे, सदस्य यांची दावे प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मध्य रेल्वेवर स्पॉट चेक करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. नवनिर्वाचित झोनल रेल्वे वापरकर्ते सल्लागार समितीचा कार्यकाळ सप्टेंबर २०२६ पर्यंत असणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आषाढी यात्रेपूर्वीच धोकादायक इमारतींवर फिरवा हातोडा

## पंढरपुरातील नागरिकांची मागणी; जुन्या दगडी पूलासह अहिल्या पूलाच्या स्ट्रक्चरल ऑडिटची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जून-**

शहरातील धोकादायक इमारती म्हणून पालिकेच्या दप्तरी १२७ इमारतींची नोंद करण्यात आलेली आहे. यात्रेच्या काळात अशा धोकादायक इमारतींमधून भाविक वास्तव्यास असतात. त्यामुळे इमारतीच्या क्षमतेपेक्षा जास्त लोकांच्या वास्तव्यामुळे ऐन यात्रे मध्ये धोकादायक इमारती पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत. पालिकेकडून यात्रेपूर्वीच अशा इमारत मालकांना नोटीसा बजाविण्याचा फार्स केला जातो. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे आषाढी यात्रेच्या अगोदरच पालिकेने धोकादायक इमारतींवर हातोडा फिरवावा. या बरोबरच शहरातील चंद्रभागा नदीवरील जून्या दगडी पूल व अहिल्या पूलाच्या स्ट्रँक्चरल ऑडिट करण्याची मागणी केली जात आहे.

पंढरपूर पालिकेकडून शहरातील धोकादायक इमारतींच्या घरमालकांना दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नोटीसा देण्याची प्रक्रिया सुरु आहे. वृत्तपत्रांमधून देखील या बाबतचे प्रसिध्दीकरण पालिकेच्या वतीने देण्यात येते. यावर्षी आषाढी एकादशीचा सोहळा ६ जुलै रोजी आहे. यात्रेच्या काळात राज्यातून, परराज्यातून येणारे बहुसंख्य वारकरी हे शहरातील (गावभागातील) जुन्या घरांमधून, मंदिर परिसरातील मोठ्या वाड्यांमधून तसेच मठ, धर्मशाळांमधून वास्तव्य करतात. शहरातील सुमारे १२७ इमारती ह्या पालिकेने सध्या धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. यात्रेच्या काळात चार पैसे मिळविण्याच्या नादात गावभागातील नागरिक आपली घरे धोकादायक जरी असली तरी ती वारकऱ्यांना राहण्यासाठी देतात. येथील यजमानकृत्य करणाऱ्या मंडळींचा तर हा पिढीजात व्यवसायच आहे. त्यामुळे पिढ्यान्पिढ्या पासूनचे संबंध आणि चार पैशांची बचत होत असल्यामुळे वारकरी देखील अशा मंडळींच्या घरांमधून यात्रेच्या वेळी वास्तव्य करतात. त्यामुळे कुवती पेक्षा जादा संख्येने अशा धोकादायक इमारतीं मधून वारकरी रहात असल्याचे दिसून येते. ऐन आषाढी यात्रेच्या काळात पाऊस देखील असतो. त्यामुळे अशा इमारतींची ऐन यात्रेच्या काळात पडझड होण्याच्या घटना घडतात. यामध्ये वारकरी तसेच इमारत मालकांच्या कुटुंबातील सदस्यांना देखील आपल्या प्राणास मुकावे लागते. मागील पंधरा ते वीस वर्षात यात्रा काळात धोकादायक इमारती पडल्याच्या दोन, चार घटना देखील घडलेल्या आहेत. त्यामुळे पूर्वीच्या अशा घटनांचा बोध घेऊन पालिकेने शहरातील धोकादायक इमारतींवर यात्रेच्या अगोदरच कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.





### प्रत्येक यात्रेपूर्वी नोटीसींचा फार्स, कारवाई मात्र शून्य

पालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी प्रत्येक वर्षी आषाढी यात्रेच्या अगोदर शहरातील धोकादायक इमारतींवर नुसता धोकादायक इमारत असे फलक लिहून संबंधित घरमालकांना नोटीसा देवून आपली जबाबदारी झिडकारतात. ऐन यात्रेच्या वेळी एखादी दुर्घटना घडली तर यात्रेला गालबोट लागते. शहराची चांगल्या गोष्टीं ऐवजी अशा वाईट घटनांची चर्चा सर्वत्र होते. त्यामुळे यात्रा काळात अशा इमारतींमधून वारकरी वास्तव्यास नाही ना याची पालिकेच्या आधिकाऱ्यांनी खात्री करावी. जर नोटीसा देवून देखील अशा धोकादायक इमारतींच्या मालकांकडून वारकऱ्यांना राहण्यास इमारत उपलब्ध करुन दिली असेल तर अशा घरमालकांवर त्वरीत फौजदारी गुन्हे दाखल करावेत जेणे करुन पुन्हा एखादा धोकादायक इमारतींचा मालक असे धाडस करणार नाही अशी मागणी देखील केली जात आहे.

### धोकायदायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात अनाधिकृत आणि धोकादायक होर्डिंग्जचा मुद्दा गाजत असतानाच दक्षिण काशी असलेल्या पंढरीत धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आषाढी यात्रे निमित्त नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने पंढरपूर शहरातील जुन्या इमारती, मठ, आणि धर्मशाळेची पाहणी केली आहे. या मध्ये शहरातील १२७ इमारती या धोकादायक असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

### ऐन यात्रेच्या काळात पूर्वी घडलेल्या घटना

ऐन यात्रेच्या काळात यापूर्वी सन २००० मध्ये ठाकुरबुवा मठात भिंत कोसळल्यामुळे दुर्घटना. २००८-०९ मध्ये हरिदास वेस येथे मजला खचल्याने दुर्घटना घडलेली.

### अर्धवट पाडलेल्या इमारती धोकादायक

पालिकेमार्फत ज्या घरांचे धोकादायक भाग पाडण्यात आलेले आहेत अशा इमारतींची संख्या देखील दिवसेंदिवस वाढलेली दिसत आहे. या अर्धवट पाडलेल्या इमारतींपैकी बऱ्याच इमारतींच्या मालकांनी आपल्या घरांचे व्यवस्थित बांधकाम करुन न घेतल्याने त्या अधिकच धोकादायक बनल्या आहेत.

### दगडी पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट आवश्यक

इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूलाची रविवारी घडलेली घटना ताजी असतानाच अशा प्रकारे पंढरपूरात यात्रेच्या वेळी घटना घडू नये यासाठी प्रशासनाने सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. कारण शहरातील चंद्रभागा नदीवरील ब्रिटीशकालीन जूना दगडी पूल देखील धोकादायक बनलेला आहे. या पूलाचे नदी पासून अंतर जरी कमी असले तरी यात्रेच्या काळात गर्दीमुळे या पूलाला धोका निर्माण होवून मोठी दुर्घटना देखील घडू शकते. या पूला बरोबरच शहरातील नवीन (अहिल्या पूल) पूलाचे देखील अनेक ठिकाणी संरक्षक कठडे निघालेले आहेत. या पूलाने देखील अनेक महापूरांचा सामना केलेला आहे. जड वाहने या पूलावरुन जात असताना या पूलाला देखील हादरे बसतात. त्यामुळे शहरातील या दोन्ही पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## महत्वाचे...



### मोहिते-पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांचा रौप्य महोत्सवी स्नेहमेळावा

**अकलूज, दि. १६ जून-**

विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालय, कोळेगाव (ता. माळशिरस) येथील सन २००० मधील इ.१० च्या विद्यार्थी विद्यार्थीनी चा २५ वर्षांनंतर स्नेहमेळावा साजरा केला. स्नेह मेळाव्यामध्ये प्रथम महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून दिपप्रज्वलन उपस्थित गुरुवर्य व विद्यार्थी यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर गुरूवर्य एस.एन. दुपडे, डी. बी. आवताडे, पिसे, राजाराम काळे, बाळासाहेब काशिद व धर्मराज दगडे यांचे गुरूपूजन व सन्मान करण्यात आला. कैलास दुपडे, विजयकुमार दुपडे, नितीन दुपडे, सिद्धेश्वर सावंत, लक्ष्मण धोत्रे, मिथून पवार व रोहिनी भोसले-सावंत यांनी आपल्या इ.१० वी नंतरचे जीवन सर्वांसमोर मांडले. यानंतर सर्व गुरूजन वर्गांनी मार्गदर्शन केले त्यामध्ये मुख्याध्यापक डी.बी. आवताडे व मुख्याध्यापक एस.एन. दुपडे यांनी आपल्या पुढील जिवनामध्ये आरोग्य कसे सांभाळावे व आर्थिक नियोजन कसे असावे हे सांगितले. स्नेहमेळावा आयोजनासाठी कैलास दुपडे, लक्ष्मण धोत्रे, दत्तात्रय दुपडे, गोपाळ दुपडे यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन विजयकुमार दुपडे यांनी केले.



### स्वप्ना राजगे यांना अहिल्यारत्न पुरस्कार

**पिलीव, दि. १६ जून-**

पिंपरी येथील स्वप्ना दिलीप राजगे यांना कराड येथील अहील्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट यांच्या वतीने अहील्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त वैदयकीय क्षेत्रात उल्लेखनीय व दैदीप्यमान कार्य केल्याबद्दल अहील्यारत्न पुरस्काराने माजी आमदार रामहरी रुपनवर, ऑल इंडीया धनगर समाज प्रदेश अध्यक्ष प्रवीण काकडे, राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरु साखर कारखान्याचे व्हा चेअरमन बाळासाहेब कर्णवर-पाटील या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्वप्ना राजगे या सध्या दहीवडी ग्रामीण रुग्णालय याठिकाणी इन्चार्ज आहेत. राजगे यांना अहिल्यारत्न हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्राचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, डॉ. संदीप पोळ, डॉ. प्रमोद गावडे, डॉ. दोलताडे, अशोक शेठ राजगे, अप्पा राजगे, गुलाब राजगे, माजी सरपंच आनंदा राजगे, दहीवडी ग्रामीण रुग्णालयाचे डॉकटर आशुतोष धुमाळ यांनी अभिनंदन केले.



### शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी; राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने निवेदन

**पिलीव, दि. १६ जून-**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी माळशिरस तालुका राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे. सत्ताधारी महायुती सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज माफी करण्याचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांनची मते मिळविली मात्र सत्तेवर येताचा सरकारने कर्ज माफीचा शब्द फिरवून शेतकऱ्यांची फसणूक केली आहे. निवेदन देताना रासपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब शिंदे, डव्होकेट राजाभाऊ वाघमोडे, कविता माने, संजय पाटील, तालुका अध्यक्ष नारायण देवकाते, रविराज शेंडगे, युवक तालुका अध्यक्ष मामासाहेब खरात, रमेश हांडे, जयवंत देवकाते, रमेश नामदास, गोरख माने, राहुल दडस,पोपट गोरड उपस्थित होते.




### उदयकीर्ती अर्बन सोसायटीचा लऊळमध्ये शुभारंभ

**मोडनिंब, दि.१६ जून-**

लऊळ (ता.माढा) येथे ग्रामीण आर्थिक सक्षमीकरणासाठी उदय कीर्ती अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन माजी आमदार यशवंत माने यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील होते. यावेळी संत शिरोमणी सावता महाराजांचे वंशज रमेश महाराज वसेकर, दत्त उपासक संतोष महाराज देवकर, जिल्हा दूध संघाचे व्हा. चेअरमन दीपक माळी, जिल्हा बँकेचे माजी संचालक भारत सुतकर, चंद्रकांत गिड्डे, कापड उद्योजक बंडू नलवडे, प्रभाकर भोंग, मुख्याध्यापक मोहन नलवडे, बापू लोकरे, सरपंच पवन भोंग, चेअरमन उदय माने, व्हा चेअरमन आकाश माने, अनिकेत माने, प्रभाकर भोंग, वसंत नलवडे, माऊली जाधव, महेश पवार, प्रमोद जाधव, मॅनेजर साईप्रसाद काळे, संतोष कोळेकर, उज्वल माने, अनिल वाघज, प्रीती लंगोटे, प्रगती काळे, भक्ती पवार, गणेश नलवडे पिग्मी एजंट ढोरे, मुख्याध्यापक कावरे, विठ्ठल भालेराव, अर्णव शहा, पृथ्वीराज सुर्वे, विशाल रनपिसे, आकाश दरेकर, आदित्य माळी, माऊली जाधव, आशुतोष पवार, सौरभ माने, मयूर नामदे यासह ग्रामस्थ संचालक मंडळ, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. प्रस्ताविक चेअरमन उदय माने यांनी केले. सूत्रसंचलन कावरे यांनी केले, तर आभार व्हॉइस चेअरमन आकाश माने यांनी मानले.

# ३८ वर्षांनी जमला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

## केतूर येथील नेताजी सुभाष विद्यालयात आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १६ जून-**

केतूर (ता.करमाळा) येथील नेताजी सुभाष विद्यालयाचा १९८६-८७ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे स्नेहसंमेलन पार पडले. ३८ वर्षांनी भेट झाल्याचा आनंद आणि जुन्या आठवणींनी भरलेले क्षण यामुळे सर्वजण भावनिक झाले होते.

माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याची सुरुवात सकाळी आठ वाजता प्रशालीमध्ये प्रार्थना राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी प्रशालेचे प्राचार्य काशिनाथ जाधव यांच्यासह पर्यवेक्षक भीमराव बुरटे,किशोर जाधवर, संग्राम जाधव यांचे सह प्रभाकर कांबळे,जया कांबळे.वसंत बिडवे, आजिनाथ सातव, सुनिता भोसले-सातव, गोरख कोठावळे, शशिकांत क्षीरसागर, दत्तात्रय सोनवणे, शहाजी भोसले, भारत पांडव यामाजी शिक्षकांची उपस्थिती होती. मेळाव्याचे आयोजन विलास खुळे, देवराव चव्हाण, राजाराम माने, महेश निसळ, संगीता शेटे/सोलापूरे या माजी विद्यार्थ्यांनी केले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रशालेस कलर प्रिंटर व भारत मातेची मूर्ती भेट देण्यात आले. सूत्रसंचालन नानासाहेब मोहिते व तात्या गावडे यांनी केले तर आभार दत्तात्रय कुलकर्णी यांनी मांनले. शेवटी वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# १८ जून रोजी जिल्ह्यात ग्राहक तक्रार निवारण दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जून-**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि.१८ जून रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यात येते त्याप्रमाणे १८ जून रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी १८ जून रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा.पर्यंत ग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता,उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी,अडचणी,समस्या सोडविणार आहेत. वारंवार वीजपुरवठा खंडित होणे,नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना स्वखर्चाने आणलेल्या मीटरची संपूर्ण रक्कम न मिळणे, शेतकरी ग्राहकांना वेळेत डी.पी.बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे, असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, अ.भा. ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, प्रांत सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले आहे.

# ‘सखा माझा पांडुरंग’ चे १०० भाग पूर्ण; पंढरपूर मधून होते दररोजचे पार्श्वसंगीत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ जून -**

सन मराठी चॅनलवरील रुची फिल्म्स निर्मित सखा माझा पांडुरंग ही संत सखूच्या जीवनावरील मालिका दिनांक १० मार्च २०२५ पासून दररोज संध्याकाळी साडेसात वाजता प्रसारित होत आहे.

या मालिकेचा १७ जून २०२५ रोजी शंभरावा भाग प्रसारित होत आहे. विशेष म्हणजे या सिरियलचे दररोजचे पार्श्वसंगीताचे म्हणजेच बॅकग्राऊंड म्युझिकचे काम पंढरपूर येथील संगीतकार व गायक विनोद सुधाकर शेंडगे यांच्या अनाहत रेकॉर्डिंग स्टुडिओ मधे होत आहे. त्यामुळे तमाम पंढरपूरकरांसाठी ही अभिमानास्पद अशी बाब आहे.

या सिरीयल विषयी माहिती देताना संगितकार विनोद शेंडगे सांगतात की, शास्त्रीय रागांवर अधारित आलाप, सरगम. तराना अशा विविध प्रकाराने शास्त्रीय संगीताचा पुरेपूर वापर या पार्श्वसंगीतात केला आहे. तसेच विविध प्रसंगानुरूप अभंग, श्लोक, स्तोत्रे यांचाही वापर यामध्ये केला असल्याने लहान मुलांवर उत्तम संस्कार घडत आहेत. त्यामुळे अतीशय प्रभावी परिणाम दिसून येत आहे. मालिकेतील प्रसंगानुरूप गाणी सुद्धा येथूनच तयार केली जातात. आजपर्यंत शंभर भागांमध्ये दहा गाणी, चार ते पाच प्रकारचे गजर, दोन ते तीन श्लोक आणि अनेक रागांचा वापर यामधे केला आहे. तसेच यामधून स्थानिक कलाकारांना सुद्धा संधी देण्यात येत आहे.पंढरपूर येथील स्वराली सावळे, श्रेया पुजारी, सोलापूर येथील स्वरदा मोहोळकर यांनीही या सिरियलमधे गाणी गायली आहेत. असाच प्रवास पुढे सुरु राहणार आहे.

९ जून पासून याच मालिकेचे तेलगू भाषेत डबिंग करून ही मालिका आंध्रप्रदेश व तेलंगणा मध्ये रंगा रंगा पांडुरंगा या नावाने जेमिनी टिव्हीवर दररोज सकाळी साडेआठ वाजता प्रसारित होत आहे.




### बार्शी बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत मंगळसूत्र लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जून-**

बार्शी बस स्थानकावर पुन्हा गर्दीचा फायदा घेत चोऱ्यांचा प्रकार सुरु आहे. पुण्यातील कात्रज परिसरात राहणाऱ्या स्वाती गणेश गरड (वय-३५) या महिलेला तब्बल १.६१ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि रोख रक्कम गमवावी लागली आहे. या प्रकरणी त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

स्वाती गरड या १३ जून रोजी पहाटे त्यांच्या बहिणीच्या मुलीच्या साखरपुड्यासाठी लातूरहून रेल्वेने बार्शी येथे आल्या. बार्शी बस स्थानकावर उतरल्यानंतर त्यांनी धाराशिवकडे जाणाऱ्या बसमध्ये चढू लागल्या.

गर्दीमुळे सतत हालचाल होत असताना त्यांची पर्स फाटली आणि त्यात ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र आणि १,३०० रुपयांची रोख रक्कम चोरीला गेली. हा प्रकार कार्यक्रम स्थळी गेल्यावर त्यांच्या लक्षात आला. या घटनेने पुन्हा एकदा बार्शी बस स्थानकातील सुरक्षेच्या दुरवस्थेचे दर्शन घडवले आहे. पोलीस बंदोबस्त वाढवावा, अशी मागणी नागरिकातून केली आहे.

# मंद्रूपच्या प्रवेशाजवळच कचऱ्याचा ढिग; राज्य महामार्गाची दुर्दशा

## गावाची प्रतिमा मलिन; कचरापेटीचाही अभाव, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १६ जून-**

बसवनगर-मोहोळ या महत्त्वाच्या राज्य महामार्गावर, मंद्रूप गावाच्या सुरुवातीस एस.टी. स्टँडपासून वांगी रोडकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत सुमारे २०० मीटर परिसरात कचऱ्याचा खच साचलेला आहे. या ठिकाणी कोणतीही कचरापेटी उपलब्ध नसल्याने नागरिक रस्त्यालगतच कचरा टाकत असून, परिणामी परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत कचऱ्यातून दुर्गंधी, माशांचा उपद्रव आणि साथीच्या रोगांचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाऱ्यामुळे उडणारा कचरा रस्त्यावर साचतोय, वाहनचालकांना अडथळा निर्माण होतोय आणि गावाची प्रतिमा मलिन होत आहे. या महामार्गावरून दिवसाला शेकडो एस.टी. बस, ट्रक, दुचाकी व चारचाकी वाहने प्रवास करतात. या मार्गावरून परराज्यातून येणारे प्रवासी, तसेच परगावातील विद्यार्थी, कर्मचारी व व्यापाऱ्यांचा मंद्रूपमध्ये नेहमीचा वावर असतो. त्यामुळे ही घाण केवळ स्थानिक नाही, तर गावाची प्रतिमा बाहेरच्यांसमोरही मलिन करते. त्यांच्यासमोर गावाचे हे गोंधळलेले रूप अत्यंत नकारात्मक चित्र उभे करते. या समस्येवर मागील अनेक वर्षांपासून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. स्थानिक प्रशासनाने त्वरित पुढाकार घेऊन कचरापेट्यांची व्यवस्था, जनजागृती मोहीम आणि सार्वजनिक स्वच्छतेसाठी उपाय करावेत, अशी गावकऱ्यांची मागणी आहे.



पावसाळ्यात वाऱ्यामुळे कचरा रस्त्यावर आणखी पसरतो आहे. गावाच्या सुरुवातीलाच ही अस्वच्छता असल्यामुळे मंद्रूपबद्दल बाहेरून येणाऱ्या लोकांमध्ये नकारात्मक छाप निर्माण होते. विशेष म्हणजे, याच परिसरात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. त्यामुळे दुर्गंधी व घाण विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी गंभीर धोकादायक ठरू शकते. जर तातडीने उपाययोजना केली नाही, तर ही समस्या केवळ अस्वच्छतेपुरती मर्यादित राहणार नाही, तर सार्वजनिक आरोग्य आणि गावाच्या प्रतिष्ठेवरही परिणाम होऊ शकतो.

**-महमद शेख, जिल्हा सचिव, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटी**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कारंबा जि.प. शाळेत बैलगाडीतून मिरवणूक

उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत बैलगाडीतून मिरवणुकीने करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या शालेय साहित्यांचे वितरण केले. याप्रसंगी सरपंच तुकाराम चव्हाण, महबूब शेख, बापूसाहेब पाटील, अतुल रोकडे, चंद्रकांत मस्के, माऊली काशीद, मिथुन शिंदे, राहुल सुरवसे, प्रशांत जगताप, राजू बहिर्जी, शालेय समितीचे अध्यक्ष विलास गायकवाड, मुख्याध्यापक, शिक्षक व पालक उपस्थित होते.



## शाळा प्रवेशोत्सव



**विद्यार्थी सहाय्य बहुउद्देशीय संस्थेचे दहावी मोफत पुस्तक संच श्री शंकरराव मोहिते पाटील विद्यालय बैरागवाडी (ता.मोहोळ) इयता १० वी सेमी पुस्तके १५ संच वाटप करण्यात आले.**



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रावबहाद्दूर गट

अकलूज येथील जि. प. प्राथमिक शाळा, रावबहाद्दूर गट (बिजवाडी) शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. कार गाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागतांचे पहिले पाऊल म्हणून पावलांचे ठसे घेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आशा भजनावळे व उपाध्यक्षा दिपाली लोखंडे आणि पालक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच गणवेश वाटप करण्यात आले विद्यार्थ्यांना बूट व सॉक्सचे वाटप देखील करण्यात आले. श्रीकांत राऊत यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थी व पालकांना जिलेबी वाटप करण्यात आली. कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आशा भजनावळे, दिपाली लोखंडे, रोहिणी बंडलकर, सुवर्णा कांबळे, पूजा बोडरे, रतन बंडलकर, शहनाज नदाफ, पूजा ढोबळे, राधा भजनावळे, अश्विनी गरुड उपस्थित होते. सूत्रसंचालन उपशिक्षक अजमीर फकीर यांनी केले. मुख्याध्यापक श्रीकांत राऊत यांनी आभार व्यक्त केले.



### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात शाळेच्या पहील्या दिवशी इयत्ता पाचवीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विदयार्थनचे गुलाबपुष्प देऊन व पुस्तके देऊन मुख्याध्यापक बागल, पर्यवेक्षक किरगत, पत्रकार संजय पाटील, यांच्या हस्ते देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी वाघमारे, पाटील, जाधव, मेटकरी, मगर, पाटोळे, लिंगे, घोडके, आठरे यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन झाडे यांनी केले.



### शेळगाव जि. प. शाळा

शेळगाव (आर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील नवगथांचे स्वागत खाऊ व गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय वडाळा मधील चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी शुभेच्छा व खाऊ दिला. यावेळी शेळगाव गावचे सरपंच प्रकाश बादगुडे शाळेचे मुख्याध्यापिका शैलजा उकिरडे, पहिलीच्या वर्गशिक्षिका रुपाली बिडवे, वैशाली नवगुडे तसेच मुलांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यात कृषीकन्या प्रतिक्षा क्षीरसागर, नम्रता मांडवे, स्वागाती पवार, रेणुका झांबरे, दैवश्री धावणे यांनी सहकार्य केले.



### सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज

सदाशिवराव माने विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पेढे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे संचालक बाळासाहेब सणस, विद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य आप्पासाहेब मगर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल फुले,उपमुख्याध्यापक दत्तात्रय घंटे, उपप्राचार्य सुभाष मुंडफने, कला वाणिज्य विभागाचे प्रमुख संजय जाधव, पर्यवेक्षक राजेंद्र धोत्रे, पर्यवेक्षक सुजित कांबळे उपस्थित होते. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक अमोल फुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन संदीप शिंदे यांनी केले तर आभार उपमुख्याध्यापक दत्तात्रय घंटे यांनी मानले.


# प्रभातफेरीसह पुष्पवृष्टी अन् ढोलताशांचा गजर

## गावागावांतील शाळांमध्ये रंगला प्रवेशोत्सव; मुलांमध्ये कुठे हसू तर कुठे आसू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

उन्हाळी सुट्टीनंतर यंदाच्या शैक्षणिक वर्षाची आज दि. १६ जूनपासून सुरवात झाली. त्यानिमित्त जिल्ह्यातील गावागावातील जिल्हा परिषदसह अन्य शाळांमधून मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव साजरा झाला. यामध्ये गावागावात लेझीम सह ढोलताशांच्या गजरात प्रभातफेरी काढण्यात आली. अनेक गावात मिनी ट्रॅक्टरमधून पुष्पवृष्टी करीत गावातून मिरवणूक काढण्यात आली. शैक्षणिक गीतांसह घोषवाक्यांनी परिसर दुमदुमला होता. अनेक शाळातून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारात गुलाब पुष्प देऊन आणि विद्यार्थ्यांवर फुलांची उधळण करत फटाक्याची आतिषबाजीही अनेक ठिकाणी करण्यात आली. शाळेचा पहिला दिवस असल्याने प्रवेशद्वार फुग्यांनी, फुलांनी सजवण्यात आले होते. इयत्ता पहिलीमधील प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची घोडा आणि ट्रॅक्टरमधून आणि लेझीम व ढोलताशासह मिरवणूक काढण्यात आली. प्रभातफेरी शाळेत आल्यानंतर शाळेच्या प्रवेशद्वारात विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन, गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. पुस्तक, गणवेश, लाडू वाटप करण्यात आले. अनेक शाळातून पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पाठ्य पुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. प्रथमच शाळेत आलेल्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आई बाबांना सोडून रहावे लागणार म्हणून आसू तर फुगे, चॉकलेट, खाऊ मिळाल्याने हसूही होते.



**स्कूल चले हम।**



### हंजगी आश्रम शाळेत मिनी ट्रॅक्टरमधून प्रभातफेरी

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी आश्रम शाळेत प्रवेशीत विद्यार्थ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षि छत्रपती शाहू महाराज आदी महामानवांच्या वेशभूषा परिधान करून मिनी ट्रॅक्टरमधून पुष्पवृष्टी करीत गावातून मिरवणूक काढण्यात आले. सोलापूर येथील इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाचे नूतन सहाय्यक संचालक गणेश सोनटक्के यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. प्रभातफेरी ग्रामपंचायत कार्यालय येथे पोहचल्यावर सरपंच भाग्यश्री हालोळे व प्रतिष्ठित ग्रामस्थांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रवेशीत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. प्रभातफेरीच्या वेळी नवनवीन शैक्षणिक गीत व शैक्षणिक घोषवाक्य सादर करीत ग्रामस्थांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना नवीन गणवेश,पाठ्यपुस्तक,दप्तर, वह्या, लेखन साहित्य आदी शैक्षणिक साहित्य मोफत मिळाल्याने विद्यार्थ्यामध्ये उत्साहा संचारला होता. प्रभातफेरी जेव्हा आश्रम शाळेवर पोहचली तेव्हा विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करुन प्रवेशोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली.

### माढा जि. प. प्राथमिक मुलींची केंद्रशाळा

जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची केंद्र शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके गणवेश बुट व मोजे यांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पावलांच्या ठसे उमटवून त्यांच्या पालकांना देण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून जिलेबीचे वाटप करण्यात आले. त्यांच्या स्वागतासाठी फुगे पताका व इतर वस्तूने वर्गाची सजावट करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी नगराध्यक्षा अॅड. मिनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, नगरसेवक आजिनाथ माळी, नाना साठे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन साठे, उपाध्यक्ष देविदास खरात, मुख्याध्यापक सुरेश माळी, विशेष शिक्षक प्रवीण भांगे, वैजिनाथ मोगल उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती घावटे तर आभार वैजिनाथ मोगल यांनी मानले.



### मोडनिंब जिल्हा परिषद शाळा

मोडनिंब (ता. माढा) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ व मुलींच्या शाळेच्या वतीने नव्या शैक्षणिक वर्षाच्या शुभारंभानिमित्त प्रवेशोत्सव व शाळा सुरुवात कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्या मुला-मुलींचे गुलाब पुष्प, चॉकलेट आणि रंगीबेरंगी फुगे देऊन स्वागत करण्यात आले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पाठ्य पुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. सुभाष वेदपाठक यांनी मुलींच्या शाळेसाठी ५० लेझीम भेट दिले. कार्यक्रमाची सुरुवात शहरातून प्रभातफेरीने झाली. गावामध्ये विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांनी प्रभातफेरी काढून शिक्षणाविषयी जनजागृती केली. या प्रभातफेरीत शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माजी सरपंच कैलास तोडकरी, दत्तात्रय सुर्वे, राहुल पाटील, बालाजी गायकवाड, राजाभाऊ निंबाळकर, तात्या मोहिते, राहुल केदार, प्रशांत सुर्वे, शाळा व्यवस्थापन सदस्या सोनाली वाघमारे, रतन जाडकर, सुमैय्या आतार, स्वाती पाटील, मुख्याध्यापक हरिदास जाधव, राजन सावंत उपस्थित होते.

### जि. प. प्राथमिक शाळा, कासारवाडी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे प्रवेशोत्सव विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. प्रथम कासारवाडी येथे प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभातफेरीमध्ये इयत्ता पहिलीमधील प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची घोडा आणि ट्रॅक्टरमधून आणि लेझीम व ढोलताशासह मिरवणूक काढण्यात आली. प्रभातफेरी शाळेत आल्यानंतर शाळेच्या प्रवेशद्वारात विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेऊन, गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक बाळासाहेब मुंढे यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, अध्यक्षा प्रिती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शरद गुंड, माजी सरपंच राकेश मंडलिक, नितीन मंडलिक, पुरुषोत्तम कदम यांच्या हस्ते पुस्तक, गणवेश, लाडू वाटप करण्यात आले. प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, बिनादेवी दरेकर, वीणा कदम, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे, विठ्ठल लहाने यांनी परिश्रम घेतले.





### गोपाळपूर येथे ग्रामस्थांकडून स्वागत

पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथील जिल्हा परिषद शाळेत पहिल्या दिवशी भाजपा तालुका अध्यक्ष प्राध्यापक सुभाष मस्के व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे स्वागत शाळेच्या प्रवेशद्वारात गुलाब पुष्प देऊन आणि विद्यार्थ्यांवर फुलांची उधळण करत फटाक्याची आतिषबाजी करून करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने प्रवेशद्वार फुग्यांनी, फुलांनी सजवण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके व जिलेबी वाटप करून करण्यात आली. यावेळी प्राध्यापक सुभाष मस्के, ज्येष्ठ नेते दिलीप गुरव यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी खास स्वागतपर भाषणे केली. शिक्षकांनी शैक्षणिक वर्षात होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. उदय पवार, दत्तात्रय गुरव, लक्ष्मण लेंगरे, अरुण बनसोडे, शिवाजी माने, अजय जाधव, अमोल पाटील, उल्हास कोले, गणेश माने, हनुमंत लेंगरे, रघुनाथ पवार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक सुभाष मस्के यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते.





### गुळवंची शाळेत बसमधून सवारी

शासन व ग्रामपंचायतीचे माध्यमातून जिल्हा परिषदेच्या शाळांना आवश्यक सोयी सुविधा दिल्या जात असुन इंग्रजी माध्यमाच्या शाळापेक्षा शैक्षणिक दर्जा चांगला आहे. तेव्हा पालकांनी आपल्या पालकांना जिल्हा परिषदेच्या शाळेतच घालण्याचे आवाहन नरोटेवाडीचे सरपंच उमेश भगत यांनी केले. गुळवंची व नरोटेवाडी ता.उत्तर सोलापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिल्या दिवशी पहिलांच्या मुलांना गुलाबपुष्प देवुन स्वागत केले यावेळी त्यांनी शाळेतील मुलांना शुभेच्छा दिल्या

पहिले आम्हास शाळेत बळेच,ओढत घेऊन जायचे.आता शाळेत असलेल्या सोयी सुविधा शैक्षणिक दर्जा वाढल्याने मुलांना शाळेची एवढी ओढ लागली की अगोदर शाळेला पळतात.ही ओढ त्यांच्या भविष्यासाठी असून शिक्षकांनी त्यांचे शैक्षणिक सह संस्कारित घडवले पाहिजे. असे गुळवंचीचे सरपंच सुनिल जाधव यांनी सांगितले. गुळवंची येथे पहिली मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांना सजवलेल्या बसमधून वाजत गाजत शाळेत आणले प्रवेशव्दारात सरपंच सुनिल जाधव,उपसरपंच जयश्री तांबे, ग्रामपंचायत पदाधिकारी,शालेय शिक्षक समितीचे सदस्य,शिक्षकांनी स्वागत केले.नरोटेवाडी येथे सरपंच उमेश भगत, उपसरपंच महेंद्र खटके,सह पदाधिकारी,यांनी स्वागत करुन शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



### जगताप उर्दू शाळा, करमाळा

शाळेच्या पहिल्या दिवशी कै. नामदेवराव जगताप उर्दु शाळेत पहिलीच्या विद्यार्थीचे स्वागत माजी नगरसेवक संजय सावंत माजी नगरसेवक फारुक जमादार, रविंद्र कांबळे, दिपक सुपेकर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर आदींनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी पालक वर्ग शिक्षक उपस्थित होते. यावेळी प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, लिपिक शिवदास कोकाटे, शिक्षक पालक उपस्थित होते. मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी आभार मानले.